# माणूस

१ एप्रिल १९६६ : चाळीस पैसे


## ? लतिका-हमीद विवाह आणि सावरकर

केवळ इतकेच बजावतो, की मला जातिभेद नको असला तरी आज हिंदुत्व हवे आहे. आणि म्हणून रोटीव्यवहारावरील आरोग्यादिक अटीं-प्रमाणे कोणाही अहिंदूशी तो करण्यास हरकत नाही हे जरी आज मी समर्थितो तरी बेटीव्यवहाराविषयी मात्र आणखी काही काळ हिंदूंनी अहिंदूस मुली देऊ नयेत असे मला वाटते. अहिंदू मुली करण्यास हरकत नाही अशी समजूत आणि रूढी हिंदूंत पुष्कळ अंशाने बद्धमूल झाली, की मग तशा मुक्त विवाहासही मी समर्थीन. आज नुसत्या मुली जातील—त्यांच्या वंशास अंतरू ही भीती आहे. शुद्धि, जातिभेद निर्मूलन आणि अंतर्गत संघटन पक्केपणी बद्धमूल झाले म्हणजे मग बेटी-व्यवहारही अहिंदूंशी—ते ज्या प्रमाणात मुक्तपणे वागतील त्या प्रमा-णात--करण्यास आपणही सिद्ध होऊ.

इतकेच नव्हे तर जर मुसलमानत्व, ख्रिश्चनत्व इत्यादी "त्वे" इतर सोडीत असतील तर मग माझे हिंदुत्वहि मानुषकतेत विलय पावेल. जसे माझे राष्ट्रीयत्वही–हिंदीपणही–मानव राष्ट्रात तेव्हा विलय पावेल, की जेव्हा इंग्लिशपण, जर्मनपण इत्यादी "पणा" लुप्त होऊन मनुष्यपणा तेवढा जगात मनुष्यमात्रात नांदू लागेल ! आजदेखील जो मनुष्यवादी (Humanitarian) असेल त्याच्यापुरते, त्याच्याशी मी सर्व भेदभाव सोडून वागेन.

— जात्युच्छेदक निबंध [पृ. ३३१]

अमृत-मंथन की विष-मंथन ?






वर्ष पाचवे : अंक एकविसावा : १ एप्रिल १९६६
किंमत चाळीस पैसे : वार्षिक वर्गणी दहा रुपये
संपादक : श्री. ग. माजगावकर
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २. : दूरध्वनी : ५७३५९.

## आभार !

दि. १५ मार्चचा 'माणूस'चा अंक सर्वांगसुंदर निघाला आहे हे व्यक्त करण्याकरिताच पत्र लिहीत आहे.

ह्या अंकाचं मुखपृष्ठ तर आकर्षक आहेच परंतु ह्यांतील लेखही अत्यंत सुरस अन् सरस आहेत. सावरकर-पर्वावरील आपला लेख विचारप्रवर्तक आहे; 'मिझोरॅम'च्या निमित्तानं श्री. तपस्वी यांनी खरोखरच एका ज्वलंत प्रश्नावर झगझगीत प्रकाश टाकला आहे. ग्यानबाचं गुऱ्हाळ तर फारच रसाळ आहे. श्री. शाम तारे यांनी अॅडीच्या खुनाची कथा नितांत सहृदयतेनं अनुवादित केली आहे. श्रीमती गुडमन यांच्या कारुण्यपूर्ण कथनानं अंतःकरण हेलावतं, तसंच स्वतःला सुशिक्षित अन् सुसंस्कृत म्हणविणाऱ्या मानवाचं पाशवी वर्तन पाहून चित्त थरारतं. श्री. राजेंद्र गायकवाड यांनीही आपल्या व्यंगचित्रांनी संबंधित व्यक्तींना व्यवस्थित कोपरखळ्या मारल्या आहेत.

अशा प्रकारे सर्वच अंक सुरेख आहे. ह्यांतील कोणता लेख अधिक चांगला हे ठरविणं कठीण आहे. अंकातील पान न् पान वाचनीय आहे. इतका उत्कृष्ट अंक काढल्याबद्दल मी आपलं मनःपूर्वक अभिनंदन करतो. मी जर एकादं साप्ताहिक किंवा मासिक चालवीत असतो तर त्यातील प्रत्येक लेख उद्धृत करण्याचा मला मोह झाला असता !

भास्कर निनावे (भंडारा)

**दि. १५ मार्च अंकाविषयी अशाच अभिप्रायाची बरीच पत्रे आली आहेत. स्थलाभावी एक नमुना फक्त येथे दिला. सर्व पत्रलेखकांचे आभार.**

**—सं.**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# दे श-वि दे श

## □ पंजाबचे विभाजन

एक आठवडाभर जातीय व भाषिक वैमनस्याने पेटलेला पंजाब आता अखेर शांत होऊ लागला आहे. भारताचा खराखुरा खड्गहस्त म्हणून ज्या प्रांताने आतापर्यंत लौकिक मिळविला, नुकत्याच झालेल्या भारत-पाकिस्तान रणधुमाळीत ज्या शूर प्रांताने आपल्या अतुल पराक्रमाने, एकीने व धैर्याने साऱ्या भारतीय जनतेसमोर एक आदर्श धडा ठेवला, त्या प्रांतातच भाषेच्या आणि जातीच्या प्रश्नावर लोकांनी एक-मेकांचे रक्त सांडण्याची पाळी यावी आणि त्याचा परिणाम त्या प्रांताचे तीन तुकडे होण्यात व्हावा, हे भारताचे दुर्दैव आहे.

पंजाबी भाषिक राज्याची मागणी तशी नवीन नाही. किंबहुना इतर प्रांतात भाषिक ऐक्याची जागृती होण्याच्या कितीतरी अगोदर, थोड्या वेगळ्या प्रकाराने का होईना, पण ' पंजाबी सुभ्याची ' मागणी जन्माला आली होती. १९४२ साली जेव्हा मुस्लीम लीगने भारताच्या फाळणीची आपली मागणी जोरात पुढे मांडली होती, त्याच सुमारास अकाली नेत्यांनी ' आझाद पंजाब ' ची मागणी पुढे केली होती. या मागणीचा उद्देश भारत व पाकिस्तान यांच्या मध्ये बफर स्टेटप्रमाणे हे राज्य निर्माण करण्याचा होता. त्यामध्ये ४० टक्के हिंदू, ४० टक्के मुस्लीम व २० टक्के शीख लोकसंख्या असेल, अशी योजना होती..परंतु पुढे या कल्पनेने भलतेच वळण घेतले. १९४५ साली ग्यानी कर्तारसिंगांच्या नेतृत्वाखाली अकाली दलाने शीख राज्याचीच मागणी पुढे मांडली.

अशा रीतीने पंजाबी भाषिक राज्याच्या चळवळीमध्ये प्रथमपासूनच जातीय प्रश्नांची गुंतागुंत होत गेली होती. इतर राज्यांमध्ये भाषिक तत्त्वावर पुनर्रचना करताक्षणीच एकी निर्माण होण्याची शक्यता होती, तशी पंजाबमध्ये नव्हती. उलट याच एका प्रश्नावर पंजाबवासियांमध्ये तीव्र मतभेद होते. पंजाबी भाषेची जी वेगळी लिपी गुरुमुखी, ती फक्त शीखच शिकतात आणि हिंदी–मराठी या भाषांचे जसे एकमेकांपासून स्वतंत्र अस्तित्व आहे तशी विलगता पंजाबांतील जे हिंदू गुरुमुखी लिपी शिकत नाहीत, त्यांना पंजाबी व हिंदी भाषेत आहे असे वाटत नाही व त्यामुळे पंजाबी ही बोली भाषा म्हणून जरी सर्वांनी स्वीकारली असली तरी हिंदू ती आपली मातृभाषा मानीत नाहीत. त्यामुळे गुरुमुखीतून लिहिण्याची पंजाबी भाषा केवळ शिखांपुरतीच मर्यादित राहिली.

त्यामुळे पंजाबी भाषिक राज्याची मागणी म्हणजे शिखिस्तानचीच मागणी असा अविश्वास पंजाबी हिंदूंत रुजला आणि या अविश्वासाला मास्टर तारासिंगांच्या जातीय अकाली दलाने खतपाणी घातले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषिक राज्यपुनर्रचनेचे वारे देशभर पसरले आणि अकाली नेत्यांनी १९४५ ची भूमिका बदलून भाषिक पुनर्रचनेखाली आपली मागणी नव्याने पुढे मांडली. त्याबरोबर पंजाबी हिंदूंनी पंजाबी ही आपली मातृभाषा नव्हेच, असे सांगण्यास सुरवात केली. १९६१ सालच्या जनगणनेत कितीतरी हिंदूंनी शिख प्राबल्याखाली जावयास नको म्हणून बोली भाषा पंजाबी असताही हिंदी म्हणून नोंदविली ती यामुळेच. हिंदूंच्या या कृत्यामुळे अकाली दलाची वेगळा प्रांत करण्याची भावना अधिकच बळावली आणि त्यांनी आपल्या मागणीसाठी मोठ्या चळवळी करण्यास सुरवात केली.

याच सुमारास अकाली दलामध्ये दोन मतप्रवाह असल्याचे स्पष्ट होऊ लागले होते. मास्टर तारासिंगांची पंजाबी सुभ्याची कल्पना वेगळी होती. त्यांना शिखांना राजकीय स्वयंनिर्णयाचा व प्रसंग आल्यास भारतीय संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार हवा होता. त्यांची पंजाबी सुभ्याची मागणी संपूर्णपणे जातीय तत्त्वावर आधारित होती. संत फत्तेसिंग या नव्यानेच राजकारणात पडलेल्या महंताची मागणी मात्र शुद्ध भाषिक तत्त्वावर आधारित होती. हिंदू-मुस्लीम एकीचे संत फत्तेसिंग सतत प्रयत्न करीत असतात. पंजाबी सुभा हा केवळ भाषिक तत्त्वावर व्हावा, त्यांत शीख अधिक संख्येने आपोआप येतील व त्यांचे प्राबल्य वाढेल याला इलाज नाही, पण इतर भाषांना जशी स्वतंत्र राज्ये देऊन न्याय दिला तसा पंजाबी भाषेलाही मिळावा. इतर भाषिकांत हिंदू अधिक आहेत आणि पंजाबी बोलणारांत शीख अधिक आहेत, म्हणून या निधर्मी राज्यात पंजाबी भाषेवर अन्याय होऊ नये, ही संत फत्तेसिंगांची भूमिका होती.

मास्टर तारासिंग व संत फत्तेसिंग हे दोघेही आपापले धर्म बदलून शीख झालेले. एक पूर्वी मुस्लीम तर दुसरे हिंदू होते. दोघांचाही शीख जमातीवर दांडगा प्रभाव आहे. परंतु मास्टर तारासिंगांच्या फुटीर प्रवृत्तीला शीख जमातीतही पुरेशी साथ आता मिळेनाशी झाली आहे. केवळ भाषिक पंजाबी सुभ्याला अनेक शिखांनी पाठिंबा दिला. अकाली दलातील महत्त्वाचे गट आता संत फत्तेसिंगांच्या पाठीशी आहेत व पंजाबी सुभ्याच्या निर्णयाला त्यांची मान्यता आहे. पंजाबचे ऐक्य टिकविण्याच्या उद्देशाने व पंजाबी सुभ्याला विरोध करण्यासाठी जनसंघाने जी निदर्शने केली व ज्या दंगली केल्या, तीमुळे मास्टर तारासिंगांच्या मूठभर जातीय अनुयायांनासुद्धा दंगलीस वाव मिळाला. त्यामध्ये बहुसंख्य शीख नव्हते हे आता स्पष्ट झाले आहे. आता दंगली थांबल्या आहेत, पण पंजाबी सुभा झाल्यावरही शिखांना स्वयंनिर्णयाचा हक्क हवाच ही मागणी मास्टर तारासिंगांनी अद्यापि सोडलेली नाही. परंतु त्यांच्यामागे शक्ती आता कमी आहे आणि हिंदू–शीख

ऐक्यासाठी ज्यांनी प्रयत्न चालविले आहेत, अशा संत फत्तेसिंगांनी तारासिंगांच्या या मागणीला कसून विरोध करण्याचे ठरविले आहे.

सरकारने आता स्वीकारलेल्या तत्त्वानुसार पंजाबाचे तीन भाषेत विभाजन होईल. एक भाग पंजाब भाषिक राज्यात राहील. काही जिल्हे हरयाना या योजलेल्या हिंदी भाषिक प्रांतात जातील व उरलेले भाग सध्याच्या हिमाचल प्रदेशाला जोडून बृहतहिमाचल प्रदेश निर्माण करण्यात येईल.

## □ सोकार्नोचा अस्त !

गेली वीस वर्षे इंडोनेशियन जनतेवर आपली पकड कायम ठेवून असलेल्या अध्यक्ष सोकार्नोला शेवटी लष्कराच्या हाती सत्ता सुपूर्त करावी लागलीच. औपचारिकदृष्टया सोकार्नो अद्याप इंडोनेशियाचा अध्यक्ष आहे आणि अजूनही जनमनावरील त्याची पकड कमी झालेली नसली तरी त्याच्या सत्तेला ग्रहण लागले आहे हे खास.

१९४५ साली इंडोनेशिया स्वतंत्र झाला, त्या आधीपासूनही सोकार्नोचे व्यक्तिमत्त्व आशियन व जागतिक राजकारणात माहीत झाले होते. दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेले आर्थिक अराजक, परकीय पंचमस्तंभियांशी झगडा, लष्कराचे एकामागून एक असे झालेले उठाव यांना त्याला सतत तोंड द्यावे लागले; पण या सर्व शक्तींना काबूत ठेवून जनमनासमोरील प्रतिमा त्याने यत्किंचितही ढळू दिली नव्हती. पण असे करताना या विरोधी शक्तींचे कायमचे निर्मूलन करण्यात त्याला संपूर्ण यश कधीच मिळाले नाही. लष्करातील बंडखोर प्रवृत्ती उफाळून येऊ नये म्हणून लष्करास राजकीय अधिकारही त्याने दिले. देशातील विविध राजकीय शक्तींना एकत्र आणण्यासाठी त्याने राष्ट्रीय, कम्युनिस्ट आणि धार्मिक पक्षांची एक एकत्र संघटना केली. देशातील आर्थिक प्रश्नावर जनतेने अधिक ओरडा करू नये म्हणून त्याने डच, वेस्ट इरियन आणि मलेशिया यांच्या विरुद्ध युद्धाचे वातावरण निर्माण केले.

शेवटी सोकार्नोच्या सत्तेला ग्रहण लागावयास सुरवात झाली ती कम्युनिस्ट पक्षाच्या अयशस्वी बंडामुळे. इंडोनिशियातील कम्युनिस्ट पक्ष जगातील जुन्या कम्युनिस्ट पक्षातील आणि संख्येने फार मोठा पक्ष गणला जात होता. या पक्षाने सोकार्नोला हाताशी धरून अथवा त्याच्या तालाने आपले राजकीय हेतू सफल करण्याचे प्रयत्न चालविले. इंडोनेशियन कम्युनिस्ट पक्ष चीनच्या नादी लागला नसता तर कदाचित तो यशस्वीही झाला असता. परंतु चीनशी त्याने चालविलेल्या चुंबाचुंबीमुळे लष्करातील फार मोठा भाग व जनता त्यावर नाराज होती. त्यामुळे गेल्या ऑक्टोबरमध्ये क्रांती करून सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न या पक्षावरच उलटला आणि त्याचे

संपूर्ण गिरकाण झाले. ओघानेच या पक्षावर सतत प्रेम केलेल्या व त्याला सतत पाठिंबा देणाऱ्या सोकार्नोंचेही वजन कमी झाले. कम्युनिस्ट पक्ष व लष्कर यांतील राजकीय सत्तेसाठी लागलेली स्पर्धा केवळ स्वतःच्या व्यक्तित्वावर दोन्हीकडे वजन ठेवून दाबून ठेवण्याचा त्याने प्रयत्न केला; पण तो जमला नाही.

अजूनही सोकार्नोंचे भविष्य अनिश्चित आहे. इंडोनेशियामधून त्याचा कायमचा अस्त झालेला नाही. पुन्हा सोकार्नोंच्याच हाती दृढ सत्ता आली तरी राजकीय निरीक्षकांना आतापर्यंतच्या अनुभवावरून आश्चर्य वाटणार नाही. ●


भारतात सुप्रसिद्ध झालेले विजयश्री प्रॉडक्टस्‌चे आयुर्वेदिक

**शकुंतला हेअर ऑईल**

**श्री शिकेकाई**

स्पेशल *( ताज्या फळाफुलांनी युक्त )* स्ट्रॉंग व चालू तेल नित्यनियमित वापरल्याने पांढरे केस कायमचे काळे होण्यास, दाट व मोठे होण्यास, तसेच शांत झोप येण्यास मदत होते.

★ ग्राहकांना निर्भेळ व खात्रीशीर माल मिळण्यासाठी आमच्या शकुंतला हेअर ऑईलच्या बाटलीस दि. १५ जाने. ६६ पासून सील करण्यात आले आहे, याची ग्राहकांनी अवश्य नोंद घ्यावी. ★

★ *सील पाहूनच माल खरेदी करावा.* ★

आमचे मुंबईचे डिस्ट्रिब्यूटर्स

**वसंत फार्मसी, दादर**

मुंबई २८ (फोन ४५२०४४)

सर्वत्र महाराष्ट्रात तसेच जबलपूर, बंगलोर, मद्रास, म्हैसूर वगैरे ठिकाणीही माल मिळेल.

असंख्य ग्राहकांनी प्रत्यक्ष भेटण्याची इच्छा दर्शविल्यामुळे त्यांच्या सोयीसाठी दुपारी ३ ते ७ पर्यंत घरी भेटण्याची व्यवस्था केली आहे. भेटा : पुष्पावती त्र्यं. दुनाखे, ३ सहजीवन, गोखले क्रास रोड, नं. २, पोर्तुगीज चर्चसमोर, दादर, मुंबई २८.

लिहा :— *( पुष्पावती त्र्यं. दुनाखे )* (विजयश्री प्रॉडक्टस्) सुंदरबाग इस्टेट, भारत सिल्क मिल कम्पाउन्ड, कमानीजवळ, कुर्ला, मुंबई ७०.

**ता. कलम :** *ग्राहकांच्या मागणीमुळे तोंडावरील डाग, पुळ्या, मुरूम वगैरे जाऊन नितळ कांतीकरिता ‘ हिमकांती ’ पावडर चालू केली आहे.*

B. Y. P.

# पंजाबी सुभा

मोरेश्वर तपस्वी ( दिल्ली )

पंधरा ठार, कित्येक जखमी आणि २ हजारांवर अटकेत हा पंजाबी सुभ्याच्या संस्थापनेसाठी चढवण्यात आलेला नारळ आहे. सुभ्याला विरोध करण्यासाठी जनसंघाच्या पंजाब प्रांताचे सरचिटणीस श्री. यशदत्त शर्मा आणि आर्यसमाजाचे स्वामीश्री. सत्यानंदजी या दोघांनीही आपले जीवित धोक्यात घातले. पंजाबी सुभा मागण्यासाठी संत फत्तेसिंग या अकाली दलाच्या अध्यक्षांनीही असाच प्राणांतिक उपोषणाची आणि विशिष्ट मुदतीनंतरही ध्येय साध्य न झाल्यास अग्निकाष्ठे भक्षण करण्याची धमकी दिली होती. प्रश्न आहे– पंजाबी सुभा मिळावा म्हणून किंवा तो स्थापू नये म्हणून उभय पक्षांचे लोक प्राण देण्याच्या इतक्या निकरीवर का येत आहेत ? आपल्या प्राणांना क:पदार्थ मानून कोणत्या उदात्त भावनेने आत्मार्पण करण्याची भावना या नेत्यांना प्रेरणा देत आहे ? तेवढीच उदात्त भावना त्यांच्या अनुयायांच्याही मनात सामूहिक रूपाने वसत आहे का ?

## शिक्षणमंत्री छगला व ' हिंदुत्व '

या प्रश्नांची उत्तरे दोन निरनिराळ्या गटात आणि त्यांच्या विचारसरणीत व राजकीय हितसंबंधात शोधावी लागतील. हे दोन गट आहेत शीख आणि शिखेतर लोक. शिखेतर हा शब्द मी मुद्दाम वापरीत आहे. कारण इंग्रजांच्या धूर्त मखलाशीमुळे आणि आमच्या राजकीय नेत्यांच्या अदूरदर्शीपणामुळे या समाजात जे अत्यंत घातुक आणि चुकीचे शब्दप्रयोग गाफीलपणे रुजू देण्यात आले, त्यांपैकी ' सवर्ण हिंदु ', ' शीख आणि हिंदू ', इत्यादी शब्दप्रयोग आहेत. थोड्याशा विषयांतराचा दोष पत्करूनही या संदर्भात मी एका घटनेचा उल्लेख करतो. परवाच स्वातंत्र्यवीर सावरकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दिल्लीत एक जाहीर सभा झाली. तीत ना. शिक्षणमंत्री श्री. महमदअली करीमभाई छगला यांनी आपल्या भाषणात " इथल्या राष्ट्रीय श्रद्धांना आपल्या श्रद्धा मानणारा कोणत्याही धर्माचा असला तरी तो हिंदूच मानला पाहिजे, " असे जाहीरपणे प्रतिपादिले. इतकेच नव्हे, तर त्यांनी पुढे जाऊन असेही सांगितले की, भारतातील प्रत्येकाने त्याच अर्थाने स्वत:ला हिंदू मानायला हवे आहे. तेव्हा हिंदू शब्दाला इतका व्यापक अर्थ प्राप्त होऊ लागला असताना, त्याच्या चतु:सीमा इतक्या क्षितिजस्पर्शी व्हायला लागल्या असताना, हिंदूंमधल्याच एका संप्रदायाला वेगळे लेखणे आणि ' हिंदू

आणि शीख ' असा प्रयोग करणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने सर्वस्वी चुकीचे आहे. किंब-हुना या असल्या गलथान शब्दप्रयोगातूनच शीख समाजात स्वतःच्या पृथक्त्वाची भावना अंकुरली, फोफावली आणि भडकली आणि त्याच भावनेतून पंजाबी सुभ्याच्या जन्म झाला आहे.

या भावनेची व्याप्ती आणि लांबी, रुंदी व खोली यांचे बरोबर आकलन न झाल्यामुळे शिखेतर समाजातील राजकीय नेत्यांनी या मागणीला विरोध आरंभला आणि शीख समाजाच्या सांप्रदायिक वा जातीय श्रद्धा दुखावल्या व दुरावल्याही. वास्तविक १९५६ मध्ये भाषावार प्रांतरचना करण्यात आली, त्या-वेळी काही नसते सोस सोसण्याच्या सवयीने राज्यकर्त्यांनी द्विभाषिक मुंबईचे दुखणे जसे चांगले चार वर्षे अंगावर काढले, तद्वतच त्यांनी द्विभाषिक पंजाबचा रोगही रुजू दिला. इतर सर्व भाषिकांना त्यांनी भाषिक राज्ये दिली, परंतु पंजाबी-भाषी लोकांनाच मात्र ते नाकारले. नेहरूंचे काळात राजकीय घडी बसवणे आणि असलेली विस्कटणे हा खेळ केवळ लोकेच्छेवर चालत नव्हता. लोकेच्छा प्रबळ आणि अनावर झाली की, मगच ते दुसरी बाजू लक्षात घेत. त्यामुळेच मुंबईचा घोळ घातला गेला आणि त्यामुळेच पंजाब हे सरहद्दीवरचे राज्य असल्याने त्याची आणखी फाळणी करणे बरोबर होणार नाही, हा फाळणीची उपरती झाल्या-सारखा विवाद्य मुद्दा पुढे रेटण्यात आला.

नाकातोंडात पाणी जाईपर्यंत आपणच जोपासलेली तत्त्वे अंगाखांद्यावर व प्रसंगी डोक्यावरसुद्धा घ्यायची आणि नाकातोंडात पाणी शिरून ग्रंथ आटोपायची वेळ येताच त्याच तत्त्वांना खाली घालून त्यांच्यावर उभे राहून आली वेळ मारून न्यायची, हा त्या वेळचा खाक्या आणि शिरस्ता होता. त्यानुसार त्या वेळी सच्चर-योजना काढून पंजाबी भाषेला महत्त्व देण्याचे मान्य करण्यात आले. गुरुमुखीत लिहिलेली पंजाबी ही बहुजनसमाजाची भाषा असल्याने ती मान्य करण्यात आली आणि तिला योग्य ते महत्त्व देण्यात आले. परंतु याने शिखांचे समाधान झाले नाही. त्यांनी मास्टर तारा-सिंगांच्या नेतृत्वाने सरकारवर दडपण आणायला सुरवात केली. ते टुमणे आणि त्यांची भुणभुण नकोशी होताच प्रादेशिक-योजना पुढे आली आणि सच्चर जाऊन त्यांच्या जागी सरदार प्रतापसिंग कैरों हे पंजाबचे मुख्यमंत्री झाले. मंत्रि-मंडळाची फेररचना झाली आणि त्यात शीख व शिखेतर लोकांना माफक समतोल प्रतिनिधित्व देण्यात आले. प्रादेशिक योजनेत पंजाब हा हिंदी आणि पंजाबी अशा दोन भागांचा प्रांत आहे, असे मानण्यात आले आणि गुरुमुखीत लिहिली जाणारी पंजाबी ही पंजाबी भागात व देवनागरीतील हिंदी ही हिंदी भागात अनिवार्य करण्यात आली. पं. गोविंद वल्लभपंत त्या वेळी केन्द्र सरकारचे गृहमंत्री होते व ' निबू द्या, मग खा,' हे त्यांचे अशा बाबतीतील धोरण होते.

## फत्तेसिंग आणि तारासिंग

त्याप्रमाणे त्यांनी शिखांच्या तात्कालिक मागणीचा पाठपुरावा केला. कारण शिखांचे नेतृत्व तारासिंगांसारख्या जहालमतवादी, महत्त्वाकांक्षी माणसाच्या हाती होते. त्याने पंजाबीची मुस्कटदाबी होते, या मुख्य मुद्यावर आपली सारी बाजू व पवित्रा घेतला होता. त्या फुग्यातील हवा पंतांनी बरोबर काढून घेतली आणि पंजाबीच्या उन्नतीसाठी सरकार सर्वतोपरी मदत करील, तिची मुस्कटदाबी कदापि होऊ देणार नाही, अशा आश्वासनांनी तारासिंगांना शह दिला. वास्तविक तारासिंग यांना पंजाबी सुभ्याच्या नावाखाली शिखांचे वेगळे राज्य हवे होते आणि ते प्राप्त करून भारतातून फुटून निघून भारत व पाकिस्तान यांच्या दरम्यान तटस्थपणे आपली पोळी व्यवस्थित भाजून घेण्याची त्यांची मनीषा जगजाहीर होती. तिला आळा बसताच तारासिंग खवळले आणि आपल्या आक्रस्ताळेपणापायी तुरुंगात डांबले गेले. नेहरूंच्या सल्ल्याने पं. पंतांनी संत फत्तेसिंग यांना पुढे आणले आणि कैरों यांच्या प्रत्यक्ष मदतीने तारासिंगांचा पंजाबच्या राजकीय क्षितिजावरून पार अस्तच घडवून आणला. पंजाबी सुभ्यासाठी आरंभिलेले उपोषण तारासिंगांनी या निमित्ताने सोडताच त्यांना आपले नेतृत्व ढासळल्याचा प्रत्यय आला व सुवर्णमंदिराच्या दारापाशी बसून अकाल–तख्ताच्या छायेखाली त्यांनी दर्शनेच्छुकांचे जोडे पुसून त्याबाबत 'प्रायश्चित्त'ही घेतले.

पण प्रादेशिक–योजनेची अंमलबजावणी नीट झाली नाही. तिचा लाभ लोकांना दिसेना. अखेर ती योजना कागदोपत्रीच राहिली. दरम्यान संत फत्तेसिंग यांनी मरणान्त उपोषण आणि अंती अग्निकाष्ठभक्षणाचा संकल्प सोडला. संत फत्तेसिंग प्रकृतिधर्माने खरोखरच संत. बोलला शब्द ते खरा करतील याबद्दल कुणालाच शंका नव्हती. त्यामुळे नेहरू गडबडले, नेहरू–संत वाटाघाटी झाल्या आणि संतांनी उपोषण सोडले. शास्त्रींच्या कारकीर्दीतही संतांनी उपोषणाची धमकी दिली होती, पण पाकिस्तानी आक्रमण आणि त्यानंतरची भीषण लढाई यामुळे त्यांनी तो बेत स्थगित केला, पण आपली पंजाबी सुभ्याची मागणी मात्र धसास लावली. शास्त्री गेले व आता इंदिरा गांधी यांनी पंजाबी सुभा देण्याचा मानस जाहीर केला. अर्थात ती घोषणा त्यांनी कॉंग्रेस कार्यकारिणीमार्फत करविली आणि सरकारी घोषणाही लवकरच होणार असल्याचे जाहीर केले. शीख–समाजात यामुळे समाधान पसरले. संत फत्तेसिंग यांनीही निर्णयाचे स्वागत केले आणि निर्णयाचे पालन लवकर व्हावे, अशी इच्छा व्यक्त केली.

पण यामुळे शिखेतर राजकीय नेतृत्व मात्र चिडले आणि आपल्या अनुयायांच्या साह्याने त्यांनी पंजाबी सुभ्याला घोर विरोध आरंभला. निषेध–निदर्शनाला सामूहिक स्वरूप आले आणि त्यातून समाजकंटकांचे फावून लोकशाही–निषेधाला

समूहशाही गुंडगिरीचे रूप येऊन चार माणसे जिवंत जाळून टाकण्यासारखे अमानुष प्रकार घडले. हिंसाचाराचे पेव फुटले. पंधरा माणसांचे प्राण पोलिसांच्या आणि गुंडांच्या तडाख्यात सापडल्याने गेले. नंतर सर्व तेच घडले, जे महाराष्ट्रात महात्मा गांधी–वधानंतर घडले होते. या प्रकरणात साहजिकच अनेकांना अटक झाली आणि त्यांची संख्या दोन हजारांवर गेली त्यात जनसंघ, आर्यसमाज व कॉंग्रेसचे लोक आहेत.

## शिखांचा संयम

या सर्व प्रकरणाला जबाबदार तीन पक्ष : सरकार, जनसंघ व अकाली दल. यांच्यामुळेच हा त्रिकोण वा त्रांगडे निर्माण झाले. पैकी लोकपक्षांची म्हणजे जनसंघ व अकाली दल यांची भूमिका विचारात घेतली तर असे दिसते, की तारासिंग यांच्या नेतृत्वाने काही माथेफिरूपणाची कृत्ये झाली ती सोडली, तर एकूण अकाली दलाने आपल्या पंजाबी सुभ्याच्या मागणीसाठी करावयाच्या लढ्यात फारसा कुठे हिंसाचार केलेला नाही, हे सत्य नजरेआड करता् येणार नाही. मात्र अमृतसरच्या स्वर्णमंदिराभोवती जास्तच मजबूत करण्यात आलेली तटबंदी, आत जमा करण्यात आलेला शस्त्रसंभार, मंदिरावर बसवण्यात आलेला नंग्या तलवारींचा पहारा, वगैरे सर्व घाट एखाद्या युद्धसज्ज किल्लेबंदीची आठवण आणून देणारा होता, हेही येथे नमूद केले पाहिजेच. धर्मस्थानाचा आश्रय घेऊन तिथून राजकारणी डाव खेळण्याचा हा पवित्रा सरकारला माहीत होता. शिवाय, संत फत्तेसिंग यांनी म्हटल्याप्रमाणेच खरोखरच अग्निकाष्ठे भक्षण केली असती, तर त्याचे सामूहिक पर्यवसान कशात झाले असते, याची कल्पनाहीया तयारीवरून येऊ शकते.

शिखांची ही तयारी पाहूनच आणि तारासिंग यांनी दिलेल्या शिखिस्तानाच्या हाकेचा अन्वयार्थ जाणूनच जनसंघ आदि शिखेतर समाजाचे नेतृत्व करणाऱ्या संस्थांनी १९५१ च्या खानेसुमारीचे वेळी आपली मातृभाषा पंजाबी लिहिली होती, तरी हिंदीचा आग्रह धरला आणि इतकेच नव्हे, तर १९६१ च्या खानेसुमारीत आपली भाषा हिंदीच असल्याचे नोंदवले. पंजाबी भाषेच्या बुरख्याआड फुटीर शिखिस्तानाची मागणी पुढे येत असेल तर तिला खो घालण्यासाठी सावे राजकारण म्हणून या देशाशीच एकनिष्ठ असणाऱ्यांनी भाषिक बहुमत हाणून पाडण्याकरता आपली भाषा हिंदी लिहिली असेल, तर ते समजण्यासारखे होते. १९५१ मध्ये वा १९५१ पर्यंत. पण पंजाबी सुभा हे केवळ पंजाबी भाषिकांचेच राज्य होणार, शिखांचे नव्हे, असे आवर्जून आणि तळमळीने सांगणाऱ्या संत फत्तेसिंग यांच्या हातून शिखिस्तानवादी तारासिंग–गटाचा पार धुव्वा उडाल्यानंतर जनसंघप्रभृती राजकीय पक्षांनी राजकारणाचा बदललेला ओघ ओळखला असता तर फार बरे झाले असते. आज पंजाबात पंजाबी ५५ टक्के आणि हिंदी ४५ टक्के असे ढोबळ

प्रमाण लोकसंख्येचे आहे. या ४५ टक्के लोकांपैकी निदान २५ ते ३० टक्के लोकसंख्या अशा लोकांची आहे, की जे आपली मातृभाषा पंजाबी असूनही पक्षाभिनिवेशाच्या नावाखाली ती हिंदी असल्याचे नोंदवून बसले आहेत. कल्पना करा, या ३० टक्के लोकांनी समय जाणून, देशहिताच्याच विशुद्ध भावनेने १९६१ च्या खानेसुमारीस आपली खरी भाषा नोंदविली असती, तर आज पंजाबात पंजाबी बोलणाऱ्यांचे प्रमाण ८० ते ८५ टक्के झाले असते आणि मग फत्तेसिंगच काय, खुद्द तारासिंग जरी राजकारणात पुन्हा उतरू शकले असते तरी आजच्या खंडित पंजाबची आणखी फाळणी करण्याची मागणी त्यांनाही करता आली असती का ? आणि मग उरलेल्या हरियाना भागातल्या लोकांनाही भाषिक अल्पसंख्याक म्हणून इतर प्रांतात आहेत, त्याप्रमाणेच पंजाबात गुण्यागोविंदाने नांदता आले नसते का ?

## अकरणात्मक राजकारण

ज्या भारतीय ऐक्यावर जनसंघ उभा आहे, त्या ऐक्याला आपल्या अनवधानाने जनसंघाने असे तडे जाऊ द्यायला नको होते. हे विधान मी पूर्ण जबाबदारीने करीत आहे. जनसंघाचे कित्येक कार्यकर्ते मला माहीत आहेत. त्यांची भाषा पंजाबीच आहे. मग उगाच हिंदीचा हा नसता पुरस्कार करून राष्ट्रहिताच्या मार्गात नकळत केवढे विघ्न निर्माण होईल, याची थोडी तरी चिंता त्यांनी करायला हवीच होती. शिवाय या देशाची राष्ट्रभाषा हिंदी असताना, हिंदीसाठी आणखी एक वेगळा सवतासुभा मागण्याच्या कल्पनेला अगतिकपणे चालनाच या हिंदी-पुरस्कारातून मिळाली नाही काय ? फुटीर शिखिस्तानाच्या प्रवृत्तीला मुळातच असा खो घालणे हे उत्तम राजकारण ठरले असते, विधायक कामगिरी ठरली असती, इतिहासाने ती अजरामर करून टाकली असती. पण त्याऐवजी जनसंघ आदि पक्ष अकरणात्मक राजकारण खेळत बसले आणि त्यामुळे पंजाबी सुभा तर निर्माण झालाच, शिवाय आपली भाषा हिंदी नोंदवून बसलेल्यांना आता त्याबाबत पश्चात्तापही झाला आहे.


उद्योगपती, सानथोर उद्यमी, व्यापारी वगैरे लोकांचे कोणत्याच भाषेवाचून अडत नसते. त्यांना व्यापाराची, उद्यमाची आणि नफ्याची भाषा उत्तम अवगत असते. राजकारणाचा त्यांच्याशी काडीचाही संबंध नसतो. भाषावार प्रांतरचना झाल्यानंतर कोणत्याही राज्यातून भाषिक अल्पसंख्य लोक निर्वासित म्हणून बाहेर पडलेले नाहीत. पंजाबातून ते तसे बाहेर पडतील, ही केवळ कल्पना आहे, तिलाही वास्तवाचा आधार नाही. हे पंजाबी भाषिक तिथेच राहणार आणि मग त्यांना विशिष्ट दिशेने नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या फोल राजकारणाचे काय ? पंजाब हा भारताचा खड्गहस्त आहे. परंतु खड्ग आणि हस्त यांच्यातच वितुष्ट येण्याचा हा भलताच घाट तिथे पाहा कसा अभावितपणे जमून आला आहे.

## आता तरी सूत्र ठरवा !

राहिला प्रश्न सरकारचा. सरकारने या प्रकरणात चोखंदळ निरीक्षकाची भूमिकासुद्धा बजावली नाही, असे म्हटल्यावाचून राहवत नाही. मंत्रिमंडळाची एक, संसदेची दुसरी, आणि काँग्रेसची आणखी तिसरीच अशा तीन समित्या या प्रश्नाचा विचार करायला नेमण्यात आल्या होत्या. (म्हणूनच त्यांचा तिगस्तिगा झाला की काय न कळे ! ) पैकी एकाही समितीचा अहवाल येण्यापूर्वीच काँग्रेस कार्यकारिणीने पंजाबी सुभा देण्याचा निर्णय करून टाकला. आता विचारविनिमयाचा घोळ घातला जात आहे. आधी फाशी मग चौकशी, यातलाच हा प्रकार. ज्या गोष्टींमुळे हा निर्णय घेण्यात आला, त्यांची चर्चा आधीच संबंधितांशी झाली असती तर? शिवाय या अशा प्रकारच्या एकतर्फी निर्णयामुळे आणखी तसल्याच प्रकारच्या मागण्या पुढे आल्या तर सरकार त्याला कसे तोंड देणार ? दहा वर्षांपूर्वी समाप्त करण्यात आलेली भाषिक राज्याची मागणी अशा प्रकारे पुन्हा जिवंत करता येते, असा बोध कुणी यातून घेतला तर ? शिवाय या पंजाबी-सुभा निर्मितीतही निश्चित असे कोणतेच सूत्र राष्ट्रीय तोडगा म्हणून सरकारने काढलेले नाही. 'धिटाई खाई मिठाई' हाच समज यातून बळावतो. उद्या बेळगाव-कारवार, गोवा, डोंगरी राज्ये, विदेशी वस्त्यांचे विमोचनानंतरचे लगतच्या राज्यात विलीनीकरण, वगैरे ताटकळत पडलेल्या प्रश्नांना तड लावण्यासाठी कुणी 'अग्निकाष्ठभक्षणाचे' अस्त्र सरसकट वापरायचे ठरवले तर ? तर सरकार काय करील या प्रश्नापेक्षाही असे काही तरी केल्याशिवाय सरकार बधतच नाही, असा लोकग्रह लोकशाहीत निर्माण होऊ द्यावा काय, या प्रश्नाला जास्त महत्त्व आहे.

शिवाय भाषिक राज्यनिर्मिती म्हटली म्हणजे सीमातंटे आलेच. त्यासाठी यापूर्वी निर्मिलेल्या भाषिक राज्यातील सीमातंट्यावर सरकारने एकसूत्र तोडगा अद्याप काढलेला नाही. पंजाब्यांना पंजाबी राज्य मिळावे यात वावगे काय आहे ? असलाच तर त्यात न्यायच आहे. अन्याय कदापि नाही. लाला योधराज हे पंजाबातील उद्योगपती शीख-शिखेतर एकतेवरच भर देत आहेत. महाराष्ट्राचे उदाहरण त्यांनी पंजाबातील लोकांपुढे मांडले आहे. अटळ गोष्टींना विरोध मांडून विनाकारण कडवटपणा निर्माण करण्याऐवजी सर्वसंबंधितांनी खड्गहस्त पंजाबवर राष्ट्ररक्षणाचे कवच-कंकण बांधण्याची गरज आहे. त्याकरता निष्कारण आणि काल्पनिक वाद माजवून कोणाचे भले होणार आहे ? हिंदुस्थानात राहून त्याला आपला मानतो तो तो प्राणिमात्र हिंदूच आहे, इथल्या राष्ट्रीय अस्मितेचा घटकच आहे, इतकी व्यापक परिसीमा त्या शब्दाला प्राप्त होत असताना संकुचित जातिवाचक चौकटीतच त्याला जखडून ठेवणे कालविसंगत ठरणार आहे. याच राष्ट्रीय सहिष्णुतेने पंजाबी सुभ्याकडे पाहायला हवे.

• • •



## □ विधानसभेतील मारामाऱ्या

वर्तमानपत्र चाळताना परवा मध्यप्रदेशातील विधानसभेची बातमी एकदम डोळयांत भरली. खरे म्हणजे विधिमंडळातील कामकाजाच्या बातम्या मी तरी फारशा कधी वाचीत नाही. अहो, त्यात असते काय ? फलाणा सभासद असे म्हणाला, मग दुसरा एखादा कुणीतरी तसे म्हणाला. मग सभापती काहीतरी म्हणतात. शेवटी कुठलातरी ठराव पास नाहीतर नापास होतो. त्यात वाचायचे काय ? मी तर असल्या बातम्या सोडूनच देतो बुवा. परवा मात्र झकास बातमी होती. मध्यप्रदेश विधानसभेत भाषणे चालू असताना मधेच एकाएकी वादविवाद आणि गोंधळ सुरू झाला आणि त्या गडबडीत एका सभासदाने सभापतींच्या अंगावर आपले पादत्राणच फेकून मारले ही बातमी वाचल्यामुळे मध्यप्रदेश विधानसभे-बद्दल माझे कुतूहल जरा चाळवले होते. तेवढयात परवा दुसरी वार्ता—मुख्यमंत्र्यांच्या चपराशाने एका काँग्रेस आमदाच्या तोंडात भडकावली म्हणे. मागाहून त्याला माफी मागायला लावली. तूर्त त्याला कामावरून कमीही करण्यात आले आहे म्हणतात. तसे काहीतरी त्या बातमीत पुढे होते म्हणा, पण मला त्यात विशेष काही रस वाटला नाही. हे ' तोंडातोंडी ' प्रकरण मात्र वाचायला जरा बरे वाटले इतकेच.

वर्तमानपत्रांनी या बातम्या चौकटी घालून ठळकपणे छापल्या आहेत, ते काही मला आवडले नाही. मुख्यमंत्र्यांच्या चपराशाने विधानसभेच्या आवारात एका आमदाराच्या मुस्कटात भडकावली ही बातमी वस्तुतः किती क्षुल्लक ! त्याचा एवढा गाजावाजा करण्याचे कारण काय ? अहो, नेहमीच घडणाऱ्या या गोष्टी. चपराशी हा प्राणीच तसा स्वयंसिद्ध आणि आदरणीय. त्याचा धाक कुणाला वाटत नाही ? आणि हा तर मुख्यमंत्र्यांचा चपराशी. त्याला तर काय वाटेल ते करण्याचा

अधिकार आहेच आहे. या जगात शेवटी धन्यापेक्षाही चाकरालाच किंमत जास्ती असते. त्यातून चाकर हा कायमचा आणि धनी बदलणारा असला म्हणजे तर त्याची योग्यता विशेषच मानली पाहिजे. दिल्लीच्या केंद्रीय सचिवालयात एकदा असाच प्रकार घडला म्हणतात. एका मंत्र्याने एका चपराशावर काही कारणामुळे बरेच तोंडसुख घेतले. चपराशीसाहेबांची स्वारी तोंड लांब करून बाहेर खिन्नपणाने उभी होती. तेवढ्यात कुणीतरी सेक्रेटरी, अंडरसेक्रेटरी आले. त्यांनी खुलासा विचारला तेव्हा चपराशीसाहेब दुःखी मुद्रेनें म्हणाले, " देखो ना साब, ये टेंपररी आदमी हम जैसे पर्मनंट लोगोंको फजूल तंग करता है ! "– सारांश काय, या मंडळींचा अधिकार आहेच मोठा. मग मुख्यमंत्र्यांच्या चपराशाने तलाठ्याच्या थोबाडीत मारली तर त्यात एवढे खळबळ माजवण्याजोगे काय आहे ? दुसरा कुणी असता तर खळबळ खरोखरीच उडाली नसती. पण मुस्काडीत ज्यांच्या बसली ते पडले आमदार. त्यातून काँग्रेसचे आमदार, म्हणून घोटाळा झाला. आमदार म्हणजे काय सामान्य असामी ? लोकांकडून निवडून गेलेला प्रतिनिधी तो. त्याचा अपमान म्हणजे लोकांचा अपमान. त्या दृष्टीने त्या चपराशाचे चुकले खरे.

ते जाऊ द्या. एकूण आपल्या विधानसभा, लोकसभा यांत सध्या जरा चैतन्य आलेले दिसते खरे. प्रत्येक ठिकाणी आरडाओरडा, गोंधळ, शिवीगाळ, हद्दपारी वगैरे यथास्थित चालू आहे. महाराष्ट्र तर भारताचा खड्गहस्तच आहे म्हणतात. त्यामुळे आमच्या एका आमदाराने तर मार्शललाच ओरबाडले आणि पेपरवेट वगैरे भिरकावून मोठा रंग आणला. वहाण फेकून मारण्याचे सत्कृत्य अजून कुणी केले नव्हते; ते मध्यप्रदेशाच्या विधानसभेत घडले. ज्या ठिकाणी 'गाढव', 'मूर्ख' असले शब्ददेखील 'पार्लमेंटरी' आहेत की नाहीत, याची गंभीरपणे चर्चा चालते, त्या ठिकाणी हे प्रकार सुरू झाल्यावर कामकाज पुढे कसे रेटावे असा प्रश्न ठिकठिकाणच्या सभापतींना पडला असेल. मला स्वतःला तरी ही अडचण सोडविण्याचा एकच उपाय दिसतो. नाही म्हटले तरी हे प्रकार सगळीकडे सर्रास सुरू झालेच आहेत. मग त्याच्याविरुद्ध आरडाओरडा का करता ? लोकशाही पद्धतीमध्ये याही गोष्टी पार्लमेंटरी आहेत असे एकदा ठरवून टाकावे म्हणजे झाले. फिरून कटकट नाही. विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा इ. ठिकाणी असा नियमच करावा, की सभासदांनी शक्य तितका वेळ शांतपणे चर्चा आणि भाषणे करावीत; पण त्याचा जेव्हा कंटाळा येईल त्या वेळी थोडा वेळ मारामारीही करावी. वाटल्यास सर्व सभासदांना मजबूत आणि भरीव काठ्याच सरकारच्या वतीने पुरविण्यात याव्यात. सभापतींनी स्वतः जिरेटोप, चिलखत असलेला पोषाख नखशिखांत करून त्या ठिकाणी बसावे. बाहेर अॅम्बुलन्स गाडी सदैव तयार ठेवावी. या सगळ्या गोष्टी सनदशीरच ठरवा, म्हणजे काही भानगड उपस्थित होणार नाही. मला जे वाटते ते आपले सांगितले. घटना-तज्ज्ञांनी विचार करावा.

# □ माडगूळकर आणि हिंदी चित्रपट

नाही म्हटले तरी स्वराज्य आणि महाराष्ट्र राज्य आल्यापासून पुष्कळ चांगल्या गोष्टी झाल्या. कलावंतांचा सत्कार होऊ लागला. लेखकांना बक्षिसे मिळू लागली. नाटकावरील करमणुकीचा कर उठला. उत्तम चित्रपटांना पुरस्कार लाभला. पुष्कळ गोष्टी होताहेत, पण आमच्या ग. दि. माडगूळकरांचे अजून समाधान झालेले दिसत नाही. परवा विधानपरिषदेत भाषण करताना ते म्हणाले, "चांगल्या चित्रपटांना सरकार ज्याप्रमाणे पारितोषिके देते, त्याप्रमाणे हीन दर्जाच्या आणि विकृत, चुकीची माहिती देणाऱ्या हिंदी चित्रपटांना सरकारने शिक्षा केली पाहिजे." विकृत आणि चुकीची माहिती कशी दिली जाते, याचे एक उदाहरणही माडगूळकरांनी आपल्या भाषणात सांगितले. 'संत ज्ञानेश्वर' नावाचा एक हिंदी चित्रपट नुकताच निघाला होता. या चित्रपटात ज्ञानेश्वरांची बहीण मुक्ताबाई हिच्यावर बलात्काराचा प्रसंग ओढवल्याचे निर्मात्यांनी दाखवले आहे. अशा चित्रपटांना—म्हणजे त्याच्या निर्मात्यांना—सरकारने शिक्षा केली पाहिजे, असे माडगूळकरांचे म्हणणे दिसते.

माडगूळकर हे सहज बोलून गेले असावेत. आपण काय बोललो आणि त्याचे काय परिणाम होतील, हे त्यांच्या लक्षात आलेले दिसत नाही. हीन दर्जाच्या हिंदी सिनेमांच्या निर्मात्यांना शिक्षा करावी हे म्हणणे सोपे आहे, पण ते हीन आहेत किंवा नाहीत हे ठरवायचे कुणी आणि कसे? चित्रपटाचे ध्येय काय? लोकांची करमणूक करणे आणि आपला खिसा भरणे. हिंदी चित्रपटामुळे लोकांची भरपूर करमणूक होते, ही गोष्ट कुणी अमान्य करील का? मग त्याच्याविरुद्ध एवढी हाकाटी का? तुम्हाआम्हाला करमणूक म्हटल्याबरोबर ज्या गोष्टी लागतात, त्या हिंदीवाले इतक्या मुबलकपणे पुरवितात की, त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानले पाहिजेत. ते बाजूला ठेवून त्यांना शिक्षा करण्याची ही क्रूर सूचना ग. दि. माडगूळकर यांच्यासारख्या एका थोर लेखकास करवते तरी कशी?

हिंदी चित्रपट म्हटला म्हणजे माझे मन तर आनंदाने नुसते मोहरून येते. ज्या दिवशी सिनेमाला जायचे मी ठरवतो तो दिवस माझा किती खुपीत जातो. सिनेमा सुरू झाला रे झाला की चारदोन मिनिटांत पहिले गाणे सुरू होते. ललला...टम् टररा...असा ठेका तुम्ही-आम्ही सगळेच तावडतोब धरतो. आणि गोष्ट तरी किती मौजेची असते हो. हिंदी सिनेमातली नायिका श्रीमंत बापाची एकुलती एक मुलगी. नायक गरीब. तिच्या मोटारीखाली तो सापडतो. मग त्याच्या कपाळाला थोऽऽऽडीशी जखम होते. मग त्याला ती घेऊन आपल्या घरी येते. त्याची शुश्रूषा करते. मग छान-

पैकी दोघांचे प्रेम जुळते. त्यानंतर एकदम काश्मीरची ट्रिप. ('लीना, तुम दोनो अभी पहले प्लेनसे श्रीनगर आना.– पिताजी,' अशी तार एकदम येते, तेव्हा आपल्याला किती मज्जा वाटते, होय की नाही ?) हल्ली तर प्रत्येक हिंदी चित्रपटात काश्मीरचे देखावे आलेच पाहिजेत. काश्मीर भारताचाच आहे, हे सिद्ध करायला आणखी निराळा पुरावा कशाला पाहिजे ? अशा या काश्मीरमध्ये नायक-नायिका प्रेमाचा लपंडाव काय खेळतात, बर्फावरून स्केटिंग काय करतात, शालिमार का कुठल्याशा तलावात नौकाविहार काय करतात. ती पळापळ, ते गवतात लोळणे. 'ऊँहूं...अभी नहीं... मुझे शरम लगती है' म्हणून मारलेला मुरका. वा वा ! माडगूळकरसाहेब, अशा चित्रपटांना आपण हीन म्हणता अं ? दाखवा बरे मराठीत असल्या गमती करून. पाहताना प्रेक्षकांच्या तोंडाला पाणी सुटले पाहिजे, इतका तो प्रसंग रसपूर्ण करण्याची हिम्मत तुमच्यात आहे काय ? नाही ना, मग हिंदी चित्रपटांच्या नावाने बोंब ठोकण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे ?

कसले आले आहे हीन आणि विकृत ? एवढी वर्षे सिनेमा-धंद्यात घालवून तुम्हा मराठी लोकांना या धंद्याची 'बेसिक' तत्त्वे माहीत नसावीत का ? चित्रपटात कमीत कमी सात-आठ गाणी, तीन-चार नाच, चार-पाच लव्ह-सीन, एकतरी खून, निदान बलात्कार, थोडासा पाठलाग, मधूनमधून मारामारी, किंचित देशभक्ती, एखादे भजन, बेताची रडारड, सुंदर चेहऱ्याचे सौंदर्य वाढवील इतके हुंदके–या गोष्टी असाव्याच लागतात. याशिवाय कुठलाही चित्रपट होईलच कसा ? या गोष्टी पूर्णपणे असल्या तरच तो हिंदी चित्रपट होतो बरे ! मी तर त्याशिवाय सिनेमा बघायला जातच नाही. 'ज्ञानेश्वर' पाहिला नाही मी तो एवढ्याचसाठी. मुक्ताबाईच्या 'सीन' प्रमाणेच ज्ञानेश्वरांचेसुद्धा एखादे लफडे दाखवायला काय हरकत होती ? एका सुंदर राजकन्येचे ज्ञानेश्वरांवर प्रेम बसते. तिचा बाप संन्याशाचा पोरगा म्हणून या प्रेमाला विरोध करतो. मग वारकऱ्याचे सैन्य घेऊन ज्ञानेश्वर किल्ल्याला वेढा घालतात. प्रचंड मारामारी. ज्ञानेश्वरांची किल्ल्याच्या तटावर 'जंप.' ज्ञानेश्वरांचा रेडा शत्रू सैन्याच्या अंगावर धावून जाऊन त्यांना भराभर मारून टाकतो. ज्ञानेश्वर पकडले जाणार एवढ्यात निवृत्तीनाथ येऊन त्यांची सुटका करतात, इ. इ. मसाला या गोष्टीत भरला असता तर गोष्ट किती रंगली असती, हे कुणीही चित्रपट-रसिक सांगू शकेल. शेवटी दोघेजण हातात हात घालून 'प्रेमकी गंगा बहाते चलो' हे गाणे म्हणतात. किती मजा वाटेल नाही ?

माडगूळकरसाहेब, जे आपल्याला जमत नाही, ते जमत नाही म्हणावे, हे चांगले. हिंदी चित्रपट-निर्मात्यांवर आगपाखड करून काय फायदा !

## □ मंत्र्यांना शिव्या देण्याची फॅशन

महाराष्ट्र विधानसभेच्या अधिवेशनात पहिल्याच दिवशी स्वर्गीय पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्री यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्या वेळी आचार्य अत्रे म्हणाले, " ज्यांचा ' बँक-बॅलन्स ' शून्य आहे आणि एक फूटभरही जमिनीचा तुकडा ज्याच्या मालकीचा नाही, असा एक मंत्री या देशात होऊन गेला. असे मंत्री या देशात निर्माण व्हावेत, हीच आमची इच्छा आहे. "

अत्र्यांच्या भाषणातले एवढेच वृत्त कुठेतरी वाचले. आणखी ते काय काय बोलले हे कळाले नाही. त्याचप्रमाणे ही वाक्ये उच्चारताना हशा आणि टाळ्या झडल्या की नाहीत, याचा पत्ता लागला नाही. सभागृहात काँग्रेस आमदारांचेच बहुमत असल्यामुळे हा विनोद समजून बरेचजण हसलेही असतील. काहींनी नकळत टाळ्याही वाजवल्या असतील. पक्ष-प्रतोदांनी हसण्यास आणि टाळ्या वाजवण्यास मनाई केली नसेल, तर आमचे लोकप्रतिनिधी हसलेही असतील. कदाचित मंत्रीसुद्धा हसले असतील. आमचे मंत्रीसुद्धा हसतात. नाही असे नाही. कुणी विनोद समजावून दिला तर मग हसू फुटते, हे मी प्रत्यक्ष डोळ्यांनी काही वेळा पाहिले आहे. पण तो महत्त्वाचा मुद्दा नाही. मुद्दा असा, की हशावारी नेण्यासारखी ही गोष्ट नव्हे. आचार्यांची ही श्रद्धांजली वाचून हसू आले नाही, एवढे खरे. उलट माझा काही वेळ मूडच गेला. अंतःकरणाच्या कोपऱ्यात कुठेतरी सुई बोचावी, त्याप्रमाणे वेदना झाल्या. आचार्य अत्र्यांसारख्या शहाण्यासुरत्या माणसाने काय वाटेल ते बोलावे आणि कुणीही त्याचा विरोधही करू नये म्हणजे काय ? मंत्र्यांसंबंधी त्यांची समजूत तरी काय आहे ? एखाद्या लहान पोरालासुद्धा ज्या गोष्टी सहज समजतात त्या त्यांना समजू नयेत याला काय म्हणावे ? "


### आदर्श सद्गुणांची प्रात्यक्षिके पाठवा

पुरुषार्थ मासिकाच्या **' रामराज्य साधनांका '** साठी कौटुंबिक व राष्ट्रीय जीवनास ललामभूत होतील अशा श्रेष्ठ सद्गुणांची अलीकडच्या शे-दोनशे वर्षांच्या कालखंडातील भारतीय प्रात्यक्षिके द्यावयाची आहेत; तरी मातृ-पितृभक्ति, पातिव्रत्य, बंधुप्रेम, स्वदेशाभिमान इत्यादी श्रेष्ठ सद्गुणांची आपापल्या परिसरातील उदाहरणे २० एप्रिल १९६६ पर्यंत ' स्वाध्यायमंडळ –पारडी ' या पत्त्यावर पाठवावीत असे संपादक 'पुरुषार्थ' मासिक कळवितात.

लालबहादूर शास्त्री हे अंमळ चमत्कारिक गृहस्थ होते. देशाचे पंतप्रधान झाले म्हणून काय झाले ? दोष तो दोषच. लोकशाहीच्या या काळात तो उघड केलाच पाहिजे. हे गृहस्थ पूर्वी उत्तर प्रदेशचे गृहमंत्री होते. नंतर ते केंद्रीय मंत्री होते. कुठला तरी रेल्वे–अपघात झाला आणि यांनी ती गोष्ट इतकी जिवाला लावून घेतली, की काही विचारू नका. सरळ अंगाला राख फासून मोकळे. नेहरूंनी पुन्हा त्यांना मंत्री केले. पण यांचे आपले शेपूट वाकडे ते वाकडेच. 'कामराज योजना' आल्याबरोबर हे पुन्हा गोसावी लागले हिंडायला. नशीबच जोरावर, म्हणून पुन्हा बिनखात्याचे का होईना मंत्री झाले. नेहरू गेल्यावर एवढा मोठा चान्स मिळाला. मध्यंतरी केवढी तरी लढाईची धामधूम होऊन गेली. आणि ताश्कंदला गेले ते काही बिचारे परत आले नाहीत. बायकापोरे उघड्यावर पडली. एवढ्या मोठ्या कुटुंबाचा चरितार्थ कसा चालवता, असा प्रश्न सगळ्यांना पडला. हे सगळे कशामुळे घडले ? शास्त्री-बुवांनी पैसा मिळवला नाही. स्थावर–जंगम इस्टेट केली नाही म्हणूनच ना ? मग असल्या भालत्याच गोष्टीची एवढी स्तुती करण्याचे काय कारण ?

त्यांच्याजागी आमच्या मंत्र्यांपैकी कुणी दुसरा एखादा मंत्री असता तर त्याने केवढे धोरण ठेवले असते. दहा–वीस लाख रुपये चार-सहा महिन्यांत कमावून तो मोकळा झाला असता. पाच-सात ठिकाणी त्याने जमिनी विकत घेतल्या असत्या. थंड हवेच्या ठिकाणी चार–दोन बंगले बांधून टाकले असते. कोठे हॉटेले काढली असती. कोठे चित्रपटगृहे ताब्यात घेतली असती. कोठे विमान वाहतूक आपल्या खाजगी मालकीची केली असती आणि अशा रीतीने बायकापोरांची थोडीफार सोय बिचाऱ्यांनी करून ठेवली असती. मग ते केव्हाही मेले तरी हरकत नव्हती. आमच्या मंत्र्यांनी देशाची एवढी मोठी सेवा करावी आणि त्यांच्या बायकापोरांनी उघड्यावर पडावे, ही गोष्ट कोणीही सहृदय माणसाला पटण्यासारखी आहे काय ? शेवटी जीवन हे क्षणभंगुर आहे, हे खरे की नाही ? शहाण्या माणसाने 'आपण मेलो तर ?' या प्रश्नाचा विचार करून भविष्यकाळ सुखात जाईल, अशी तजवीज करावी, हेही सत्य आहे की नाही ? विमा—योजना याचसाठी आहे ना ? मग आमच्या मंत्र्यांनी त्याप्रमाणे वर्तन केले तर बिघडले कोठे ? रोज पै–पैसा करून त्यांनी दहावीस लाखांची पुरचुंडी बँक–बॅलन्स म्हणून साठवून ठेवली, दहा-पाच ठिकाणी चांगल्या जमिनीच्या धांदोट्या आपल्या मालकीच्या केल्या, तर त्यात एवढे ओरडण्यासारखे काय आहे बरे ! कोण केव्हा मरेल, याचा या नश्वर जगात काही भरवसा आहे काय ? उद्या राजकारणाने पलटी घेतली आणि ही बिचारी गरीब माणसे अन्नाची भ्रांत पडून वणवण फिरू लागली, तर त्यांची पोटाची काही सोय हवी की नको ? मग झाले तर ! उगीच कुणीही उठावे आणि मंत्र्यांच्या नावाने चार बोटे मोडावीत ही आजकाल फॅशनच पडली आहे !

**—ग्यानबा**

# विचार धारे

समीर

## • योजनेचा अतिरेक

हिंदुस्थानात दोन गोष्टींचा अतिरेक आहे– योजना आणि संतती, असे परखड मत परवा एका परदेशी अर्थशास्त्रज्ञाने दिल्लीत वार्ताहरांशी बोलताना प्रकट केले. डॉ. जे. एस्. हंक या पश्चिम जर्मन-अर्थशास्त्रज्ञानाच्या मते हिंदुस्थानातल्या उद्योगधंद्यांपैकी २० टक्के उद्योगधंदे फक्त ६० टक्के उत्पादनक्षमतेवर चालू आहेत; याचे मुख्य कारण म्हणजे योजनेचा अतिरेक. योजना ही सर्वसाधारण आराखड्यापुरती मर्यादित असावी व त्या आराखड्याच्या मर्यादेत 'मार्केट फोर्सेस्' ना पूर्ण वाव देण्यात यावा.

परदेशी भांडवल भारतीय उद्योगधंद्यात गुंतविण्याच्या दृष्टीने येथले वातावरण अनुकूल नाही आणि ही खेदाची गोष्ट आहे, कारण हिंदुस्थानाला परदेशी चलनाची निकडीची गरज आहे. उद्योगधंदे चालविणाऱ्या मंडळींचा विश्वास नष्ट करणे सोपे असते, पण संपादन करणे कठीण असते. या अनुषंगात डॉ. हंक यांनी स्पष्टपणे असे मत मांडले, की राष्ट्रीयीकरणाचे भय पसरवून अशोक मेहता यांनी सरकारचे अहित केले आहे. सरकारी क्षेत्रातले उद्योगधंदे खासगी क्षेत्राइतके चांगले चालत नाहीत, असे अशोक मेहतांनी कबूल केल्याचे हंक म्हणाले.

भारतीय चलनाचे अवमूल्यन करून परदेशी चलनाची समस्या सुटणार नाही, पण उद्योगधंद्यांच्या उत्पादनक्षमतेचा अधिक उपयोग झाला, तर परदेशी चलनाची समस्या सोपी होईल आणि औद्योगिक विकासालाही मदत होईल. भारताच्या औद्योगिक विकासातल्या एका लहानशा पण दूर करता येण्याजोग्या अडथळ्याचा हंक यांनी उल्लेख केला. तो म्हणजे येथला पेटंट–विषयक कायदा. आर्थिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी भारताचा पेटंट–कायदा बदलला पाहिजे, असे त्यांनी म्हटले. विशेषतः, दहा वर्षांच्या पेटंट–मुदतीमुळे औषधांच्या संशोधनाला प्रोत्साहन मिळत नाही; कारण वास्तविक पाहता एखाद्या नव्या औषधाला फक्त ५–६ वर्षेच पेटंटचे संरक्षण मिळू शकते.

## • व्यावसायिक मध्यस्थी

आंतरराष्ट्रीय औद्योगिक विकासाशी संबद्ध अशा आणखी एका गोष्टीवर तज्ज्ञविचार ऐकायला मिळाले. 'आंतरराष्ट्रीय व्यापारी तक्रारी–' प्रा. मार्टिन डॉम्के या अमेरिकन तज्ज्ञाने दिल्लीत या विषयावर भाषण करताना म्हटले, की आंतर-

राष्ट्रीय व्यापार झपाट्याने वाढत असल्याने व्यवसायविषयक मध्यंस्थी (आर्बिट्रेशन) च्या समस्या वाढत आहेत. अमेरिकेसारखे श्रीमंत देशही निर्यात व्यापारावर अवलंबून आहेत. प्रगतिशील देशांनी आयात आणि निर्यात यांचा समन्वय साधल्या-खेरीज त्यांच्या अर्थव्यवस्थेला स्थैर्य येणे शक्य नाही.


व्यापारी मध्यस्थीच्या समस्या पुष्कळदा वकील-मंडळींमुळे कठीण होतात, कारण वकील कायद्याच्या शब्दच्छल करीत बसतात. उलट मध्यस्थीचे काम व्यवसायी मंडळीकडे सोपविले तर ते बिनबोभाट पार पडते. कारण व्यापारी-मंडळींना वाद-विवाद करीत बसण्यापेक्षा व्यापार वाढविणे अधिक महत्त्वाचे वाटते. मध्यस्थीच्या कल्पना काळानुसार बदलल्या आहेत. पूर्वी साम्राज्यवादी देश आपल्याला फायदे-शीर अशा कायद्याप्रमाणे चालत, पण आता जसजसे अधिकाधिक देश स्वतंत्र होत आहेत, तसतशी व्यावसायिक संघर्ष मिटविण्यासाठी न्याय्य व तटस्थ यंत्रणा अस-ण्याची गरज अधिकाधिक भासू लागली आहे. देशांतर्गत व्यापारातल्या तक्रारीही मध्यस्थाकडे सोपवाव्यात, म्हणजे आंतरराष्ट्रीय मध्यस्थीवरचा विश्वास वाढेल. याच्या जोडीला निर्यात मालाच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवण्यासाठी व्यापाऱ्यांनी आपण होऊन एखादी यंत्रणा उभारावी.

## ● भारत–दर्शन

हिंदुस्थान हा बघण्यासारखा देश आहे, पण या दर्शयनीतेचा योग्य तो फायदा आपल्याला का मिळत नाही ? मध्यंतरी दिल्लीला आलेले हवाईचे प्रवास-तज्ज्ञ श्री. रॉबर्ट ॲलन यांच्या मते प्रवासी मंडळींच्या गरजा काय असतात, याचे पद्धतशीर संशोधन व्हायला हवे. हवाईचे गेल्या वर्षीचे प्रवासी–उत्पन्न सुमारे १२५ कोटी रुपये होते, ते कशाच्या बळावर मिळाले ? तेथे कॉम्प्यूटरसारख्या अद्ययावत यंत्रसामग्रीने सुसज्ज असे स्वतंत्र खाते देश बघायला येणाऱ्या प्रवाशांच्या आवडी–निवडीचे संशोधन व पृथक्करण करीत असते; त्यामुळे सर्व जगातल्या प्रवाशांच्या प्रवासविषयक व खर्चविषयक संबंधीची माहिती त्यांच्याजवळ उपलब्ध आहे.

हिंदुस्थानात अशा प्रकारच्या प्रवासाला पद्धतशीर उत्तेजन देण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी परकीयांच्या मनात हिंदुस्थान म्हणजे दारिद्र्य आणि घाण, असे जे चित्र आहे, ते बदलायला हवे. केवळ थोड्याशा ऐतिहासिक अवशेषाच्या बळावर प्रवासी मिळविता येत नाहीत. नवीन प्रकारची आकर्षणे व सुखद प्रवासाच्या सोयीं-चीही आवश्यकता आहे. दुसरे म्हणजे परदेशी प्रवास–एजंटांचे सहकार्य मिळविण्या-साठी हिंदुस्थान पुरेसे प्रयत्न करीत नाही. या मंडळींच्या सहकार्याशिवाय कुठल्याही देशाला आपल्याकडे प्रवाशांना आकर्षिता येणार नाही.

● ● ●



# गाणेवाला पक्षी

वसुधा पाटील

कॅमेरा गळ्यात अडकवून, उन्हात तापून निघालेल्या गॅलरीत प्रथमच जेव्हा तो आईसमोर उभा राहिला, तेव्हा आम्ही सारी भावंडंच काय पण आईही चकित होऊन क्षणभर त्याच्या लालेलाल पडलेल्या गोऱ्या गोऱ्या तोंडाकडे पाहत राहिली. भारी म्हणजे भारीच देखणा होता गडी—उंच नि धिप्पाड. बरं, चेहेरा म्हणावं तर अगदी भावडा नि बालिश. हा पारशी बाबा कोण ? कुठला ? भरदुपारचा कशासाठी आलाय ? आणि विशेष म्हणजे आमच्याकडे याचं काय काम ? ही सारी प्रश्नचिन्हं, एकाच वेळी आमच्या सर्वांच्या उघड्या तोंडावर आणि विस्फारलेल्या डोळ्यांत उमटली होती—अगदी आईच्या गंभीर चेहेऱ्यावरसुद्धा.

त्या वेळी खूप पारशी लोक ट्रिपला म्हणून स्टेशनावर उतरायची. ताडीच्या गुत्त्यातून घोळक्यांनी हिंडायची. जरा पलीकडच्या रानातून दुपारपासून संध्याकाळ-पावेतो भटकून यायची. पुन: गाडी पकडायच्या आधी पिण्याचा, खाण्याचा कार्यक्रम व्हायचा. गळ्यात गळे, हातात हात घालून तरंगत तरंगत नाच, गाणी, विनोद, गप्पाटप्पा, हसणंखिदळणं चालायचं. लहानसहान पोरंटोरं, मोठाल्या झगेवाल्या मुली, विलायती कपड्यातली तरुण पोरं, डगले नि उंच टोप्या घातलेले प्रौढ पुरुष



"असा रडावा नाय मैनाबाय. प्लीज स्माईल. तुजा नाव मैना हाय, गानेवाला पंछी, याने, द सिगींग बर्ड." कविमनाच्या जहांगीरचं बोलणं मी कसं विसरू शकेन ?

*

आणि रेशमी, जॉर्जेटच्या साड्यांतल्या बाया, साऱ्यांचे मिळून खेळ व्हायचे; बाजे वाजायचे; शेंगांचे खुळखुळे वाजायचे; शिट्या वाजायच्या—मोठी मजाच मजा उडायची. एखादं दुसरं ढोलकंही असायचं. त्यामुळे त्यांना घेऊन परत जाणारी गाडीही नुसती दणाणून जायची. आम्ही गच्चीतून सर्व काही उत्सुकतेने पाहायचो—खूप मजा वाटायची—खुदखुदून हसू फुटायचं. त्यांच्यात सामील व्हावंसं वाटायचं. आई तेवढी म्हणायची, "मेल्यांना नाहीत धंदे ! लाज, शरम, कोळून प्यायलेत जसे ! म्हातारे, म्हाताऱ्याही नाचताहेत काय, गाताहेत काय...... !"

पण दुपारी दारात उभा राहिलेला तो पारशी बावा मात्र आईला मुळीच वाईट वाटला नाही. आम्हालाही नाही—विशेषत: मला आणि धाकट्या भावाला तर फारच आवडला तो. तो, त्याच्या पांढराशुभ्र परीटघडीचा ड्रेस आणि चामड्याच्या केसमध्ये अडकवलेला त्याचा कॅमेरा—तिन्हीही आम्हाला फार फार आवडले, पण बोललो मात्र कुणीच नाही—नुसती बघतच राहिलो.

"ये वाडीमंदी मालक कोनकडं राहाते ?" शेवटी कपाळावरचा घाम रुमालाने खसाखसा पुसून त्यानेच आळीपाळीने आमच्याकडे पाहत विचारले.

आम्ही कुतूहलाने आईकडे पाहिले. आई शांतपणे म्हणाली, " मालकीण मीच. काय काम आहे ? ताडीचे गुत्ते आमच्या वाडीत नाहीत–तो रस्ता दिसतो आहेना ? त्याच्या पलीकडे ते खोपट आहे बघा. त्या तिथे ......"

आम्हाला अगदी रागच आला. पारशी म्हटला की, ताडीच्या गुत्याचीच आईला आठवण का यावी नकळे ! शिवाय तिचा एकंदरीत सूरच असा खटकणारा होता, की आम्हाला वाटलं हा चुकूनमाकून आमच्या घरात शिरलेला बाबा ताबातावाने नक्कीच पायऱ्या उतरणार–पण तसं काही झालं नाही. उलट तो रुमाल खिशात ठेवीत मजेशीर हसला–इतके सुंदर दात होते. त्याचे ! मला तर माझ्या पडलेल्या दातांच्या जागी वेडेवाकडे, एकावर एक कुरघोडी करून वेगाने पुढे येणारे नवे दात आठवून लाजच वाटली. मी गप्पकन तोंड मिटून घेतले.

" मला ताडीवाडी, तसला काय नकोच हाय. त्येच्यासाठी नाय मी पुसते. मला रूम पायजे–कमरा...कमरा याने जगा...राह्यसाठी जगा पायजे...तुमच्यापासी एक-तरी रूम खाली असेल न ! प्लीज...भाडावाडा कुछ होईल तो देल–पन बडी मेहर-बानी होएल रूम दिली तर. ".. तो अजीजीने म्हणाला आणि त्याने कॅमेऱ्याची चाळवाचाळव सुरू केली.

मोठ्या भावाकडे एक डब्बडा बॉक्स कॅमेरा होता. नाना खटपटी लटपटी करून तो दुरुस्त करण्याचे अनेक प्रयत्न त्याने केले होते, पण तो ना धड दुरुस्त झाला होता, ना त्याला नवा कॅमेरा घेण्याची परवानगी मिळाली होती. तो बाबाजीच्या कोऱ्याकरकरीत आणि फर्स्टक्लास मॉडेलच्या कॅमेऱ्याकडे आशाळभूत नजरेने पाहतच राहिला. मी आणि धाकटा भाऊ त्याच्या गोऱ्यापान पंजाच्या लालसर बोटावर चम-कत असलेल्या पोवळ्याच्या अंगठीकडे आणि मनगटावरील मोठ्या घड्याळाकडे टक लावून पाहत राहिलो आणि आई त्याच्या हसऱ्या तोंडाकडे. त्याच्या उन्हाने तांबुस झालेल्या गळ्यात काळा दोरा होता. झकासच दिसत होता. कसा कुणास ठाऊक, पण आईला त्याचा विश्वास वाटला. कदाचित त्या काळ्या दोऱ्यामुळे असेल. कदाचित त्याच्या हसऱ्या, भावड्या चेहेऱ्यामुळे असेल. देवच जाणे. पण ती कलती मान करून म्हणाली,

" दोन खोल्या आहेत–मुंबईसारखे लाईट नाहीत, नळ नाही–विहिरीचं पाणी काढावं लागेल–भाडं सात रुपये–जमत असेल तर बघा. "

त्याने कॅमेऱ्यावर बोटानं ताल धरीत, जरा वेळाने विचार करून म्हटले, " एक कमरा द्याल काय ? तीन रुपये देईन. त्याचा असा हाय, बापासंगं झगडा करून आला हाय–खिसामंदी दमडा नाय. होता नोता तवडा या कॅमेऱ्यामंदी खलास करून टाकला. आता एक मयना कसाबसा निगाला पायजे का नको ? कमाई जाली म्हंजी भाडावाडा देऊन टाकेल. नल, बत्ती काय बी नसला तरी चालेल. मंग देते काय एक कमरा ? बडी मेहेरबानी होएल– "

बावीस वर्षापूर्वीची ही गोष्ट. आई कबूल झाली आणि जहांगीर मेरवानजी बाटलीवाला तीन रुपये भाड्याच्या मागीलदाराच्या खोलीत मधल्या चाळीत राह्यला आला. पहिल्याच दिवशी त्याच्या खोलीत जाऊन मोठ्या भावाने त्याचा किमती कॅमेरा प्रथम दुरून पाहिला नि नंतर जवळ येऊन हाताळूनही घेतला. जहांगीरने लागलीच त्याला हातातलं काम टाकून त्यातील सर्व कळी, खाचाखोचा प्रात्यक्षिकासह नीट समजावून सांगितल्या नि फोटो काढायला शिकवायचंही कबूल केलं. शीळ घालीतच भाऊ घरी आला.

नंतर तोंडात बोटं घालून मी-तू, तू-मी करीत मी आणि धाकटा भाऊ पोपट हळूच आत शिरलो–

"हॅल्लो...कम ऑन माय लिटल फ्रेन्डस्...... " गोड हसून त्याने आमचं स्वागत केलं. भीड चेपून आम्ही धिटाईने त्याच्याजवळ गेलो आणि दोघांनाही दोन बाजूंना पण जवळ घेऊन तो खाटेवर बसला.

"तुमचा नाम काय ? " त्याने माझी हनुवटी वर उचलीत विचारलं. मी झग्याचा बोळा तोंडात कोंबून उत्तर दिलं, " –मैना...... "

"ओ, हाऊ नाईस–मैना...मैना......याने गानेवाला पंछी. वंडरफुल." तो स्वतःशीच पुटपुटत राहिला. मग त्याचं लक्ष माझ्या तोंडातल्या झग्याच्या बोळ्याकडे नि नादात हलणाऱ्या, मागेपुढे होणाऱ्या मळलेल्या दोन्ही पायांकडे गेलं.

"हाऊ डर्टी यू आर मैना . . ." बोलत बोलत त्याने माझ्या तोंडातला बोळा काढला आणि अलगद उचलून मला मोरीच्या कट्ट्यावर ठेवून, ग्लासाने माठातलं पाणी पायांवर ओतायला सुरवात केली. "धोऊन टाक नी . . . कितने गंदे पाव तुमचे–धोव–धोव–नी–" पाणी ओतता ओतता तो म्हणाला. मी मुकाट्याने पाय चोळून स्वच्छ केले. दातांची शरम होतीच. आता पायांची नवी शरम. त्याचे पाय किती गोरे गुलाबी नि स्वच्छ होते ! मग त्याने परीटघडीचा स्वच्छ टॉवेल काढला आणि माझे पाय स्वच्छ पुसून टाकले. स्वतःच त्याच टॉवेलने पोपटचेही पाय स्वच्छ केले. वेगळ्या रुमालाने त्याचं नाक स्वच्छ केलं आणि मग एक एक पापी घेऊन, टॉफीच्या डब्यातलं एक एक चॉकलेट, स्वतःच कागद सोलून तोंडात भरवलं.

"कशा काय वाटते आता ! एव्हरी थिंग ओके ? " त्याने हसून विचारलं.

"चाकोलेत गोलगोल आहे . . . " पोपट मिटलेल्या ओठांतून लळवळत येणारी चॉकलेटी लाळ कशीवशी आवरीत म्हणाला–" चॉकोलेत शान शान आहे." आपलं मत त्यानं कसंबसं पुरं सांगून टाकलं. कारण अजून चॉकोलेट त्याच्या तोंडात होतंच. जहांगीरने प्रश्नार्थक मुद्रेने माझ्याकडे पाहिलं. माझं चॉकोलेट एव्हाना खाऊन संपलं होतं. पण चव अजून रेंगाळत होती जिभेवर. मी नुसती लाळ घोटीत म्हणाले, "कसं होतं ते समजायच्या आधीच चॉकलेट घशातून खाली गेलंना–मग कळलंच नाही कसं होतं ते."

" ओह्, यू नॉटी गर्ल . . . " खदखदा हसून त्याने मला वर उचलून भिरकाव-ण्याचा आव आणला. "तुमचा पर्पज् समजला आमाला मैनाबाय–लवाड छोरी. . . मजाक करते काय आमची " –आणि मला तसंच कॉटवर अलगद ठेवून परत त्याने डबा उघडून चॉकलेट सोलून भरवली. नंतर किती वेळ आम्ही तिथं होतो देव जाणे, पण घरी परतताना मात्र आम्हाला दोघांनाही एकदमच वाटलं, की जहांगीर आपला नवा दोस्त–आपल्या मनातल्या सगळ्या गोष्टी दुसऱ्या कुण्णाला सांगायच्या नाहीत, पण फक्त जहांगीरला एकट्यालाच सांगायच्या आणि त्याच्या खोलीतच आता एकसारखं खेळत बसायचं. शिवाय आपण जमवलेल्या सगळ्या चांद्या, मोर-पिसं, मणी, काचा त्यालाच दाखवायच्या–बाकी कुण्णाला नाही. –

पण आम्हाला नेहमीच त्याच्या खोलीत जायला मिळे असं नाही. बघावं तेव्हा त्याच्या खोलीला कुलूप असे. अष्टौप्रहर डोळ्यांवर काळा चष्मा आणि हातात कॅमेरा घेऊन तो कुठे कुठे हिंडत असे. कुठे जेवायचा, कुठे चहा घ्यायचा, ते आम्हाला कधी कळतच नसे. रात्री आठच्या नंतर डोळ्यांवर येणारी झापड आवरणं आम्हाला मुष्कील व्हायचं. मग कसला अभ्यास नि कसलं काय ? केव्हाच अंथरुणात आम्ही मुरकुंड्या मारून झोपून जायचो नि आई नंतर दिवा मालवून टाकायची. त्यानंतर रात्रीचाच तो कधी तरी येत असावा. आम्ही तर कधी चौकशी केली नाही. कारण चौकशा, आमच्या वयाला न शोभणाऱ्या चौकशा केल्या, की आईकडून खरपूस मार मिळायचा. शिवाय लेक्चर. सकाळी मग आमची शाळा–मिळून चारचार, पाचपाच दिवस जहांगीरची आमची भेट नसे. मग एखादे दिवशी हातात बालदी, एनॅमलचा लोटा, साबण, दोरी, टूथपेस्ट, ब्रश आणि खांद्यावर भला मोठा रंगीत टर्किश टॉवेल घेऊन विहिरीशेजारच्या टाकीच्या कट्ट्यावर आपल्याच तंद्रीत स्वस्थ बसलेला तो दिसायचा–कारण दोन्ही रहाटांवर बाया, गडीमाणसांची खूपच वर्दळ असायची. मी शांत होईस्तोवर त्याचं ब्रशने दात घासणं, खडाव घालून हिंडणं चालूच असायचं. आमची चाहूल लागली की तो टाकीवरूनच ओरडायचा, " हॅलो ! कम ऑन् पोपट-मैना ! किती दिवस बीतले ! तुमची आमची मुलाकात जाली नाय. " . . . आई डोळ्यांनी दापायची, पण आमची चुळबूळ काही केल्या थांबत नसे. मग कातावून ती म्हणायची, " काय कार्ट्यांना भुरळ घातलीय मेल्याने देव जाणे. सारखी तडफडताहेत त्याच्या-साठी. जा एकदाचे नि करा कानगोष्टी ! कसली मेली कुतूकुतू चालते एकसारखी ती ऐकायलाच हवी एकदा. " पडत्या फळाची आज्ञा ती. शिरसावंद्य मानून आम्ही टाक्यावर धाव घ्यायचो. किती वेळ आमच्या गप्पा चालायच्या ! मुख्य म्हणजे दात घासत असताना तो बोलतच नसे, बोलायचो, धडपडायचो ते आम्ही दोघंच. मी नि पोपट. तो नुसतं ऐकत राहायचा. गप्पांचे विषय ? हवे तेवढे ! बारीक, जमिनीत घरं करून राहणाऱ्या मोरांपासून- ते आकाशातल्या सूर्यापर्यंत–पाऊस-

पाणी, चिखलापासून ते मारकुटचा शेंडेमास्तरांपर्यंत–वचावचा करून आम्ही वडबडायचो नि तो गमतीने ऐकत राहायचा. झाडं, आकाश, रस्ता यांकडे पाहत मधून हुंकार देत तो स्वस्थ राहायचा. मग त्याचं सारं काही आटोपलं, की आम्हाला खोलीत घेऊन जायचा. मग मात्र बडबड सुरू व्हायची त्याची. नवीन नवीन फोटो काय दाखवायचा, आल्बम किती पुढे करायचा, काँपोझिशन, बॅलन्स, रॅपिडिटी, वगैरे वगैरे शब्द पेरून किती वेळ बोलत बसायचा. सारी मजाच मजा. किती तरी मासिकांतून त्याने काढलेले फोटो यायचे. त्यावर त्याची लपेटदार सही असायची- वी. जहांगीर. ती पाहून आम्हांला खूप म्हणजे खूपच अभिमान वाटायचा. कारण ते सारे फोटो त्या मासिकांकडे जायच्या अगोदर आम्हाला त्याने आवडीने, कौतुकाने दाखवलेले असायचे. जवळ उभं राहून, लांब जाऊन त्याच्या जोडीनेच आम्हीही ते पाहिलेले असायचे.

एकदा एक फोटो त्याने दाखविला तो असा होता. डिशमध्ये चांगली न्याहारी मांडलेली आहे. मागेच एका पुस्तकावर घड्याळ आहे. दुधाचा उभा ग्लास शेजारीच आहे नि त्यामागे सुंदर फ्लॉवरपॉट. एकच मला खटकलं ते म्हणजे डिशच्या शेजारी एक अंडं फुटलेलं होतं नि सगळा बलक टेबलाच्या काचेवर पसरला होता. मी नापसंतीने म्हटलं होतं,

" हे काय जहांगीर ! अंडं फुटलेलं कशाला दाखवलंस ? कसं तरीच वाटतं मग . . . "

" का बरं ! आमाला समझून देल का नाय ! कसा तरी का वाटते ? " त्याने मिस्किलपणे हसून विचारलं.

" हे बघ, एक अंडं कुणाच्या तरी पोटात तरी गेलं पाहिजे, नाही तर त्यातून पिल्लू तरी आलं पाहिजे बाहेर. दोहोंपैकी एक हवं ! हे असं वाया कशाला घालवायचं ? " माझा विचार मी त्याला स्पष्ट सांगून टाकला. " आणि सारखं वाटतंय, की हा बुळबुळीत बलक आता सगळीकडे पसरणार नि घाण होणार सगळीकडे–शीशी ! " मी नाकही मुरडलं.

जहांगीर हसत सुटला. फोटो माझ्या नाकाला लावून म्हणाला, " घान येते का बघ मैना–बघ नी ......" मी नि पोपट पळालो होतो. पण एवढं खरं की, आमच्या बडबडण्याची त्याला भारी गंमत वाटायची. खूप प्रश्न टाकून तो आम्हाला दोघांनाही बोलतं करायचा आणि आमची बाळबुद्धीची टीका आनंदाने ऐकून घ्यायचा. एकदा एका म्हाताऱ्याला, सगळ्या अंगाला तेल लावून, तुकतुकीत करून, उन्हात पायरीवर बसवून त्याने फोटो काढला होता. कापसाच्या बोळ्याने त्याच्या घाणेरड्या कळकट अंगाला तेल लावताना त्याला जराही घाण वाटली नव्हती. पाणी भरणाऱ्या बायकांचे, वाडीचा केरकचरा काढणाऱ्या गड्यांचे, रस्त्यावरनं धूळ उडवीत येणाऱ्या-जाणाऱ्या बैलगाड्यांच्या तांड्यांचे, उन्हातानातून हिंडून त्याने कितीतरी फोटो

काढले होते आणि आम्ही त्यावर मल्लीनाथी केली होती. एकदा त्याने आईला फोटोविषयी विचारले. आईने हसून "हो" म्हटलं, मग सर्वांचे फोटो त्याने काढले आणि महिनाअखेरीस फोटो एनलार्ज करून एका पाकिटात घालून आणि सोबत एक चिठ्ठी लिहून पोपटबरोबर पाठवले. फोटो फारच मस्त आले होते. पुनः पुनः प्रत्येकाने ते नीट निरखून पाहिले. सगळ्यांच्या देखतही आणि खोलीत जाऊन पुनः एकेकटयानेही. सारे खूष झालेच, पण आवडली नाही कुणाला एकच गोष्ट—जहांगीरची ती चिठ्ठी. बेटयाने लिहिलं होतं, "तीन महिन्यांचं भाडं या फोटोंच्या किमतीतून वळते करून घ्यावे—" आईची आग तळपायाची मस्तकाला जाऊन पोहोचली. आम्हाला खरं म्हणजे चिठ्ठी—प्रकरण काही समजलंच नाही. उलट माझं नकटं नाक आणि वेडेवाकडे दात फोटोत आले नव्हते म्हणून मी खुषीत होते आणि पोपट ओठांचा चंबू करून होता, तरी रडवा न वाटता हसरा वाटत होता म्हणून तोही खूष होता. खरं म्हणजे सारीजणं खूष होती, पण चिठ्ठीने घोटाळा करून ठेवला. आईने त्याला बोलावून घेतले आणि हाताशी नव्हते तरी मामांकडून उसने आणून त्याच्या अंगावर दहा रुपयांची नोट फेकून ती कडाडून म्हणाली, "हे पाहा बाटलीवाले. तुमचा हा व्यवहार आम्हाला बिलकुल पसंत नाही. फोटो काढायचं तुम्ही विचारायला आलात म्हणून काढवले. एरवी गरज नव्हती. बरं, काढलेत ते काढलेत नि हा असा सौदा करता आमच्याशी? हे घ्या तुमचे पैसे नि आमचं भाडं मात्र तुम्हाला भरलं पाहिजे—नाहीतर खोली खाली करून जा. एरवी सारी ऐटी करता नि पैशांसाठी हा असा व्यवहार करता? तुम्हाला काही वाटत नाही?......"

जहांगीर विरमला. "माफी करा, चुकलो. तुमी आमच्या ममीसारीक्या! तुमचे लोकांसी कसला वेवहार आमी करेल! पन भाडावाडा कुछ या ती मैन्यामंदी देऊ सकलो नाय म्हून फोटोची वार्ता केली! नाय तर नाय केली असती." पुनः पुनः गालावर चापटया मारून तो दिलगिरी प्रदर्शित करू लागला. तशी आईही शांत झाली. मला मात्र खूप वाईट वाटलं. एरवी सारे भाडं बुडवत होते, त्यांतलाच हा एक! एवढं काय पण आईने जिवाचा राग करून घ्यायचा! बिचाऱ्याला माफी मागायला लावली ती आम्हा सर्वांच्या देखत! मी आणि पोपट आईचा डोळा चुकवून त्याच्या मागोमाग खोलीवर गेलोच.

"हार्टी वेलकम माय स्वीट बर्डस्." हसून त्याने आमचं स्वागत केलं. मी तर गारच झाले. आता या गृहस्थाला काय म्हणायचं! आई म्हणायची तसा खरोखरच हा निलाजरा, निगरगट्ट नि गेंड्याच्या कातडीचा होता की काय? मी गोंधळून बावळटासारखी बघतच राहिले. पोपट म्हणाला, "झांगील, तू लडला नाय ना? आई ओलडली म्हणून? डोले पूछ आं? आईशी आमी गट्टी फू घेऊ!"

त्याने पोपटला उचलून पापे घेतले. दोनदोन लिमलेटच्या गोळ्या काढून हातावर

ठेवल्या नि आमचा गप्पांचा खेळ पुन: दिलखुलासपणे सुरू झाला. परत येताना त्याने मघाचचेच दहा रुपये सुटे करून आमच्या हातांवर ठेवले व म्हणाला, " तुमच्या मायला दे–भाडा दिला म्हून सांगा. आपली काय छाती नाय बाबा तुमच्या मायला काला मुह् दावायची." आणि परत तो गमतीने हसला. आईने तेच दहा रुपये लगो-लग मामाकडे पाठवून दिले आणि सगळा हिशेब मिटला.

त्यानंतर जवळजवळ वर्ष–दोन वर्ष खोली नावावरच ठेवून तो नवसारीला जाऊन राहून आला. तिथूनच त्याने एकदम भाडं पाठवून दिलं होतं मनीऑर्डरीने. जिकडे तिकडे हिंडून तो परत आला, तेव्हा मी उंच होऊन परकर–पोलकं घालायला लागले होते. इंग्रजी शाळेत जाऊ लागले होते नि पोपट एकदम चौथीत जाऊन बसला होता आणि मुख्य म्हणजे तो स्पष्ट बोलायला लागला होता. तो आला तेव्हा आम्ही पूर्वीसारखे धावत गेलो नाही. खरंतर फार उत्सुकता वाटत होती; पण त्याच्या बोलावण्याची नि आईला नकळत जाण्याची संधी पाहत होतो, ती दोन दिवस मिळाली नाही. शेवटी नेहमीसारखा सकाळी टाक्यावर येऊन दात घासत तो बसला. आम्ही मुद्दामच बाथरूमच्या रहाटातून पाणी काढण्याच्या मिषाने डोकावलो. त्याचे लक्ष नव्हते. शेवटी मी जोराने शीळ घातली. एव्हाना मला झक्कपैकी शीळ घालता येऊ लागली होती. त्याने दचकून आमच्या दिशेने पाहिलं आणि आनंदाने तो ओरडला......" हुलो ! कम ऑन माय् स्वीट बर्डस्–कम ऑन–हरिअप –आय हॅव्ह् ब्रॉट सो मेनी थिंग्ज फॉर यू......"

मागील दाराने आम्ही परस्परच त्याच्या खोलीवर धावलो. जाताना त्याला लवकर यायला खुणावलं. खोली स्वच्छ लावलेली होती. धोब्याचे कपडे बोचक्यात बांधून कॉटवर ठेवले होते. त्यावर नेहमीप्रमाणे पोपट रेलून बसला. माझी नेहमीची जागा टेबलावरची; पण तिथे कितीतरी आल्बम, बॉक्सेस, पुडकी दाटीवाटीने ठेवली होती–म्हणून मी स्टुलावर पाय हलवीत बसले. तोंडबिंड धुऊन तो शीळ घालीत आला. पोपटने आल्याबरोबर त्याला मिठीच मारली. मी मात्र स्वस्थ होते. कारण मी मोठी झाले होते आता. पोपटला खांद्यावर बसवून तो जवळ आला आणि माझ्याकडे बघून आश्चर्याने म्हणाला, " वंडरफुल ! मैनाबाय, यू हॅव्ह् ग्रोनअप टू मच विदिन दीज टू इयर्स ! केटली उंची थय गयो तू ! आँ !" तो नेहमीप्रमाणे हनुवटी वर उचलून पापी घेणार होता; पण मीच नापसंती दर्शवली. इंग्रजी शाळेतला शिष्टपणा नाही म्हटलं तरी शिरला होताच अंगात. शिवाय एवढ्या मोठ्या माणसाने आता माझी पापी घ्यायची म्हणजे ती कल्पनाच कशीतरी वाटत होती. माझी नापसंती पाहून तो विरमला. चेहरा टाकून म्हणाला, " आमाला वाटल्या, तू नुसतीच उंची जाली; पन खराब मोठी जालीस. एकदम वायली वाटते तू आता. पूर्वीसारकी छोटी नाय राह्यली अं ? यू हॅव्ह् चेंजड् ऑलसो !" जरा वेळ तो कुतूहलाने तसाच उभा राहिला; पण मी पूर्वीइतक्याच मोकळेपणाने त्याचा

हात धरून म्हटलं, " हे रे काय जहांगीर ! आल्यासरशी आम्हाला गमतीजमती सांगशील की नाही ? वर्षभर दडी मारून बसला होतास तो. हे बरं नाही हं. पत्र फोटो नाही आणि आता आलोत तर गप्पा पण नाहीत. "

त्याचा चेहरा खुलला. मला एक टपली मारून पोपटला त्याने खाली उतरवल आणि सर्व खोकी खोलायला सुरवात केली. पुन: आम्ही अलीबाबाच्या जादूच्या गुंफेत शिरलो. माझ्यासाठी त्याने बुद्धिबळाचा खेळ आणला होता. पोपटसाठी सापशिडी, पत्त्यांचा जोड, आणि रंगीत पेन्सिलीचं बॉक्स. शिवाय मला त्याने त्याची लहानपणची जुनी स्टँपची वही आणि जुनं पेनही आणलं होतं. मी तर अगदी हुरळूनच गेले. अख्ख्या शाळेतच काय पण अख्ख्या गावातल्या पोरांकडे त्या वेळी पेन नव्हतं. पेन वापरण्याची पद्धतच नव्हती त्या वेळी मुळी. दोऱ्याला बांधलेली दौत डुचमळत डुचमळत नेताना आमचा गेला होता जन्म ! नि टाकाने लिहिता लिहिता बोटं माखली नाहीत, असा एकही दिवस कधी गेला नव्हता. मी पेनने प्रथम त्याच्याच वहीवर लिहून पाहिलं आणि झकास अक्षरं उमटताच माझा आनंद गगनात न मावून नकळत मीच त्याची पापी घेतली होती. तो आनंदून म्हणाला, " ओ मैना, यू आर द सेम स्वीट गर्ल अॅज यू वेअर टू यिअर्स बॅक. नाऊ लेट अस हॅव सम स्वीटस् " – मग त्याने सुरतेची घारी, फरसाण आणि घोलवडचे चिकू आमच्या समोर डिशमध्ये मांडले. तिघांनी मिळून केव्हाच त्याचा फन्ना उडवला. पुन: आमच्या दोस्तीला सुरवात झाली. खूपसे फोटो या वेळेस त्याने काढले होते, पण या खेपेस प्रत्येक फोटोतली मख्खी तोच समजावून देऊ लागला. आमची वडबड तेव्हापासून बंद झाली–म्हणजे त्याच्या फोटोबद्दलची. मध्येमध्ये मला तो इंग्रजी व्याकरण व वड शिकवू लागला. इंग्रजीत कधी नव्हे ते मार्क जास्त मिळू लागताच आईनेच खुषीने शिकायला परवानगी दिली. मधूनमधून बुद्धिबळाचे डाव बसत – कधी पत्ते – कधी सापशिडी – मार्क मिळविण्याच्या नादात तर तो लहान पोरांवर ताण करून आमच्याशी भांडत असे. फार गोंगाट होई. मग आईची कातावलेली हाक येई. झटकन खेळ आवरून तो म्हणे, " जावा जावा – जावा नी बेगिन – तुमच्या मायची आमाला लय भ्या वाटते. " " आणि तुझ्या आईची तुला भीती वाटते की नाही ? " पोपट विचारायचा. " आणि तुझे वडील, तुझी भावंडं आहेत की नाही ? " मीही त्याला साथ द्यायची. तो काही बोलायचा नाही. विषय डावलायचा – नुसतं हसण्यावारी मागवून न्यायचा आणि आम्हाला घाईघाईने आईच्या भीतीने खोलीबाहेर काढायचा.

मला मोठं नवल वाटायचं ! इतका चांगला माणूस नि याच्याकडे कुणीच कसं यायचं नाही ! मित्र नाहीत, नातेवाईक नाहीत. गुत्त्यात त्याच्या जातीची एवढी माणसं यायची, त्यांपैकीसुद्धा कुणीही नाहीत. नि याला तरी एकटं राहवतं कसं ? एके दिवशी आम्हाला अचानक पावसाची अर्ध्या दिवसाची रजा मिळाली. घरी आले तर सारे कपडे ओले – दमट नुसते. आईने दांडीवर पाहिलं तर धुतलेले तेही कपडे

ओलेच. मग मोठ्या बहिणीचा जुना गाठोड्यातला पोलका काढून तिनं घालायला दिला. परकरही तिचाच. सारखा खाली उतरणारा तो ढगळ पोलका जेमतेम खांद्यावरून सावरत नि परकराचा घोळ आवरत मी लोणच्याची बरणी शेजारच्या दप्तरदारांच्या बिऱ्हाडात पोहोचवायला गेले. त्यांनी आईकडे थोडंसं मागितलं होतं म्हणून बरणी ठेवली नि परतणार तोंच पाऊस असा कोसळायला लागला की बस्स. आईने घरातून ओरडूनच थोडा वेळ तिथंच थांबायला सांगितलं. मी गॅलरीत उभी होते, एवढ्यात जहांगीर जेवायला दप्तरदारांकडे आला. मी अगदी सफाचाट पडले. हा पारशी गृहस्थ या तात्यामाणसाच्या घरी जेवायला कधीपासून यायला लागला ? नशीब, माझी बोलभांड जीभ मी त्यावेळेपुरती आवरून ठेवली म्हणून. पण जेवून तो गेल्यावर मात्र मी मागोमाग त्याच्या खोलीत शिरले.

तोंडभर हसून त्यानेच पहिली सलामी दिली आणि तीही माझ्याच शब्दांत. " हे काय रे जहांगीर ? तू दप्तरदाराकडे कबापासून जेवायला येयला लागला ? आन् मला कसा नाय माहिती ? मैना, तू आता आमाला ह्येच ऐकवनार ना ! तुमी काय बोलूच नका. त्याचा असा हाय मैना, हाटेलमंदी जेवन्याचा पैका हातामंदी नाय – नवा त्या लोकाला मी इचारला – त्या भल्या माणसांनी कबूल केला – जवा जमेल तवा देऊन टाकेल मी त्यांचा समदा पैका. चायपानी, समदा त्येंच्या कडसाच घेतो आमी. सो डोन्ट वरी – आय वुईल मॅनेज येनी हाऊ. "

पहिल्यांदा तो हसला खरा; पण कधी नव्हे तो आता मात्र केविलवाणा चेहेरा झाला होता स्वारीचा. मलाच मग कसंतरीच वाटलं होतं. त्याच्या आईवडिलांचा अगदी संताप संताप आला होता. आपला पोरगा तिकडे उपाशी राहतो आहे, हे समजू नये त्यांना ! कुठं असतील तिथं त्यांनासुद्धा असेच उपास पडले पाहिजेत. त्याशिवाय नाही खोडकी मोडायची त्यांची. मी मनातल्या मनात त्यांना लाखोली वाहिली शिव्यांची. शिळेबरोबरच पोरांच्या घोळक्यात राहिल्याने शिव्याही मी बऱ्याच आत्मसात केल्या होत्या. फक्त मनातल्या मनात संतापून देत असे, ज्याचा राग येईल त्याला एवढंच ! माझे गच्च मिटलेले ओठ नि तिरसट मुद्रा पाहून त्याला संशय आलाच. हसतहसतच तो म्हणाला, "साला, गांडू, हरामखोर, हलकट,..... कोनला कोनला शिव्या देते तू मैना ! पोरींनी शिव्या नाय द्यावा कंदी – तेतल्यातेत तूने तर बिलकुल नाय ! तुझा नाम मैना हाय – याने गानेवाला पंछी !...... "
मी चिडून विचारलं, " मग का तुझ्या आईबापांनी तुला पैसे पाठवू नयेत ! तू इथं उपाशी राहतोस ते चालतं वाटतं त्यांना नि आपण मात्र खात असतील तिथं वकावका ...... हलक ...... " त्याने तोंडावर हात ठेवून मला बोलतं बंद केलं.

" त्यांचं बी चुकते नाय नि माजा बी नाय. – तू ल्हानी हाय मैना ! तुला नाय समजायचा काय ! त्येंच्या घरामंदी राह्यला, धंदाबिंदा केला, समदे सांगते तो आयकला तर ते बड्या खुपीने खाया देतील. पन माला बापाचा धंदा नाय करायचा.

मीने फोटोच काडायचा ठरविला हाय तर ते बी काय करतेल आन् मी बी काय करेल ! त्यानला शिवीबिवी नाय द्येयाची ...... मीने बी नाय आन तू बी नाय."

शांतपणे त्याने पट मांडला. सगळं विसरून जिद्दीने मीही खेळायला बसले, पण लक्ष लागेना. एक तर परकर जुना असल्याने सगळीकडे फाटला होता. तो आवरून नीट मोकळेपणाने बसता येत नव्हतं. दुसरं म्हणजे पोलकं खांद्यावर, जागेवर बड म्हणून बसायला कबूल नव्हतं – डगलाच होता म्हणा तो. मोठ्या गळ्याचा होता. मला सारखी शरम वाटायला लागली. प्रथम बटणपट्टीचा बोळा तोंडात धरून बसले. मग परकराचा काचाच मारून बसले. जरा वेळाने मागून ओढून पोलक्याची कडा चिमटीत पकडून बसले. पण काही केल्या मनमोकळेपणाने खेळता येईना. भराभर भराभर माझ्या सोंगट्या तो मारून घेऊ लागला. माझी चुळबूळ वाढली. त्याच्या ते लक्षात आलं. मुकाट्याने उठून त्याने शिवणाचा डबा काढला आणि सुई, दोरा, बटणं, रिळं यांच्या गोंधळातून सेफ्टी पिन्स काढून माझ्या हातावर ठेवल्या. शांतपणे म्हणाला, "मी दुसरा डाव लावतो तोवर तू पिनाबिना लावून धडपनी खेलायला ये – जा – पळ ...... नाय तर कपडा बिपडा दूसरा लेवून येनी."

मग मात्र पिना लावून निर्धास्तपणे, पाऊस ओसरेपर्यंत मी त्याच्याबरोबर खेळले. जितक्या शांतपणे आणि विचाराने तो खेळत होता, तितक्याच मनमोकळेपणाने त्याच्याशी भांडून तो हरला की त्याला चिडवून मी खेळत होते. सबंध दुपार खेळण्यात गेली. संध्याकाळी घरी आले, तेव्हा पोपट शाळेतून नुकताच घरी आला होता. त्याची माझी शाळा निराळी होती. वेळ निराळी होती. त्यामुळे जहांगीरच्या खोलीवर कधी मी तर कधी तो एकेकटेच जात असू. फक्त रजेच्या दिवशी तो घरी असलाच तर आम्ही एकत्र जात असू. पोपटला दूध घेताना मी जहांगीरला दोनदा हरवल्याची गंमत सांगितली. दुधाचा कप अर्धाच ठेवून तो घाबरून हलकेच म्हणाला, "सकाळी तुला सांगणार होतो मैना, पण तू शाळेत गेली होतीस. कुणाला मी अजून सांगितलं नाहीय्. कान कर इकडे." मी आजूबाजूची चाहूल घेऊन त्याच्या तोंडाजवळ कान केला नि जे ऐकलं त्याने मी हादरून गेले. खोटं म्हणावं तर पोपटचा चेहेरा कावराबावरा होऊन रडवेला झाला होता. खरं म्हणावं तर माझा स्वतःचाच विश्वास बसण्यासारखा नव्हता. पुनःपुनः मी त्याला खोदून खोदून विचारलं, तर तो जास्त जास्तच रडवेला झाला. लाजेने लाल झाला. मग मात्र मी रागाने पेटून निघाले. आम्ही लहान असलो म्हणून काय झालं ! नीटसं काही समजत नसलं म्हणून काय झालं ? पण काय घाणेरडं आहे, याचा वास आम्हालासुद्धा येतो म्हटलं ! पोपट केवढासा ! गोरागोमटा, गुटगुटीत नि सुंदर दिसतो म्हणून त्याच्याशी हे असले चाळे करायचे ? मांजर, कुत्री, कोंबडी वागतात तसं माणसांनीसुद्धा वागायचं ! बेशरम, हलकट ...... पुनः लाखोली तोंडावर आली, पण ओठ गच्च मिटून ठेवले. जरा वेळाने विचार करून मी पोपटला हळूच म्हटलं,

" पोपट, माझ्या गळ्याची शप्पथ, कुठं बोलू नकोस हे. त्याच्याकडे आता आपण जायचंच नाही. मी चांगलं लक्ष ठेवते त्याच्यावर. बघू तर खरं, काय काय करतोय ते. पुनः जर त्याने असं काही केलं ना तर मोठ्यांदा ओरड मारायची हं ! मुळी गप्प बसायचं नाही. पण आधी आपण पाळत ठेवू या त्याच्यावर..." पोपटने भाबडेपणाने मान हलवली.

दुसऱ्या दिवशी त्याच्या खिडकीतून, त्याचं पेन, स्टँपची वही, सापशिडी, पेन्सिलीचं डबरं, सारंसारं आम्ही तो नसताना आत टाकून दिलं. एक चिठ्ठीही टाकली, "तुझं आम्हाला काहीच नको. तू खराब आहेस. तू खायला दिलं होतंस ते केव्हाच हाजम झालं, म्हणून ते तेवढं देत नाही. पण हे बाकीचं परत घे. आम्हाला तू मुळीच आवडत नाहीस. तू हल. "...शेवटचे शब्द मी मागाहून खोडले होते. खाली सही केली होती––पोपट...मैना...

सतत महिनाभर आम्ही गेलो नाही खोलीवर. एक अक्षर बोललो नाही त्याच्याशी–ढुंकून पाहिलंसुद्धा नाही त्याच्याकडे. पण ते त्याच्या खिजगणतीतही नव्हतं. चिठ्ठी त्याने वाचली की नाही देव जाणे. दप्तरदारांकडे येणं, चहा-शंकरपाळी खाणं, अळू, वरण–भात जेवणं, कॅमेरा घेऊन हिंडणं, सारं सारं नेहमीसारखंच चाललं होतं त्याचं. मी लक्ष ठेवून होते. माडीवरून, बाथरूमच्या रहाटाआडून, तुळशीजवळच्या झोपाळ्यावरून, जिथून तिथून मी पाहत होते. वेडच लागलं होतं मला त्या पाहण्याचं. कसला अभ्यास नि कसलं काय ! एकदम तिनावरून तेविसाव्या नंबरापर्यंत घसरले होते मी. सगळ्यांनी टोचून टोचून खाल्लं मला. आई तर मोठ्या भावाला म्हणालीसुद्धा, " अरे, त्या बाटलीवाल्याला म्हणावं, मेल्या सहा महिन्यांचं भाडं दिलं नाहीस तर त्या बदल्यात या दोन पोरांना जरा शिकवीत तरी जा "–म्हणजे भाड्याच्या बदल्यात त्याने एकदा फोटो दिले होते, ते आईला नको झाले होते. पण त्याची शिकवणी चालली असती तिला. चालली असती नव्हे, ती होऊनच सुचवीत होती तसे. या मोठ्या माणसांचा व्यवहारच आम्हाला खरं म्हणजे कळत नसे. आईचा विरोध त्याच्या भाडं न देण्यामुळे होता. आमचा विरोध त्याच्या घाणेरड्या वागण्यामुळे निर्माण झाला होता. मी नि पोपट नाना प्रकारांनी टेहळणी करीत होतो. पण मग तसं काहीच वाईट घडलेलं आम्हाला दिसलं नव्हतं. कुठे काही खाटखुट नव्हते. सर्व काही सुरळीत चालू होतं. एके दिवशी दप्तरदारांकडे मी ताकाची तांवली घेऊन गेले होते. ते नेहमी आमच्याकडून ताजं ताक नेत असत. काकूंनी जहांगीर मलेरियाचा ताप येऊन सात-आठ दिवस घरीच असल्याचं सहज बोलता बोलता सांगितलं. मग मात्र मला खरंच राहवलं नाही. बिचारा! आजारीपणात गरीब बिचाऱ्याकडे लक्ष द्यायलासुद्धा कुणी घरचं नसावं ! शेजाऱ्यांनाच बघावं लागावं. राग नाहीसा होऊन केव्हाच माझ्या मनात दया रिघून बसली. मी घरी आले. आईला विचारून पोपटला सरकारी दवाखान्यात औषधासाठी पाठवलं

आणि एका ताटात आईने कोलंबी घालून चांगली खमंग बनविलेली भरल्या वांगीबटाटयाची थोडीशी भाजी, टोमॅटोची कोशिंबीर, मांदेळीचं झणझणीत तिखलं आणि मूदभर भात आणि वाटीभर दही घेऊन हळूच त्याच्या खोलीत शिरले तब्बल दीड महिन्यांनी. पडल्यापडल्या तो कॅमेऱ्यात नवा रोल बसवत होता. इतका पांढराफटक झालेला मी त्याला कधीच पाहिला नव्हता. हाताचे पंजे तर इतके पांढरेफिकुट दिसले मला की पोटात ढवळून आलं नुसतं एकदम माझ्या. मला पाहताच तो आनंदाने उजळून निघाला. कॅमेरा दाणकन् कॉटवर आदळून, कुशीवर धडपडत वळून तो जवळजवळ ओरडलाच, " गुड मॉर्निंग माय प्रिट्टी बर्ड ! हाऊ डू यू डू ! इतके दिसामंदी कोठे गडप झाला होता तुम्ही दोगंजणं ! आय वॉज बॅडली इन् नीड ऑफ बोथ ऑफ यू. गेल्या सात दिसामंदी एकदा पन आला नाय तुम्ही लोक. " मी काहीच बोलले नाही. मुकाटयाने स्टूल त्याच्यापुढे आणून ठेवलं. वर ताट ठेवलं. त्याच्या ग्लासमध्ये काकूंनी ठेवलेलं उकळलेलं पाणी भरलं आणि स्वस्थपणे हाताची घडी घालून टेबलावर नेहमीच्या जागेवर बसले.

" हे काय हाय ? " त्याने आधाशीपणे ताटाकडे पाहून म्हटलं.

" जेवण ! दिसत नाही ? चव गेली असेल तुझ्या तोंडाची म्हणून आईने पाठवलंय. हळूहळू जेव. बकाबका घास गिळू नकोस. नडेल नाहीतर. " मी ठसक्यात उत्तर दिलं.

" तुज्या मायने पाटवला का तूनेच हठ धरून आनला ? " सूक्ष्म आठी घालीत त्याने विचारलं.

" ते तुला काय करायचंय ? तू आपली सुरवात कर बघू. " मी रागानेच म्हटलं.

" तू आनला असेल तर जेवनार. नाय तर नाय..." जेवण्यासाठी तो उठला होता. तो पुनः हट्टाने झोपला. मग मला खरोखरच संताप अनावर झाला. इतके दिवसांची मळमळ मनात साचली होती, ती मी फडाफड फडाफड बोलून दाखवली. काहीही आडपडदा ठेवला नाही; किंवा संकोचही बाळगला नाही. भीडमुर्वत सोडून मी ताडताड बोलत राहिले. एवढ्यात पोपट बाहेरूनच खिडकीत औषधाची बाटली ठेवून बाहेरच्या बाहेर पसार झाला. त्याला पाहताच मी शेवटी म्हणाले, " बघ, पोपट आत यायलासुद्धा घाबरतो. मग मी तरी का यावं ? जेवण मी आणलं नाहीय. आईने पाठवलंय. हवं तर जेव, नाहीतर नको. माझं काय जाणाराय त्यात ! तूच उपाशी राहशील. "

प्रथम तो अगदीच हताश झाला होता. मग त्याने डोळेच गच्च मिटून घेतले. मी बोलायची थांबले, तेव्हा डोळे मिटल्या मिटल्याच तो खचलेल्या स्वरात म्हणाला, " मैनाबाय, तुमचा ताट तुमी घेऊन जावा. आमी उपाशी राह्यला तरी चालेल, पन येकच सांगायचा हाय के मनामंदी बुरा असंल तर माज्या रूममंदी तुमी नाय आले



" मैना बाय,
तुमचा ताट तुमी घेऊन जावा.

तरी चांगला. माफ साफ मनामंदी होऊन जायल तवाच या–"

मी त्याच्या बोलण्याने चमकले. त्याने काहीही खुलासा न करताही त्याच्या निव्वळ त्या खचलेल्या बोलण्यानेच माझ्या मनात पुनः संशय आला. पोपटचा काही गैरसमज तर झाला नसेल ! किंवा त्याच्या सांगण्यामुळे माझ्याच मनाने गोंधळ तर घातला नसेल ! एक ना दोन ! कितीतरी प्रश्नच प्रथम मनात उभे राहिले. त्याच वेळी त्याने दिलेल्या त्या पिनांचीही एकदम आठवण झाली आणि कसं अगदी निश्चित वाटलं. सगळी जळमटं एकदम कुणीतरी पुसल्यासारखी वाटली. तरीही एक कोपरा भरलेला होताच. खात्रीसाठीच पुनः विचारलं, "पण खरं सांग ना ! पोपटला तू असं का केलंस ? आम्हाला असलं घाणेरडंपण आवडत नाही हे ठाऊक नाही का तुला ? आमची दोस्ती नकोय का तुला ? " तो आता सरळ उठूनच बसला. मला जवळ येऊन बसण्याची खूण करीत म्हणाला, " इकडे यावा मैनाबाय–समदा सांगतो. आय् ॲम व्हेरी ग्लॅड देट यू आर व्हेरी फ्रॅन्क–यू आर व्हेरी क्यूरीयस ऑलसो ! व्हेरी नाईस ! तुमचा हायजीनचा किताब हाय ना तेच्यामंदली समदी डीटेल्स मी तेला समझावून देत होता. तो इचारत होता अने आमी सांगत होता. पोरा लोकांला समदा सांगाला नाय पाहिजे का ? म्हून मी समदा, अगदी समदा, आमच्यापरमूनच सांगला तर काय बिगाडला ? एकदम सीधा सांगला. आमी लपाछपा तर कोई केला नाय."

मी हट्टाने त्याच्याजवळ गेलेच नाही, कारण अजून शंका होतीच. त्याला कैचीत पकडण्यासाठी मी ठामून विचारलं, " मग मला का नाही सांगितलंस ? एकटचा पोपटलाच का म्हणून. आधी सांग ? " तो फिकाफिका का होईना, पण गमतीने हसला. मान हलवून म्हणाला, " बडी आसान् छोरी हाय तू मैनाबाय. तुमालाबी समदा सांगायला होवाच, पन तो मीने नाय. तुज्या मायने अगर मोटी बहेन हाय ना, तेने ! मी तर बाप्या हाय ना–मर्द...मर्द... "

माझी खात्री पटली...त्याने पुढे खरं म्हणजे काहीच सांगण्याची मला जरूर वाटली नाही. मग मी माझ्या नेहमीच्या मोकळेपणाने त्याला जेवायचा आग्रह केला. जेवून झाल्यावर हातावर पाणी ओतलं. त्याचा नॅपकिन शोधून त्याला दिला आणि तासभर बडबड बडबड करून घरी परतले. त्या दिवशी रात्री निजताना पोपटला मी नीट सारं हळूहळू समजावून सांगितलं आणि आम्ही दोघंही पुन: मनाने मोकळे आणि अगदी स्वच्छ झालो.

पुन: जाणं-येणं सुरू झालं. गप्पागोष्टी, पत्ते, बुद्धिबळं, इंग्रजीची शिकवणी, सगळं नव्याने सुरू झालं. पाचसहा महिने असे गेले, पण तोवर त्याचं बस्तान काही नीट बसलं नव्हतं. अजून तो दप्तरदारांकडेच जेवत होता. चॉकोलेटच्या डब्यांऐवजी कधी कधी फक्त एक्स्ट्रॉ स्ट्रँगवरच भागवून नेण्याची त्याच्यावर पाळी आली होती. विहिरीवर इतरांबरोबरच त्यालाही कपडे धुताना बऱ्याचवेळा पाहण्याचा प्रसंग आमच्यावर आला होता. धोबी, लाँड्री बंद झाली होती. इतकंच काय, पण नेव्ही ब्लू रंगाचे, गर्द चॉकोलेटी रंगाचे त्याचे तीन–चार तरी सूट होते, तेही तो रफू करीत स्वत:च बसलेला आम्ही खूप वेळा पाहिला आणि सगळ्यावर कळस म्हणजे शेवटी आईने वर्षभराचं भाडं दिलं नाही म्हणून त्याला निघून जायला फर्मावलं आमच्या सगळ्यांच्या देखतच. त्याने गुपचुप बोटातली पोवळ्याची अंगठी काढून आईसमोर ठेवली. खाली मान घालून म्हणाला, " ये अंगूठी तुमच्यापासी ठेवून द्या, पन मला या रूममंदून बाहर काढू नका. लय चांगली हाय रूम. आजून बरकत नाय आला माझ्या धंद्याला तर मी काय करेल ? "...

का कुणास ठाऊक, आई एकदम विरघळली. एक महिन्याची मुदत तिने वाढवून दिली आणि अंगठीला तिने अजीबात हात लावला नाही. कारण आमच्याच बड-बडण्याने तिला कळलं होतं की, तब्येत चांगली राहावी आणि पोवळचाचं पाणी सतत अंगावर पडावं म्हणून त्याच्या आईने त्याला ती लहानपणापासून करून दिली होती आणि तो तिला फार जपत असे–अगदी कॅमेऱ्याइतकाच. आईने अंगठी घेतली नाही, म्हणून त्यालाही फार मनातून हलल्यासारखं झालं असावं. कारण पुढच्या महिनाभर तो एकसारखा घराबाहेर राहत होता, एकसारखा हिंडत होता, धंदा करायला पाहत होता.पण भाडं देण्याइतके पैसे काही त्याच्याजवळ जमले नाहीत. जे मिळाले होते, ते त्याने थोडेसे दप्तरदारांना देण्यात आणि नवीन रोल विकत घेण्यात खर्च करून टाकले होते. शेवटी आईने आणखी महिनाभर मुदत वाढवून देऊनही तो कबूल झाला नाही. एका सकाळी खोली रिकामी करून तिला कुलूप लावून चावी आईच्या स्वाधीन करून तो मोकळा झाला. मला आणि पोपटला खूप म्हणजे खूपच वाईट वाटलं. खुंटीवर दोऱ्यांतून लोंबणारी ती त्याची चावी पाहून सारखं रडायला येत होतं. तरीही बाहेर काही न दाखविता नेहमीसारखेच आम्ही शाळेला गेलो; पण दिवसभर कुणी काय शिकवलं, कोण काय बोललं, इकडे आमचं लक्षच नव्हतं. डबेसुद्धा

दुपारच्या सुटीत खाल्ले नाहीत. संध्याकाळी तसच उदास होऊन परत आलो. दप्तर ठेवून हातपाय धुवायला बाथरूमध्ये गेलो तर, रहाटावरून जहांगीर कळशीत पाणी भरताना दिसला. आम्ही अत्यानंदाने ओरडलोच, " जहांगीर, जहांगीर, तू गेला नाहीस ना. अजून इथंच आहेस ना ? "

तो नेहमीसारखा तिथूनच ओरडला, " गुड ईव्हिनिंग माय लिटल फ्रेंडस. अजून आमचा मुक्काम तुमच्या वाडीतच हाय. दप्तरदारांकडेच हाय मी. यावा नी बेगिन बेगिन. "

एका परीने आम्हाला आनंदच झाला. जहांगीर अजून वाडीतच आहे, या नुसत्या कल्पनेनेच आम्ही हुरळून गेलो. भराभर भराभर दूध घेतलं, आईने खायला ठेवलं होतं ते खाल्लं, परत डब्यातलं खायचं राहिलं होतं, तेही गट्टम करून टाकलं आणि आम्ही धावत धावत दप्तरदारांच्या घरी गेलो. पण कसला आनंद आणि कसलं काय ? दप्तरदारांच्या मुळातच दोन खोल्या नि एक छोटीशी गॅलरी–त्यात आधीच जुनंपानं सामान खच्चून भरलेलं–शिवाय आता त्यात जहांगीरच्या सामानाची भर पडलेली. मग काय विचारता ? इथून तिथे सरकायचं तरी कोण कसरत करायला लागत होती ! आणि गप्पा मारायला निवांतपणा नव्हता तो नव्हताच. स्वयंपाकघरात काकूंची वांदल, बाहेरच्या खोलीत दप्तरदारकाकांचा पसारा नि आरडाओरडा. बिचाऱ्या जहांगीरने बाहेरच्या उघडया गॅलरीतच जवळजवळ आपलं बिऱ्हाड मांडलं होतं. पण त्याबद्दल त्याची कसलीच कुरकूर नव्हती आणि मला त्याचंच नवल वाटत होतं. मी त्याला तसं विचारलंही...तो गमतीने हसून म्हणाला, " त्याचा असा हाय मैना, ते वाजूला, याने बोयसरला, आमचा मोठा बंगला हाय–मोटमोटचा वाडया हाएत– बागवगीचाही खूप मोटा. पोल्ट्रीफार्म हाय. गडी, मानूस कितने तरी कामाला हायेत. पन मी इते काकूंचा पानी भरतो–कचराबी काडतो आन ए लोकांचा काय डालभात आसेल तो मीठा मानूनशानी घेते. तवा या छोटयाशा गॅल-रीमंदी राह्यचा दुख कशाला मानून घेल ? बास, इतबी आराम मिळेल–आपला काय ! घरवार सोडून आले ना ? मंग फिकीर काय म्हून कराची ? "

अजब म्हणजे अजबच होता जहांगीर म्हणजे. दप्तरदारांकडे खरं म्हणजे त्याची इतकी गैरसोय होत होती की काही बोलायची सोय नाही. पण तरीही तो तस्सा वर्षभर त्यांच्याकडे राह्यला होता. केर काढत होता, पाणी भरत होता, वेळ पडली तर दवाखान्यातून त्यांच्यासाठी औषध आणत होता. एवढंच नव्हे, तर एकदा दप्तर-दारकाकांच्या महिन्याच्या आजारपणात तर त्याने बेडपॅन उचलण्यापासून सारं काही केलंन. दप्तरदारकाका आणि काकूंनाच मग त्याचा लळा लागला होता. त्यांना मूलबाळ काहीच नव्हतं. गरिबी होती खूप त्यांची, पण मनाने जरी विक्षिप्त तरीही फार चांगली माणसं होती. दोन्हीही विक्षिप्त. एवढयाचसाठी की दोघंही सारखी भांडायची ! वाटेल त्या वेळेला त्यांचं, विशेषत: काकांचं, भल्यामोठ्या डरकाळीने

टोटोटोटो व्हायला सुरवात व्हायची–काकांचं गुरगुरणं आणि काकींचं फुसफुसणं, पण दोन्ही मिळून गोंगाट व्हायचाच. मग ते भांडण विकोपाला जायच्या आधीच आईला हातातलं असेल–नसेल ते काम टाकून, किंवा वेळी रात्रीच्या अर्ध्या झोपेतून उठूनही, तिथे जाऊन ते भांडण बाबापुता करून मिटवावं लागे. त्यामुळे दोघेही शांत होत आणि म्हणूनच की काय नकळे, आपापल्या परीने दोघेही आईला मानत.

माणसं चांगली एवढ्याचसाठी की, कुणीही दारावर आलं तरी त्याला काहीतरी दिल्याशिवाय ती परतून लावत नसत. भिकारीटोकारी, माधुकरीमुलं, अनाथ विद्यार्थी किंवा लबाडढोंगी साधूबिधू, कुणीही येवोत, काहीतरी आणि जमेल ते देण्यात दोघेही मागं नसत. असा भलेपणा होता त्यांच्यात, म्हणूनच तर जहांगीरला ना जातीचा, ना पातीचा, ना धर्माचा, असा असूनही त्यांनी आपल्या घरी ठेवून घेतला होता. पूर्वी एकदा त्यांनी एक अनाथ मुसलमान मुलगाही घरात आणून ठेवला होता. चांगला दोन वर्षं राहून, नोकरी वगैरे मिळाल्यानंतर तो निघून गेला होता. जाताना डोळ्यांतून पाणी काढलं होतं त्यानं. मला थोडंसंच आठवतंय, कारण फार लहान होते मी त्या वेळी, पण आठवतोय तो प्रसंग गॅलरीतून निघून जाताना युसूफ रडला होता. युसूफ जोपर्यंत घरात होता, तोपर्यंत दप्तरदारकाकांच्या घरात आईने नव्हतं पाऊल टाकलं, की नव्हता पाण्याचा थेंब घेतला. तिच्या मताने दप्तरदारकाका म्हणजे धर्मबुडवा मनुष्य. काका म्हणत, "यायचं नसेल तर नको येऊस. माझ्या घरी कुणी येतं ते मुसलमान आहे, की ख्रिश्चन आहे, की अस्पृश्य आहे, याचा विचार मी नाही करत. गरज संपली की त्याने निघून जावं, हे मात्र मी सांगेन." काकूही तसं पाहायला गेलं तर फार मायाळू ! काकांच्यावर ताण काही काही वेळा काही काही गोष्टीत ती करायची ! पण म्हणून आम्हाला त्यांच्याकडे जाणं-येणं फार आवडत असे अशातली काही गोष्ट नव्हती. उलट गरजेपुरत्याच आमच्या त्यांच्याकडे खेपा होत. कुठं ताक नेऊन दे, कुठं लोणचं नेऊन दे, कुठं निरोप दे, याच निमित्ताने फक्त आम्ही जायचो. फार वेळ बसायचोही नाही. काकूंना आम्ही बसावं, गप्पा माराव्या, असं फार वाटायचं; पण आम्हाला काकांची फार भीती वाटायची, म्हणून काम संपलं, की पळतच घरी निघून यायचो.

जहांगीर त्यांच्याकडे राहिला म्हणून आमच्या त्यांच्याकडल्या खेपा वाढल्या नाहीतच. उलट त्यांच्याकडे मनमोकळेपणाने बसता येत नसे, बोलता येत नसे, म्हणून जहांगीरच हळूहळू आमच्यापासून दुरावत चालला. कधीमधी टाक्यावर गप्पा मारीत बसायचो, पण ते फार थोडा वेळ आणि त्यात पूर्वीसारखा रंगही भरत नसे. कारण आईचं सारखं लक्ष असायचं. आजूबाजूची विहिरीवरची माणसंही गंमत म्हणून पाहत राह्यची आणि मुख्य म्हणजे जहांगीरच अबोल होत चालला होता. कुठंतरी टक लावून बसत असे–कितीतरी वेळ. मग आम्हालाच त्याला भानावर आणायला लागायचं.

एकदा डोक्यावर हंडा घेऊन झाडाखालून येणाऱ्या वारलिणीचा, त्याने उन्हात तिला न विचारताच पटकन् फोटो काढला. मोठी जहांबाज बया होती ती. तिने सरळ आईकडे येऊन तक्रार केली. आईने दप्तदारकाकांना सांगितलं. काकांनी त्याला दमच दिला. तो फार हिरमुसला झाला. खरं म्हणजे फोटो इतका सुंदर आला होता. आम्हाला त्याने दाखवला होता तो. लखलखीत हांडा, गळ्यातल्या साखळ्या, कपाळावरचा घाम, मागे आंब्याची गर्द पानं आणि दंडातली वाकी, सगळ कसं स्पष्ट आलं होतं. कुठल्याशा मासिकाने तो घेतलाही होता.

पण आईचं मन त्याच्या बाबतीत जरा कलुषितच झालं होतं. तिने दप्तरदार-काकांच्या मागे सारखा लकडा लावला, " कशाला त्याला ठेवलं आहात घरात ? आजवर कधी कुणी तक्रार केली होती का ? पण आता वारलिणीही करायला लागल्या म्हणजे झालंच. बघा बाई, लक्षणं मेल्याची घड नाहीत. भाडं तर बुडवलंच आहे वर्षभराचं–नि कसा रुबाबात राहतोय बघा." – म्हणजे आईचा राग हा असा दुधारी होता. तिने आम्हाला दोघांनाही त्याच्याबरोबर बोलण्याची, हसण्या-खिदळण्याची बंदी केली आणि आश्चर्य म्हणजे 'आम्हालाही त्या बंदीचं विशेष काही वाटलं नाही. बिनतक्रार आम्ही ती बंदी मानली; कारण आम्ही आता मोठे झालो होतो. आम्हालाही नवे नवे छंद जडले होते. त्यांतला एक वाचनाचा, फार मोठा वेळखाऊ आणि वाटेल त्या वेळी कामचुकारपणा करायला योग्य असा नवाच छंद होता. माडीवर अलीबाबाची मोठ्या कपाटात गुंफाच होती. अष्टौप्रहर त्या गुंफेतच आम्ही स्वतःला अडकवून घेत होतो. शिवाय नव्या मित्रमैत्रिणी, नवा अभ्यास, नवे खेळ आणि मुख्य म्हणजे नवं वय यामुळे आम्ही आमच्यातच गुंगून गेलो. जहांगीरला विसरलो असं नाही. त्याच्याशी बोलणे, हसणे, खिदळणे आईच्या भीतीने सोडूनच दिलं, असंही नाही. कधी कधी भेटायचो व कधीकधी हसा-यचो, खिदळायचो, पण पूर्वीची उत्सुकता नव्हती त्यात, किंवा जवळीकही नव्हती. कदाचित तो त्याच्या खोलीतच राहिला असता तर पूर्वीसारखेच कार्यक्रम खंड न पडता चालू राहिले असते. पण दप्तरदारकाकांच्या घरी त्यातलं काहीच जमण्या-सारखं नव्हतं. मग उरला तो फक्त जुजबीपणा– बोलण्यातला आणि हसण्यातला.

पण मी इंग्रजी पाचवीत गेले नि पोपटही आमच्याच शाळेत आल्यानंतर, जूनच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यातील, पावसाळा सुरू झाल्यानंतरची गोष्ट. एके दिवशी रात्री दप्तरदारांकडे खूप मोठं भांडण सुरू झालं. वास्तविक जहांगीर त्यांच्याकडे राहायला आल्यानंतर त्यांच्या घरची भांडणं खूपच कमी झाली होती. आणि कधीमधी झालीच तर ती टोटोटोटो स्वरूपाची नसायची. आईला त्यांच्याकडे जाऊन भांडणं मिटविण्याची बरेच दिवसांत पाळी आली नव्हती. जहांगीरच ते काम उरकून टाकायचा. पण त्या संध्याकाळचं भांडण जे लागलं ते काही अजबच होतं. जेवता जेवता आम्ही सारीच थबकलो. दप्तरदारकाका, काकू,

जहांगीर आणि कुणी एक अनोळखी स्त्री या सगळ्यांचेच आवाज वर चढले होते. कोणच हार खायला तयार नव्हतं. शेवटी भांड्यावर भांडं फेकून आदळ-ल्याचाही आवाज झाला. आमचे तोंडातले घास तोंडातच राहिले. भाताचा कालथा तसाच वेळणीवर आदळून, वयाला न शोभणाऱ्या चपळाईने आई धावत सुटली. आम्ही खरकटया हातांनी तसेच मागीलदारच्या पायऱ्यांवर येऊन उभे राहिलो. मला नि पोपटला राहवलंच नाही. साधं एरवीचं नित्यनियमाचं भांडण असतं तर आम्ही कशाला गेलो असतो ते कान लावून ऐकण्यासाठी ? पण त्या दिवशी जहांगीर गुंतला होता ना भांडणात ? शिवाय कोणीतरी दुसरीच बाई होती ! उत्सुकतेने इरेला पेटून मी आणि पोपट खूप दिवसांनी त्या जहांगीरच्या जुन्या खोलीत, गुपचूप, मोठ्या मावंडांचा डोळा चुकवून पसार झालो. तिथं आता नवीन आलेल्या भाडेकरूंचे स्वयंपाकघर होतं. बाई व बुवा कुठं बाहेर गेली होती. घरी फक्त कावरीबावरी झालेली त्यांची दोन मुलंच होती. त्यांना न विचारता, न पुसता घरात शिरून आम्ही भितीला कान लावले.

" मालकीणबाई, या घरात कुणी यावं, कुणी राहावं हे मी ठरवायचं आहे, हिने नाही. आणि या पारसुटल्याने तर मुळीच नाही. " काकांचा वरचढ आवाज.

" ताई, जरा कुठे ओळख झाली तर नववा महिना लागलेल्या या बाईला खुशाल यांनी घरी आणून ठेवलीय. भांडणं साऱ्यांचीच होतात. त्या नवराबायकोचं भांडण झालं तर मिटेल काही दिवसांनी, आमची नाही मिटत ? पण यांनी लगेच हिला हितं आणून ठेवलं. बाळंत विळंत हित्तंच झाली तर हिचं करणार कोण ? माझ्या अंगात बाई आता एवढी ताकद नाही. मी म्हटलं, आली, चार-आठ दिवस राहिली, बेस झालं. आता घरच्या घरी पोचवा हिला. तर अंगावर आले धावून– " काकूंचं रडवं नि थोडसं तक्रारखोर बोलणं.

" चूप, एकदम चूप. सावित्री इथंच राहील–तिचा नवरा आपण होऊन न्यायला येईस्तोवर. काय समजलात ? तोवर बाळंत झाली तर बाळंतपण तुम्हालाच काढावं लागेल. जास्त बोलणं नि उलट उत्तरं नको आहेत. " काकांचं गडगडणं.

" हो – जसा तुमच्याच पोराला जन्म देणाराय ती, तेव्हा मला बाळंतपण काढायला सांगताय – कोण ती माझी ! सवत की आणखी कुणी ? "

काकूंचं तारस्वरात किंचाळणं, मग फाटकन् मुस्काटीत मारल्याचा आवाज, काकूंची एक किंकाळी, आईचं मध्येमध्ये समजावणं. आम्ही जहांगीरचं बोलणं ऐकायला उत्सुक होतो, कारण मघाशी त्याचा आवाज चढलेला आम्ही ऐकला होता. पण तो तर काहीच बोलत नव्हता. काय गोंधळ चालला होता, तोच समजत नव्हता. ती पाहुणी बाई मध्येच म्हणाली, " माझंच चुकलं. मी उगीचच तुमच्या-बरोबर इथं आले राह्यला. भार्गवराव – ते येतील नि मला नेतील याची वाट बघण्यात काही अर्थ नाही. यांना कशाला त्रास ! सगळ्यांनाच त्रास – त्यापेक्षा

मला घरी पोहोचवा – " बाई कशी होती देव जाणे, पण फार थकलेली असावी. ओढलेल्या आवाजात कशीबशी धापा टाकत होती.

" घरी जायचं नाही. तुला काही स्वाभिमान आहे की नाही. तो गद्धा नाही–नाही ते बोलून, तुझे धिंडवडे काढून मोकळा झाला. मी तिथं होतो म्हणून त्याच्या मारातून वाचलीस तरी. आता परत जाणारेस का त्या नरकात ? बरं, या अवस्थेत कोण थारा देणाराय का तुला ? हिचं तू मनावर घेऊ नकोस. ही नाही हिचा बाप ...... " काकांचं बोलणं अर्धवट राहिलं, कारण जहांगीर मध्येच शांतपणे म्हणाला, " काकाजी, ये तुमी जंगली माणसासारका काय बोलते ? काकीबायचा आईबाप कशाला या भानगडीमंदी आनायचा ? ते बिचाऱ्यांचा काय संबंद हाय काय ? "

" तू चूप राहा रे कागडाखाव ! तुझा काय संबंध मध्ये मध्ये बोलण्याचा ? खाल्ल्या घरचे वासे मोजणारा हरामखोर ! तुला कुणी विचारलंय ? " काकांचा कडकडाट.

" त्याला बरीक बोलू नका हो ! त्याने तुमचं काय घोडं मारलंय ? त्याने सांगितलं त्यात चुकीचं काय ? माझे आईवडील काढण्याचा तुम्हाला अधिकार काय ? तुम्ही आणि ही नतद्रष्ट बाई, कुठं मसणात जाऊन पडायचं तिथं जाऊन पडा. मला त्याचं काही सोयरसुतक नाही, पण माझ्या आईवडिलांचं नाव निघालं तर खपायचं नाही मला. सांगून ठेवते." जोमात पण रडवाच असा काकूंचा स्वर.

" अग जाग ! इकडचं मुस्काट तिकडे करून टाकीन. बरीक कंबरडं मोडून टाकीन. मोठी आली कैवार घ्यायला. एकदा नाही, हज्जारदा तुझा बाप काढीन, आजा काढीन, पणजोबाही वरतून खाली आणीन; समजलीस काय ? हा पारसुटला गोरागोमटा म्हणून भाळलीस की काय त्याच्यावर ! सूतबीत तर नाहीना जमवलं आहेस ? काळतोंडी ! त्याची बाजू घेऊन नवऱ्याशी वर तोंड करून भांडते आहेस ती काय ? "

पुनः बदाबद मारण्याचा आवाज. आम्हाला गुदमरून गेल्यासारखं वाटलं. आई का मध्ये पडत नाही, का काकांना आवरत नाही, असं सारखं वाटायला लागलं. पण एकाएकी कुणी परत फाडकन् मुस्कटात मारण्याचा आवाज आला आणि ओरडले काकाच. केवढ्यातरी मोठ्याने विव्हळले ते आणि पाठोपाठच अर्वाच्य शिव्यांचा धबधबा सुरू झाला–म्हणजे मला येत असलेल्या शिव्या अगदी फिक्या वाटाव्या एवढ्या त्या नवीन आणि भयंकर होत्या. मी आणि पोपटने तर कानांवर हात ठेवले.

" साला सूवर, पुढं येल तर येक आनखीन् लगावून देल. पुना बोल, पुना बोल तर खरा. शरम नाय वाटते गंदा बोलायला. काय माणस छे के जानवर ! तुझी बायडी क्येवडी आन मी क्येवडा ! अरे गध्या, ती माज्या मायसारखी हाय. एवडा बी समजेल नाय तुला..." जहांगीरचं एवढं संतापाचं बोलणं आम्ही पहिल्यांदाच ऐकलं

आणि कसं एकदम मोकळं वाटलं. बरं झालं, कुणीतरी काकांना खडसावून सांगायलाच हवं होतं. आईने नाहीतर शेजाऱ्यांनी तरी निदान—पण जहांगीरनेच ते काम केलं. आम्हाला खूप बरं वाटलं. पण आई जहांगीरलाच ओरडली. फक्त त्याने एकदम कानशिलात मारली म्हणून—दुसऱ्या कशासाठी नाही. पण त्याचाच फायदा घेऊन काकांनी भराभर भराभर त्याचं सामान संतापाने, शिव्यागाळी करीत बाहेर फेकून द्यायला सुरवात केली. आम्ही लागलीच खोलीतून बाहेर पडलो व बाहेर येऊन आमच्या आयुष्यातील पहिला तमाशा, तोही चांगल्या शिकल्यासवरलेल्या, पांढरपेशा लोकांनी घातलेला, भीतभीत पण उत्सुकतेने पाहू लागलो.

ती सारी रात्र डोळ्याला डोळा लागला नाही, कारण जहांगीर सारं सामान घेऊन दुसऱ्या चाळीच्या अगदीच उघड्या अशा गॅलरीत बाकड्यावर तस्सा पावसाचा बसून राहिला होता. फक्त तिथल्या बिऱ्हाडकरूंनी त्याला एक कंदील पेटवून दिला होता. आईने त्याला आमच्या घरी दोन दिवस सामान ठेवायला व निजायला सांगितलं, पण त्याने ऐकलंच नाही. कॅमेरा नीट हातातच घेऊन तो तसाच हट्टाने बसून राहिला. माडीवरच्या खिडकीतून मी आणि पोपट कितीतरी रात्र होईस्तोवर बघत बसलो होतो. मध्येच आम्हाला झोप अनावर झाली. आम्ही झोपून गेलो. किती वेळ कुणास ठाऊक ! पण मध्यरात्रीच्या सुमारास फारच मोठा गोंगाट झाला. आम्हाला बऱ्याच वेळाने जाग आली. दडदड जिना उतरून आम्ही चाळीकडे धावत सुटलो. जहांगीरला खूपच मारलं होतं चाळीतल्या व आजूबाजूच्या लोकांनी. त्याचा मलमलचा सदरा जागोजाग फाटला होता, मळला होता, ओठांतून रक्त ठिपकत होतं आणि कपाळावर टेंगूळ आलं होतं. शिवाय एक डोळाही सुजला होता. तो खोक्यावर बसून कॅमेरा धड आहे की नाही, ते पाहत होता. बाकीचं सामान अस्ताव्यस्त पडलं होतं. मला तर रडूच आवरेना. काय आमच्या जहांगीरची ही स्थिती लोकांनी केली होती ! काय त्याने बिचाऱ्याने केलं होतं देव जाणे ! काही लोक अजून दप्तरदारांच्या दारासमोर रेंगाळले होते. दप्तरदारकाका तावातावाने गॅलरीतूनच काही त्या लोकांना नि काही जाहांगीरला उद्देशून, हातवारे करीत बडबडत होते. काकू तर मरगळून स्वयंपाकघरातच पडल्या होत्या आणि बिऱ्हाडा-बिऱ्हाडांतून कुजबूज कुजबूज चालू होती. मी आईला रडवेल्या आवाजात विचारलं, " काय झालं ग ? कुणी मारलं जहांगीरला ? आपल्याकडे बोलाव नाग त्याला आई राह्यला. "...

" चल, चोंबडी कुठली ! कशाला ते दळिद्र घरात घ्यायचं ? बरं झालं चांगलं लोकांनीच तोंड फोडलं ते. आता तरी जाईल मेला वाडी सोडून. कुठं तरी तोंड काळं करायला—" आईने मला झटकूनच टाकलं.

पण माझा जीव राहिना. मी गड्याजवळून विचारून घेतलं. ती कोण नवी बाई दप्तरदारांकडे आली होती, तिचा रात्री म्हणे त्याने हात धरलान्—ती बाहेर कशा-

लाशी आली असताना.–त्याने तिला हात धरून ओढले व घट्ट कवटाळून धरलं. मग तिने किंकाळी फोडली. सारे धावत आले, तेव्हा तो म्हणत होता. " सोडेल नाय– तुमाला सोडेल नाय ! " आणि ती किंचाळत होती. मग मागचा-पुढचा विचार न करता सान्यांनी त्याला चांगलाच चोपून काढला. तो काय म्हणत होता, काही तरी सांगण्याचा प्रयत्न करीत होता, त्याकडे कुणाचं लक्षच गेलं नाही किंवा कुणी ऐकूनच घेतलं नाही. मार मार मारीत सुटले सारे जण नि समाधान झाल्यावर निघूनही गेले. कुणी पोलिसाकडे गेलं नाही मात्र. कारण पदरचे पैसे नि वेळ खर्च करून चार स्टेशनांपलीकडे असलेल्या पोलीसचौकीवर जाणार कोण मरायला ? हौस कुणाला एवढी ? एकटचा माणसाला मारपीट करून हौस फिटवून घेतली, बस्स झालं. सारे निघून गेले नि राहिला एकटा जहांगीर ! कंदिलाच्या प्रकाशात खोक्यावर बसलेला. लहान पोरासारखं कॅमेऱ्याला कुरवाळणारा ! आईने घरी परतताना " उद्याच्या उद्या वाडी सोडून जा, " म्हणून कठोर आवाजात त्याला बजावून सांगितलं होतं. कधी नव्हे इतकं पोटात तुटून आल्यासारखं झालं मला. झोप आलीच नाही. मग पहाटे सारेजण उठायच्या आत मी उठले आणि हळूच दार उघडून ओटचावर गेले. कंदील विझत आला होता आणि जहांगीर जाण्याची तयारी करून स्वस्थ बसलेला होता.

" जहांगीर . . . " मी रडवेल्या स्वरात हाक मारली.

" हुलो मैनाबाय–तू रातची का आली ? माय ओरडेल नाय ? "

त्याने नेहमीसारखं खुल्या आवाजात विचारलं. जसं काही काल घडलंच नव्हतं.

" ओरडू दे, पण तू आज जाणार जहांगीर ? खरंच जाणार ? " मी कळवळून विचारलं. खरं की भास झाला ते समजलं नाही अंधारात, पण त्याचे डोळे भरून



" तू आज जाणार जहांगीर ?
खरंच जाणार ? "

आले असावेत. कारण आवाज कापरा झाला नंतर त्याचा.

"मैना, तुमाला एकच सांगते. वडी नामुष्कीची गोष्ट के आमाला असा मारपीट होऊनशानी जायला भाग पडते हाय. पण तुमी तरी माजा खरा मानेल ना ? ते बाय रातची उठली. आमाला काय म्हाइती, की तेला मुची करायची असेल म्हून ? नींदमध्ये होते के काय खुदा जाने, पण हे अशी आली अने ओटेवरसून उडी माराया लागली. रातचाच झगडा जाला होता. आन बायच्या पोटामंदी बछडा हाय–आमाला वाटला, लई तरास जाला म्हून जीवबीव देणार के काय उडी टाकून-शान–ओटा केटला ऊंचा छे–जोनी–काय जाला असता म्हंजी नसती आफत ! म्हून मी दौडत गेलो आन तिला मागसून घट्ट धरला. म्हणालो, "असा नाय कराचा–मी तुमाला सोडेल नाय"–तवा ती एकदम वराडली. समदे दौडत आले अने पूछल्याबगर आमाला मारूनशान गेले. कॉवर्डस्–मी येकला आन् ते कितने ! गप बसला. दुसरा काय करणार ? आन ते बायच्या बोंबा किती अने शिव्या किती ? काय समझुतीची वानी करावी का नाय ? मला बुरा इतकाच वाटते की तुज्या मायलाबी समदा तेचाच खरा वाटला. तू सांगेल काय तेला समदा ?" त्याने सरळपणी एवढं सांगितल्यावर मी मात्र लागलीच त्याच्यावर विश्वास ठेवला. मागेही असाच ठेवला होता. पण मला एकाएकी भडभडूनही आलं. एवडा चांगला जहांगीर पण त्याला आमच्या वाडीतून हे असं जावं लागणार होतं. मी मुसमुसून रडायला सुरवात केली, तेव्हा त्याने हसत हसत बॅगेतून एक लॉलीचॉप काढून माझ्या हातावर ठेवलं. दुसरंही पोपटसाठी काढून दिलं. देताना म्हणाला, "असा रडाचा नाय मैनाबाय–प्लीज–स्माईल–वन्स अगेन स्माईल–तुजा नाव मैना हाय–गानेवाला पंछी–याने द सिंगींग बर्ड–आमी जातेवख्त रडते कसाला ? बुरा लागते ते मनाला. आमाला तुजी आन् पोपटची बहुत याद येल. काय बुराबिरा जाला असेल तर माफी करा. आन् आमची बी याद करा." मग त्याने मोठं सामान तिथंच ठेवलं आणि एक मोठी व एक छोटी बॅग आणि कॅमेरा घेऊन तो निघाला. त्याला त्या पहाटेच्या वेळी निरोप दिला फक्त मीच. कंदील विझला होता आणि सगळीकडे अंधार झाला होता. सगळी वाडी अंधारात कोरडी ठणठणीत होऊन निजली होती. जागी होते फक्त मी–ओल्या डोळ्यांनी आणि भरल्या गळ्याने जागच्या जागी मुसमुसत.



१५ सप्टेंबर १९६५ 'माणूस'च्या अंकात प्रा. मधुसूदन गोखले यांचा 'कुलूपवतीभव' हा कुटुंबनियोजन या विषयावरचा लेख प्रसिद्ध झाला होता. असे ऐकिवात आहे, की या लेखाची सरकारदरबारी थोडीफार विचारपूस झाली. दैनिक 'मराठा' ने आपल्या साप्ताहिक अंकात या लेखाचा काही भाग पुनर्मुद्रित केला होता. गुजराथी दैनिक 'बंबई समाचार'च्या साप्ताहिक आवृत्तीत दोन हप्त्यात (दि. १९ व २६ डिसेंबर, १९६५) या लेखाचे संपूर्ण भाषांतर प्रसिद्ध झाले होते.

प्रस्तुतचा हा नवा लेख म्हणजे—

'कुलूपवतीभव'चाच पुढचा दुर्दैवी भाग आहे.

*सरकारची धाव आहे*

# कँपकडून कँपकडे

प्रा. मधुसूदन गोखले

**नवी आघाडी**

सरकारच्या हाती नव्यानेच सापडलेल्या कुटुंबनियोजनाच्या 'लूप' या साध्या, सोप्या, सोइस्कर आणि परिणामकारी साधनाचा आज सर्वत्र तडाखेबंद प्रचार-प्रसार चालू आहे. लोकसंख्या-नियंत्रणाच्या राष्ट्रीय आघाडीवर एक प्रमुख अस्त्र म्हणून या साधनाचा फार मोठ्या प्रमाणात वापर करण्याचे काम गेल्या काही महिन्यांपासून सरकारने हाती घेतलेले आहे. वर्तमानपत्रांतून आजकाल दररोज देशाच्या कानाकोपऱ्यांतून घेतल्या जाणाऱ्या सरकारी लूप-कँपच्या बातम्या वाचावयास मिळतात. या कँपची संख्या आणि या प्रत्येक कँपमधून शेकडो स्त्रियांनी लूप बसवून घेतल्याच्या बातम्या वाचत असता, सरकार ही आघाडी किती हिरीरीने लढवत आहे, याबद्दल संशय राहत नाही.


## एक कँप-विक्रम

महाराष्ट्रातील लूप-कँप मोहिमेतील अशाच एका ग्रामीण विभागातील कँपमध्ये **"एका डॉक्टरणीने केवळ अडीच तासांच्या अवधीत ११२ स्त्रियांची तपासणी करून त्यांपैकी ९३ स्त्रियांना 'लूप' बसविले--"** ही माहिती ऐकून वैद्यकीय-व्यवसायातील तसेच कुटुंबनियोजन-क्षेत्रातील अनेक कार्यकर्ते क्षणभर अवाक् झाल्या-खेरीज राहणार नाहीत. अनेकजण यावर विश्वास ठेवणार नाहीत. बातमी छापली गेली असती, तर त्यात छापण्यात काहीतरी चूक झाली आहे, असाच अनेकांना संशय येईल. पण वरील हकीकतीतील प्रत्येक आकडा खरा आहे. याचि देही याचि डोळा पाहिलेली ही घटना आहे ! या विशिष्ट लूप-कँपसाठी जमवण्यात आलेल्या एकूण ११२ स्त्रियांपैकी १९ जणींना तपासणीनंतर (त्या २।। तासांतच) 'लूप' बसविण्यास नकार देण्यात आला. यांपैकी १० ना १ ते २।। महिन्यांचा गर्भ असल्याचे तपासणीत आढळून आले होते, तर इतर ९ जणींना इतर काही वैद्यकीय कारणास्तव तपासणीनंतर नकार देण्यात आला. या साऱ्या घटनेचा जरा अधिक विचार करता हे स्पष्ट होईल, की 'लूप' बसविण्यासाठी ऑपरेशन-टेबलावर घेतलेली प्रत्येक स्त्री १।। मिनिटाच्या आतच काम होऊन बाहेर आली होती (त्यांतील ९३ लूपसह तर १९ लूपशिवाय).

ही गती थक्क करणारी आहे ! विक्रम करणारी आहे !! मती कुंठित करणारी आहे !!! आणि त्याबरोबरच मनात अनेक शंकाकुशंका आणि भीती निर्माण करणारी आहे ! वर उल्लेखलेला कँप हा एका विशिष्ट जिल्ह्यातील सरकारी कँप-मालिकेतील केवळ एक कँप होता आणि सरकारी-यंत्रणेबरोबर रोज एका नव्या गावी जाऊन याच गतीने या डॉक्टरीणबाई स्त्रियांना लूप बसवत असल्याचे कौतुकोद्गार कँप-संचालकांचे तोंडून सारे ऐकत होते.

## सारा थाट मतदान–केंद्राचा......

अशा प्रकारच्या सरकारी 'लूप' कँपचा एकूण थाट पाहावा, तर तो अटीतटीने आणि हिरीरीने लढवल्या जाणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांमधील एखाद्या महत्त्वाच्या मतदान-केंद्रासारखा असतो. कँपची ठराविक तारीख, वेळ, जागा, यांची द्वाही; वर्तमानपत्रे, भित्तिपत्रके, प्रचारसभा, वैयक्तिक प्रचार यांच्या द्वारा फिरलेली असते. कुटुंबनियोजनखात्याचे त्या त्या भागातील 'विभाग-कार्यकर्ते' (Field workers) "लूप–योग्य" स्त्रियांच्या शोधार्थ नेमून दिलेल्या खेडचापाडचांतून फिरत असतात, सभा घेत असतात, छोटचा गटांतून चर्चा करीत असतात, याद्या तयार करीत असतात, आपापल्या कुवतीप्रमाणे या साधनाचे महत्त्व पटवून देत असतात. विभाग-कार्यकर्त्या (Lady Field workers) हे काम करत असतील यात नवल नाही, पण कित्येक ठिकाणी (नव्हे बहुसंख्य ठिकाणी) पुरुष-कार्यकर्त्यांकडेच हे काम असल्याने ही सारी माहिती गरजू स्त्रियांना ते कशी पटवू शकत असतील, हे



कॅंपकडे...

तेच एक जाणोत. पण ते कार्यकर्ते आपल्या विभागातील असंख्य स्त्रिया ठराविक दिवशी कॅंपसाठी आणतात हे मात्र खरे !

## त्या दिवशीची मोटार-धाई

ठराविक दिवशी आपापले 'मतदार' केंद्रावर आणण्याची धडपड चालू होते. आपापल्या याद्या घेऊन आपल्याला नेमून दिलेल्या खेड्यातून स्त्रियांना घराबाहेर काढण्याची मोहीम सुरू होते. त्या त्या खेड्यापासून केंद्रापर्यंत या सर्व स्त्रियांना आणण्यासाठी सरकारी जीप्स, स्टेशनवॅगनस्, अॅम्ब्युलन्स कारस्, मोबाईल हॉस्पिटल व्हेनस्, आणि कधी कधी ट्रक्स यांसारख्या वाहनांचा उपयोग केला जातो. अशा तऱ्हेने जो तो प्रचारक आपापली 'मते' घेऊन 'कॅंप'च्या ठिकाणी येऊन पोहोचतो.

## प्रश्न—कार्डे—रांगा......

जरा जाणती मुले घरी ठेवून, तान्ही मुले बरोबर घेतलेल्या गावोगावच्या लेकुर-वाळ्या स्त्रिया तेथे गोळा झालेल्या असतात. संसारतापाने तापलेल्या, पोरवड्याला कंटाळलेल्या, यातून आता सुटका होणार या आशेला लागलेल्या, काय होणार, कसं निभणार याबाबत साशंक असलेल्या, या साऱ्या स्त्रिया; अर्धवट विश्वासाने आणि बऱ्याचशा अगतिकतेने एकमेकींना आधार देत, भांबावल्या अवस्थेत तेथे येतात न येतात तोच, पुन्हा त्यांना 'लूप'बद्दलची माहिती दिली जाते. प्रत्येकीची माहिती लिहून घ्यायची आहे, असा इशारा दिला जातो. माहिती घेणाऱ्या 'बाई' किंवा 'बाप्या'च्या टेबलाजवळ रांगा धरल्या जातात. प्रत्येकीला आपले संपूर्ण नाव, गाव, पत्ता, वय, एकूण मुले, एकूण बाळंतपणे, या आधीचे बाळंतपण होऊन किती काळ झाला, मागील मासिकपाळीची तारीख यांविषयी प्रश्न विचारून प्रत्येकीच्या नावाचे एक एक कार्ड तयार केले जाते. ज्या त्या बाईचे कार्ड तिच्या तिच्या हाती देण्यात येते आणि "आत गेलात की डॉक्टरीणबाईंच्या हाती कार्ड द्यायचं! त्या तुम्हाला तपासतील आणि तुम्ही 'लूप'साठी योग्य असाल तर २/४ मिनिटांत काम होऊन तुम्हाला परत बाहेर येता येईल," असे प्रत्येकीला पुनः पुनः बजावले जाते !

## ऑपरेशनरूमच्या आत......

आपली पाळी केव्हा येणार म्हणून ऑपरेशनरूमच्या दारापुढे हातात आपापले

कार्ड घेतलेल्या स्त्रिया रांग धरून उभ्या राहतात. ऑपरेशनरूमच्या आतबाहेर सिस्टर्स, नर्सेस्, वॉर्डबॉईज यांची सारखी ये–जा चालू असते अर्धवट उघडलेल्या दारातून आत डोकावण्याचा प्रयत्न स्वाभाविकपणेच चालू असतो. खोलीच्या आत खोलीच्या निम्म्यावर पांढरा पडदा असतो आणि खोलीच्या त्यापलीकडच्या भागात काय चालू आहे, हे सहसा दिसत नाही. अलीकडच्या भागात मात्र एकच वांदल चालू असते. औषधाच्या वासाने वातावरण भरून गेलेले असते. प्रचंड स्टोव्हच्या आवाजाने एक प्रकारचा आवाज घुमत असतो. त्यातच ॲल्युमिनियमच्या पातेल्यातील उकळत्या पाण्यात निरनिराळी, चकचकीत आयुधे टाकल्याचा आवाज येत असतो. स्टरिलाझर इन्चार्ज व त्याचे सहाय्यक, वॉर्ड बॉईज, नर्सेस यांचे दबल्या आवाजातले बोलणे व चपळ हालचाली चालू असतात. ट्रे जय्यत तयार करून पडद्याआड पोहोचवणे, पडद्याआडून बाहेर दिलेले जुने ट्रे परत घेणे, त्यातली आयुधे उकळत्या पाण्यात टाकणे, हातमोजे उकळून घेणे, लूपचा इन्सर्टर सोल्यूशनमध्ये निर्जंतुक होण्यासाठी टाकणे, ट्रे धुऊन वाफारून घेणे; नव्या ट्रेमध्ये आवश्यक ती सर्व साधनसामग्री नीट मांडून ठेवणे; नव्या इन्सर्टरमध्ये लूप ओवून तो ट्रेमध्ये ठेवणे; अशी एक ना अनेक कामे बिनचूकपणे व चपळपणे चालू असतात. या साऱ्या गोष्टींकडे पाहण्याची जिज्ञासा असूनही आत शिरलेल्या बाईला या गोष्टी पाहत बसायला वेळ नसतो. कारण पडद्याआडून एक बाई बाहेर आली, की दुसरीला आत घेऊन जाण्याची एकच घाई सोबत असलेल्या नर्सने चालवलेली असते.


अशा रीतीने त्या पडद्याआड गेलेली स्त्री काही मिनिटांतच 'लूप'वती होऊन बाहेर येते. निवडणुकीतील मतदान केंद्रातदेखील पोलिंगबूथमध्ये जाऊन मत देऊन बाहेर पडायला याहून जास्त वेळ लागत असेल !

## गोळ्या...गोळ्या...गोळ्या......

काम पूर्ण होऊन परत आलेल्या स्त्रियांना आपापले कार्ड घेऊन पुनः एका टेबलाजवळ जावे लागते. तिथे त्यांना तीन तऱ्हेच्या गोळ्या देण्यात येतात. " या तीन गोळ्या रोज एक एक प्रमाणे घ्यायच्या. (ए. पी. सी.) या दुसऱ्या नऊ गोळ्या रोज तीनप्रमाणे तीन दिवस घ्यायच्या. (सल्फा) " आणि या आणखी तीन गोळ्या आहेत, त्याही रोज तीन (सकाळ, दुपार, संध्याकाळ) प्रमाणे तीन दिवस घ्यायच्या (कॅल्शियम). एकूण गोळ्या २१ आहेत. तीन दिवसांत संपवायच्या बरं का !" असे प्रत्येक स्त्रीला सांगितले जाते आणि ती स्त्री मान डोलावते.

## सुटले एकदाची ..!

तोपर्यंत दुसऱ्या एका टेबलावर काही फॉर्मस् भरून तयार ठेवलेले असतात. " इथे आंगठा करा," म्हणून सांगितले जाते. तिथे आंगठा उठवला जातो. " हा डाव्या हाताचा आंगठा सौ. बाईचा असे," असा दस्तुर खुद्द लिहून कोणी परिचित सही करतो आणि त्याच वेळी बाईच्या हाती ५ रुपये दिले जातात. सुटले एकदाची,




' सुटले एकदाची ! '

म्हणून बाई जरा वाऱ्यावर येते. पदराने घाम पुसते. नोट नीट कडेसरीला लावते. इतका वेळ कुणाकडेतरी दिलेल्या तान्ह्या मुलाला घेऊन गप्प करू लागते.

## कुणी किती आणल्या ...

कार्यकर्ते आपापली माणसे गोळा करण्याच्या नादाला लागतात. आपण आणलेल्या एकेका गावातील सर्व स्त्रियांचे काम पूर्ण झाले असेल, तर त्यांना त्यांना परत नेण्यासाठी गाडी कुठली मिळणार, केव्हा मिळणार, याचा शोध चालू होतो. यादीतील कोण आले, कोण राहिले, याची तपासणी चालूच असते. एकूण स्त्रिया आल्या किती, याचा आकडा अधूनमधून ऐकू येत असतो. कोणत्या कार्यकर्त्याने किती पेशंट आणले, यावर चर्चा चालू असते, वाद चालू असतात.

यांतल्या ह्या पाच स्त्रिया मी आणल्या आहेत, असे एक कार्यकर्ता सांगत असतो, तर दुसरा त्यांतील काहींवर आपला हक्क असल्याचा दावा करत असतो. शेवटी वादविषय झालेल्या स्त्रियांनाच विचारले जाते की, " बाई ग, या दोघांपैकी तुमच्याकडे माहिती द्यायला प्रथम कोण आले होते ? कुणाच्या सांगण्यावरून तुम्ही इथे आलात ? ... " अशा न्यायनिवाड्यांचे व कुणी किती आणले, हे पाहण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे प्रत्येक पेशंटमागे कार्यकर्त्याला १/१ रुपयाप्रमाणे ' इन्सेन्टिव्ह ' म्हणून मिळावयाचा असतो.

## निवडणुकीत पडल्याचे दुःख ...

कँप ज्या ठिकाणी असतो, त्या केंद्राचे प्रमुख एकूण आकडा किती झाला, याची वारंवार चौकशी करत असतात. दुसऱ्या ठिकाणच्या कँपमध्ये किती आकडा होता, त्याच्याशी मनातल्या मनात तुलना चालू असते. आपला आकडा तितका होईल की नाही, याचा मनाशी हिशेब चालू असतो. त्यासाठी अधूनमधून हाताखालच्या कर्मचाऱ्यांवर ओरडणे चालू असते. जिल्हापरिषदेचे सरकारी कर्मचारी आणि बिनसरकारी अधिकारी कँपकडे जातीने लक्ष पुरवत असतात. दुसऱ्या ठिकाणच्या आकड्याहून आपल्या कँपमधील आकडा कमी भरला, तर कार्यकर्त्यांना निवडणुकीत आपटी खाल्ल्याइतके दुःख होते !

## बातम्या, प्रसिद्धी, आकडे ...

वर वर्णन केलेल्या ' लूप-कँप 'च्या दृश्यात अतिशयोक्तीचा अंशही नाही. थोड्या-

फार फरकाने हे सारे सरकारी लूप-कँप याच थाटात चालतात आणि मग वर्तमानपत्रांतून बातम्या प्रसिद्ध होतात–" अमक्या कँपमध्ये इतक्या स्त्रियांना ' लूप ' वसवण्यात आले. " " क्ष गावच्या इतक्या स्त्रियांनी ' लूप 'चा अंगीकार केला ! " " अमूक तालुक्याने इतकी संख्या गाठली. " आणि शेवटी " अमक्या जिल्ह्याला लूप-कार्याबद्दल ढाल बक्षीस मिळाली. "

**प्रभावी साधन, पण ... !**

' लूप ' हे कुटुंब-नियोजनाचे एक प्रभावी साधन आहे, याबाबत कोणीही शंका घेणार नाही. आजपर्यंत अस्तित्वात असलेल्या साधनांत सर्व दृष्टीने विचार करता ' लूप ' हे भारतीय कुटुंब-नियोजन चळवळीला खरोखरीच मिळालेले वरदान आहे, असे म्हणावे लागेल. परदेशांत जेव्हा साधनांची गुणानुक्रमाने प्रतवारी ठरवली जाते, तेव्हा गर्भाशयात ठेवावयाच्या ' लूप ' व तत्सम इतर साधनांना पोटात घ्यावयाच्या संततिप्रतिबंधक गोळयांच्या खालोखाल क्रमांक देण्यात येतो. तिकडे स्त्रियांनी पोटात घ्यावयाच्या गर्भप्रतिबंधक गोळयांना सर्वोच्च स्थान दिले जाते. भारतीय परिस्थितीचा विचार केला, येथील अशिक्षिततेचे प्रमाण लक्षात घेतले, येथील दारिद्र्याकडे लक्ष दिले व या पोटात घ्यावयाच्या गोळयांचेबाबत रोज ठराविकवेळा एकप्रमाणे सतत २० दिवस गोळया घेणे, विटाळशीपणी न घेणे व पुन्हा २० दिवस क्रमाने घेणे, ही बिनचूक नियमिततेची महत्त्वाची अट लक्षात घेतली, तर हे साधन अगदी १००% यशस्वी ठरले असते. तरी आपल्याकडे सर्वसामान्य जनतेला ते परवडणारे नाही. (किंमत २० गोळयांना अंदाजे १६ ते १८ रुपये). तसेच अशी नियमितता अपेक्षेणेही आपल्याकडे केवळ अशक्य असल्याने, हे साधन व्यवहार्य नाही, ही गोष्ट मान्यच करावी लागेल. याउलट ' लूप ' हे साधन मात्र इतर संततिनियमनाच्या साधनांपेक्षा (डायफ्रेम, जेली, कंडोम, इ.) निश्चित सोयिस्कर आहे. त्याला इतर साधनांप्रमाणे दररोज वापरण्याची, धुण्याची, काळजी घेण्याची जरूरी नाही. बाह्यसाधन वापरत असल्याची अनैसर्गिकतेची जाणीव नाही; ऐनवेळा साधन विसरले, वापरले नाही, फाटले अशी तक्रार नाही; आडोसा, एकांत याची आवश्यकता नाही; ' लूप ' गर्भाशयात आहे, तोवर गर्भसंभवाची भीती नाही आणि मूल हवेसे वाटेल, तेव्हा ' लूप ' काढून घेतल्यास गर्भसंभवात कोणतीही अडचण नाही, अशा अनेकविध फायदे असलेल्या या साधनाला भारतात " जनता-साधन " म्हणून महत्त्व प्राप्त व्हावे, हे साहजिक आहे.

**' लूप ' प्रसारकार्यातील प्रमुख अडचण ...**

अशा या गुणी साधनाचा सर्वसामान्य जनतेपर्यंत लवकरात लवकर आणि जास्तीत जास्त प्रचार कसा होईल व सर्वसामान्य जनतेला देशाच्या कानाकोपऱ्यांतून हे साधन कसे उपलब्ध होईल, या विचाराने या क्षेत्रातील कार्यकर्ती माणसे भारावून जाणे साहजिकच आहे. पण असे करण्यात काही अत्यंत महत्त्वाच्या अड-

चणी असल्याचे अगदी सुरवातीसच लक्षात आलेले आहे. लूप बसवणे ही एखादी शस्त्रक्रिया नसली, तरी ते एक कौशल्याचे काम आहे, त्याचा स्त्रीच्या गर्भाशयाशी संबंध असल्याने, तेथे ते कित्येक दिवस ठेवावयाचे असल्याने व स्त्रीच्या शरीरात गर्भधारणेच्या कार्यात अडथळा आणण्याचे महत्त्वाचे कार्य त्या साधनाद्वारे व्हावयाचे असल्याने, लूप बसवताना स्त्रीच्या जननेंद्रियाची व गर्भाशयाची नीट तपासणी करणे, गर्भाशयाच्या खोलीचा नीट अंदाज घेणे, गर्भाशयाचा आकार पाहून लूपची निवड करणे, गर्भाशय निरोगी, दोषहीन सुस्थित असल्याची खात्री करून घेणे, या साऱ्या गोष्टी आवश्यक असतात व या साऱ्या गोष्टी बिनचूकपणे करणे केवळ पदवीधर, प्रशिक्षित, तज्ज्ञ आणि अनुभवी अशा स्त्री-रोगचिकित्सक डॉक्टर-लाच (गायनॅकॉलॉजिस्ट) शक्य असते आणि म्हणूनच 'लूप' या साधनाला भारतात सार्वत्रिक वापरास परवानगी देताना हे साधन फक्त उपरिनिर्दिष्ट अशाच डॉक्टरांनी बसवले पाहिजे, अशी खास अट इंडियन मेडिकल कौन्सिलने घातली आहे.

**त्यावर तोडगा ... कँप ! ...**

'लूप'च्या सार्वत्रिक प्रसारात वरील अट हा एक फार मोठा अडथळा आहे. कारण अगदी शहरी विभागातील सरकारी वा खासगी कुटुंब-नियोजन केंद्रांतून-देखील अशा तऱ्हेचे डॉक्टर मिळणे हे कठीण. मग ग्रामीण विभागांतून विखुरलेल्या कुटुंब-नियोजन केंद्रांना किंवा प्राथमिक आरोग्य–केंद्रांना असे डॉक्टर्स कोठून मिळणार ? साधनसामग्रीने सुसज्ज दवाखाने किती ठिकाणी असणार ? शहरांतून हे काही प्रमाणात शक्य आहे, पण ग्रामीण विभागांतून ते शक्यच नाही. शिवाय ग्रामीण विभागांतून 'लूप' बसवून घेण्याचे हे काम पुरुष डॉक्टरांकडून करून घेण्यास स्त्रिया तयार होणार नाहीत. या साऱ्या अडचणींवरचा तोडगा म्हणून 'लूप–कँप' हे तंत्र शोधून काढण्यात आले आहे !

अशा तज्ज्ञ डॉक्टरीण (किंवा डॉक्टरणी) 'कँप'पुरती खेड्यात न्यावयाची. तिथे सुसज्ज ऑपरेशनरूम थाटायची; भोवतालच्या पाचपंचवीस खेड्यांतील स्त्रियांना एकत्रित आणून या ठिकाणी 'लूप' बसवायचे आणि पुढच्या 'कँप'वर जायचे, हा यावरचा सरकारने शोधून काढलेला तोडगा आहे आणि हे कँप–तंत्र सरकारी यंत्रणेला नवे मुळीच नाही. पूर्वी पुरुषांवरील संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियां-साठी अशीच शिबिरे घेण्यात येत असत. त्या तंत्रात निष्णात असलेली यंत्रणा आता "लूप–शिबिरां"ची मोहीम हाताळत आहे.

**विचारवंतांचा विरोध**

अशा तऱ्हेचे कँप घेणे आणि ते मोठ्या प्रमाणात घेणे, यात सरकारला फार मोठा धोका पत्करावा लागेल, अशा तऱ्हेचा स्पष्ट इशारा अनेक विचारवंतांनी या बाबतीत दिलेला होता. अशा कँपमधून निर्माण होणारे धोके, उत्पन्न होणाऱ्या अडचणी सरकारपुढे मांडण्याचा प्रयत्न केला होता. या कँप–मोहिमेमुळे घाई, गर्दी,

संख्या, विक्रम, स्पर्धा या साऱ्यांच्या संगतीने 'लूप' या साधनाचे यश डागाळेल, अशी खास भीती अनेक देशी आणि विदेशी तज्ज्ञमंडळींनी व्यक्त केली होती; पण सरकारी यंत्रणेने या साऱ्याकडे दुर्लक्ष करण्याचे ठरविलेले दिसते आणि या उलट या 'लूप-कँप' मोहिमेत जिल्ह्याजिल्ह्यासाठी विशिष्ट आकडा पूर्ण करण्याचे इष्टांक (Targets) ठरवून देण्यात आले आहेत. आणि त्या इष्टांकांना अनुसरून जिल्हा आरोग्य–अधिकाऱ्यांकडून तालुक्यातालुक्याला आकडे ठरवून दिले असून, ते इष्टांक पूर्ण करण्यासाठी सारी यंत्रणा राबत आहे.

## पूर्वी एकदा अनुभव आला आहे

कुटुंब–नियोजनाच्या चळवळीत यापूर्वी एकदा पुरुषावरील शस्त्रक्रियांची प्रचंड मोहीम उघडली गेली होती आणि त्या वेळी शस्त्रक्रियांचे प्रचंड कँप घेण्यात येत असत. पण सुदैवाने २।३ वर्षांतच या प्रकारच्या कँपमधील अव्यवहार्यता आणि दोष लक्षात आल्याने सरकारने स्वतःच त्यांना काही प्रमाणात आळा घातला. ज्यांना अधिक मुले आहेत, आणखी मुले नको आहेत, साधने वापरणे ज्यांना सहज शक्य होणार नाही, अशा पुरुषांसाठी शस्त्रक्रिया एक प्रभावी मार्ग म्हणून मान्य करावयास हवा. बऱ्याच वर्षांपासून माहीत असलेल्या या मार्गात ज्या वेळी आधुनिक वैद्यकीय विज्ञानाने खूपशी सुलभता आणली, तेव्हा भारतातील ग्रामीण जनतेला हा मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी शस्त्रक्रियाशिबिरांची योजना करण्यात आली. लोकशाहीत निवडणुका लढवण्याचे तंत्र माहीत असलेल्या कार्यकर्त्यांनी आणि सरकारी कर्मचारी-यंत्रणेने कुटुंब–नियोजनक्षेत्रात त्याच तंत्राचा वापर करून हजारो शस्त्रक्रिया एकेका ठिकाणी घेणारी शिबिरे घेतली. संख्या, विक्रम, गती, बक्षिसे, आर्थिक प्रलोभने, उद्घाटने, व्याख्याने या साऱ्या गोष्टींमुळे ही शिबिरे गाजली.

अशा शस्त्रक्रियाकँपच्या यशस्वितेबाबत, त्यांतील कार्यक्षमतेबाबत वर्तमानपत्री डांगोरा किती जरी पिटला गेला असला, तरी अशा स्वरूपाच्या यंत्रणेतील दोष शहाण्यांच्या लक्षात आल्याखेरीज राहिले नाहीत. त्यांनी त्याबद्दल सरकारवर उघड टीका केली. हे टीकाकार कुटुंबनियोजन-चळवळीचे किंवा शस्त्रक्रिया या संतति-नियमनाच्या मार्गाचे विरोधक नव्हते, तर ज्या पद्धतीने सरकार हा प्रश्न हाताळत होते, त्या पद्धतीला त्यांचा विरोध होता. त्यामुळे कुटुंबनियोजन-चळवळीचा नाश होईल, म्हणून तळमळीने ते बोलत होते.

आणि उशिरा का होईना, सरकारला आपली चूक कळून आली. अशा प्रचंड शिबिरांची अप्रोयजकता सरकारच्या लक्षात आली. सरकारने आपले पाऊल चुकल्याचे स्पष्ट शब्दांत जरी मान्य केले नाही, तरी पर्यायाने अशा प्रचंड कँपबाबत इतर विविध कारणांसाठी आपली नापसंती अधिकृतरीत्या या क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना कळवली. या दृष्टीने आठ जानेवारी, १९६५ चे महाराष्ट्राच्या सार्वजनिक आरोग्य-खात्याचे (No STRN–27112 F. OF 1965) परिपत्रक पाहण्यासारखे आहे.




पुन्हा तेच...

## सरकारने कबूल केलेली चूक

पत्रकात असा सुरवातीलाच स्पष्ट इशारा देण्यात आलेला आहे की, " एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणावर संघटित केली जाणारी कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया-शिबिरे सार्वजनिक आरोग्यखात्याच्या संचालयास संमत नसल्याने अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया-शिबिरांना या पुढे आरोग्यखाते मान्यता देणार नाही व अशा शिबिरांनिमित्त होणारा खर्च मंजूर करणार नाही. " या परिपत्रकात या नव्या धोरणाची कारण-मीमांसा करण्याचा पुढे प्रयत्न केला असून, निरनिराळी ५।६ कारणे देण्यात आली आहेत. त्यांत अशा कँपच्या व्यवस्थेत होणारे घोटाळे, मोटारवर होणारा खर्च, वगैरे कारणांबरोबर एका वाक्यात पुढील गोष्ट मान्य करण्यात आली आहे; ती म्हणजे " अशा मोठ्या शिबिरांतील शस्त्रक्रियांमध्ये गुंतागुंत निर्माण होणे व अपयश येणे या बाबतचे प्रमाण जास्त असते, असे आढळले आहे. " सरकारने दिलेली ही कबुली महत्त्वाची मानली पाहिजे. याच परिपत्रकात " **मोठे शिबिर** " या शब्दाची व्याख्या व अर्थ पुढे स्पष्ट केला आहे. खात्याच्या व्याख्येनुसार २०० हून अधिक शस्त्रक्रिया एकाच दिवशी, एकाच ठिकाणी करणारे शिबिर हे मोठे शिबिर व एकाच दिवशी २५ हून अधिक शस्त्रक्रिया एका डॉक्टरने करणे हे गैर, असे स्पष्ट शब्दांत सांगितले आहे.

या धोरणाचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील प्रचंड शस्त्रक्रिया शिबिरे बंद पडली आणि पळवाट म्हणून दररोज ७–८ डॉक्टर्सनी १५० ते १७४ शस्त्रक्रिया करणारी जरी लहान शिबिरे काही ठिकाणी घेण्यात येऊ लागली, पण तेवढ्यात ' लूप ' या नव्या साधनाचा वापर मान्य झाल्याने या शस्त्रक्रियाशिबिरांचा जोर बराच मंदावला आणि सारे कुटुंबनियोजन चळवळीचे कार्यक्षेत्र ' लूप 'मय झाले.

## पुन्हा तीच चूक करणार का ?

आज पुनश्च कँप-तंत्र सुरू झाले आहे. वरील परिपत्रक केवळ शस्त्रक्रिया-शिबिरांना उद्देशून असल्याने त्यातील २०० हून लहानचा कँप व एका दिवशी एका डॉक्टरने २५ हून अधिक केसेस न करणे, ही बंधने ' लूप 'ला लावण्याचे कुणाला कारण वाटलेले दिसत नाही ! शस्त्रक्रियांचे मोठे कँप बंद

झाल्यामुळे हतोत्साह झालेली यंत्रणा आता नव्या उत्साहाने कामाला लागलेली आहे. या दोन कँप्समध्ये फरक आहे तो साधनांचा. शस्त्रक्रिया गेल्या आणि लूपक्रिया आल्या, पुरुष-पेशंटऐवजी स्त्री-पेशंट आले, पुरुष-सर्जन्सऐवजी स्त्री-गायनॉकॉलॉजिस्ट आली. बाकी यंत्रणा तीच, प्रचारक तेच, पद्धती तीच, प्रकार तोच; स्पर्धा, विक्रम, गती, बक्षिसे, आर्थिक प्रलोभने, लेख, भाषणे, फोटो आणि ढाली ! सारे काही तेच ! आणि या साऱ्यांबरोबर तेच पूर्वीचे दोषही इथे निर्माण होणार, याची मात्र कुणालाच पर्वा नाही !

## या गोष्टींना जबाबदार कोण ?

'लूपक्रिया ही शस्त्रक्रियेपेक्षा अधिक काळजीपूर्वक व्हावयास हवी. एकदा कापून मोकळे झाले की झाले ! असा येथे खाक्या नाही. पॉलिथीनचा एक बाहेरचा पदार्थ सतत गर्भाशयात राहावयाचा असल्याने त्याबद्दलचे ज्ञान स्त्रीला पूर्णपणे हवे. त्याची काळजी घ्यावी लागेल. त्याचे परिणाम जाणीवपूर्वक पाहावयास स्त्रीने शिकले पाहिजे " एकदा लूप बसवून घ्या आणि विसरून जा, " ही घोषणा करणे सोपे आहे, पण असे सहजासहजी विसरता येत नाही. इतक्या सुलभतेने हे साधन सर्वांनाच धार्जिणे ठरेल, असे नाही. काही टक्के स्त्रियांना त्रास होईल, काहींना ते गळून पडल्याचे कळणार नाही. असा त्रास ज्यांना होणार नाही, त्या भाग्यवान, पण त्रास झालेल्या इतर थोड्याच जरी असल्या तरी त्यांच्यामुळे सर्वत्र साशंकता, घबराट निर्माण होईल. कँपमधून परत गेलेल्या, खेड्यापाड्यांतून, दूरवर विखुरलेल्या, जवळात जवळचे वैद्यकीय मदतीचे ठिकाण ५।७ मैल दूर असलेल्या, ग्रामीण अडाणी स्त्रियांना काही त्रास झाला, (आणि काही टक्के स्त्रियांना तो होणारच,) रक्तस्राव फार होऊ लागलाच, ओटीपोटात कळा येऊ लागल्या, पाळीचे वेळी अधिक त्रास होऊ लागला, तर त्यांनी काय करायचे ?

## या धोरणाने आत्मघात होईल...

कँपची वावटळ निघून जाताच मागे यांच्यासाठी निश्चित यंत्रणा आज तरी कार्यक्षमरीत्या उभी नाही. अशा परिस्थितीत संख्या, वेग, विक्रम यांचे मागे लागून आत्मघात करून घेण्यापेक्षा ज्या केंद्रावर कायम राहणारी तज्ज्ञ डॉक्टरीण आहे, अशाच केंद्रातून थोड्या थोड्या संख्येने लूप-योग्य अशा स्त्रियांना 'लूप' बसविण्याचे काम व्हावयास हवे. त्यासाठी या कार्यक्रमाला संथ वाटचाल करावी लागली तरी हरकत नाही. असे डॉक्टर्स जेथे उपलब्ध असतील, सुसज्ज दवाखाने असतील व त्या दवाखान्यांच्या सेवाक्षेत्रातील ( Servics Area ) सर्वांशी नित्य संपर्क साधू शकेल, अशी जेथे कार्यक्षम-यंत्रणा असेल, अशाच ठिकाणी अशा 'लूप' क्रियांना परवानगी असावी. असे झाले तरच या नव्या साधनाचा संथपणे पण परिणामकरीत्या सर्वत्र प्रसार-प्रचार व स्वीकार होऊन खरोखरीच काही टिकाऊ कार्य होण्याची शक्यता आहे. ● ● ●

# गीतांजली, यीटस् आणि नोबेल पारितोषिक

१९१२ साली कु. रविंद्रनाथ ठाकूर इंग्लंडला गेले होते. त्यांची मनस्थिती चांगली नव्हती. विशेषत: सायंकाळच्या सावल्या वाढू लागल्या की त्यांच्या चित्त-वृत्ती अधिकच उदास होत. अशावेळी एकटे राहणे अशक्य होत असे. म्हणून ते विख्यात चित्रकार विलयम रोदेस्टीन यांच्याकडे जाऊन बसत. तिथेच त्यांचा बर्ट्रांड रसेल, एच्. जी. वेल्स, स्ट्रॅफोर्ड ब्रूक, नेव्हिनसन यांच्यासारख्या थोर थोर विचारवंत, टीकाकार, पत्रकारांचा परिचय झाला. अँड्रूज आणि प्रसिद्ध आयरिश कवी डब्ल्यू. बी. यीटस् यांचीही रविंद्रनाथांशी चांगलीच ओळख झाली.

रविंद्रनाथांच्या प्रतिभेची खरी उंची समजू शकणारी अशी ही मर्मज्ञ माणसे होती. रविंद्रनाथांनी गीतांलीचे जे इंग्रजी भाषांतर केले होते, ते यीटस्च्या हाती पडले आणि यीटस् मंत्रमुग्ध होऊन गेले. गीतांलीने त्यांना वेडच लावले होते. रेल्वे, ट्राम, बसमधून जाताना ते गीतांजली वाचत बसत असत. त्या नादात ते भोवतालचे जग विसरून जात. व गर्दीतही स्वत:ला हरवणारी विलक्षण व्यक्ती पाहून आजूबाजूच्या माणसांच्या डोळ्यांत कुतूहल उमटू लागे. हे लक्षात येताच यीटस् पुस्तक मिटून घेत. पण त्यांच्या अंत:चक्षूसमोर गीतांजलीतील गीतेच साकार होऊ लागत. "जन्मभर माझ्या अन्तर्मनात उभी होत असलेली स्वप्नसृष्टीच या कवितांतून व्यक्त झाली आहे," असे यीटस् नेहमी म्हणत.

स्ट्रॅफोर्ड ब्रूक यांनी रविंद्रनाथांना लिहिले होते, "कविता वाचताना केवळ आदर व संतोष या भावनांपेक्षा कितीतरी उच्च पातळीवर मी वावरत होतो. माझ्या आत्मोन्नतीस त्यांचे विलक्षण साह्य झाले. आनंद आणि सौंदर्य यांची विल-क्षण खोल मुद्रा माझ्या मनावर उमटली आहे."

गीतांजलीने या सगळ्या जाणकार मर्मज्ञांना एवढे मोहून टाकले होते की, अखेर यीटस् यांनी पुढाकार घेऊन रविंद्रनाथांना मानपत्र देण्याचा समारंभ अत्यंत उत्सा-हाने घडवून आणला.

आणि या सगळ्या प्रशंसेनेच नोबेल परितोषिक–समितीचे लक्ष रविंद्रनाथांकडे वेधले गेले आणि १९१२ साली, नोव्हेंबर महिन्यात एका सायंकाळी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाल्याचे जाहीर करण्यात आले.

• • •

# प्रपंच करावा नेटका

## दोन प्रतिक्रिया


## १ : ‘ मद्रासी ’ फॉर्म्युल्याचा हिंदी चित्रपट

‘ प्रपंच करावा नेटका ’ नाटकाचं नाव तर मोठे आकर्षक व अर्थप्रवाही. सादर करणार – ‘श्रीरंग साधना ’ ही नामवंत व्यावसायिक नाट्यसंस्था. दिग्दर्शन- आत्माराम भेंडे या जाणकार व अभ्यासू कलावंताचे. खेरीज भरीला नावारूपाचे अन्य कलावंत आणि त्यात मुंबईच्या प्रयोगानंतर पुण्यात या नाटकाबद्दल चांगलीच ‘ हवा ’ निर्माण झालेली. या पार्श्वभूमीवर पुणेकर रसिकांची गर्दी उडून पहिलाच प्रयोग हाउसफुल्ल झाला असल्यास नवल नाही.

कुटुंबातील जबाबदार व्यक्तीच बेजबाबदारपणे वागू लागली तर सर्व कुटुंबाची कशी वाताहत होते आणि अशा व्यक्तीस उशिरा जाग आली, तर कोसळलेला कुटुंबाचा डोलारा पुन्हा उभा करणे किती कर्मकठीण असते, हे सांगणारी कथा या नाटकात गुंफली आहे.

**कथानक**

अप्पा व राधा हे दांपत्य आणि बापू, बाळ व सुलू ही त्यांची तीन अपत्ये यांची ही कथा. या कुटुंबाचा प्रत्येक घटक आपल्यापरीने स्वतंत्र आहे. कौटुंबिक जिव्हाळा त्यात कुठेच नाही. अप्पा हे केवळ नाइलाजाने नोकरी करणारे कलंदर कवी. बापू हा योग्य मार्गदर्शनाअभावी वाया गेलेला, मनाने हळवा, पण वृत्तीने कणखर असणारा तरुण. सुलू ही घरातील वातावरणाला साजेशा पद्धतीने वागणारी बेजबाबदार तरुणी. बाळ अत्यंत हुशार पण कमालीचा धांदरट, तर राधा या सर्वांचे तंत्र शक्यतो जुळवून घेणारी सुगृहिणी. कुटुंब अत्यंत मोडकळीस आले असताना, चाळीस-बेचाळीस वर्षे राधाशी संसार केलेल्या अप्पांना सर्व कुटुंबाचा तिटकारा येऊ लागतो. माझं मन मारून मी यांच्यासाठी का कष्ट उपसू ? झालं हे पुष्कळ झालं. आता माझं जीवन मला जगू दे; अशा अर्थाचे विचार व्यक्त करून हा जवळजवळ निवृत्तीला आलेला गृहस्थ उघडउघड नायकिणीच्या माडीवर जातो. सर्व कुटुंब वाऱ्यावर उघडे पडते. बापूच्या सहनशीलतेच्या मर्यादा संपतात. तोही वडिलांच्या पाठोपाठ ‘ माडी चढतो. ’ बाप–लेकाचा खटका उडतो. इकडे सुलू मनोहर राणे नावाच्या बेजबाबदार तरुणाच्या जाळ्यात अडकते. नको ती गोष्ट होऊन जाते. बापू



श्रीकांत मोघे
उषा लिमये

घडलेली घटना आई–वडिलांच्या कानावर घालतो. परंतु बेजबाबदार अप्पा या गंभीर परिस्थितीची दखल न घेता हर्षभरीत होतात. रागाने बेभान झालेला बापू बापावर काठीचा वार करण्यास धावतो. परंतु राधा मधेच धावत येऊन तो वार स्वतःवर घेते. आईवर कमालीची माया करणाऱ्या बापूस ही गोष्ट अतिशय लागते. अप्पा व बापू कुटुंबाची विस्कटलेली माळ पुन्हा गुंफण्यास सुरवात करतात आणि दैव जोरात असल्याने बऱ्याच प्रमाणात यशस्वीही होतात. विविध घटना वेगाने पुढे धावू लागतात. सुलूचे लग्न जमवण्याच्या प्रयत्नात असणारा बापू तिच्या प्रियकरावर स्वसंरक्षणार्थ सुऱ्याचा वार करतो. आपण खून केला आहे, अशीच त्याची समजूत होते. परंतु लौकरच सर्व गोष्टींचा खुलासा होतो. सुलूचे लग्न दृष्टिक्षेपात दिसते. बाळचे एका गर्भश्रीमंत मुलीवर – मालनवर – प्रेम असते. परंतु त्यासाठी तो घर सोडण्यास तयार नसतो. त्याच्या उज्ज्वल भवितव्याकडे लक्ष ठेवून अप्पा बाळाला या लग्नास तयार करतात. शेवटी सर्व गोष्टी बऱ्याच सुरळीत झालेल्या दिसतात. अप्पाही नोकरीवर जाण्यास निघतात. जखमी राधा त्यांची दहाची वेळ सांभाळण्यासाठी स्वयंपाकघरात जाते व अप्पा पुन्हा कुटुंबचक्रात अडकले असताना नाटक संपते.

नाटकाची बांधणी घटनाप्रधान वाटते. क्षणभर तर आपण 'मद्रासी' फॉर्म्युल्याचा हिन्दी चित्रपटच पाहत आहोत, असे प्रतीत होते. बापू आणि अप्पा या दोन्ही व्यक्तिरेखा कमालीच्या भडक आहेत. असे असूनही बापूच्या व्यक्तिरेखेची वाढ अत्यंत स्वाभाविकपणे झाली असल्याने बापू मनावर ठसा उमटवून जातो. बरोबर या उलट अप्पांची अवस्था आहे. चाळीस – बेचाळीस वर्षे संसार केलेला कविमनाचा माणूस असा एका झटक्यात जबाबदारी झटकून बाजूला होणार नाही आणि बाजूला झालाच तर इतका निश्चयाने बाहेर पडेल की आकाश कोसळले

तरी पुन्हा मागे वळून पाहणार नाही. परंतु नाटकाचा शेवट समाधानकारक करण्यासाठी लेखकाने अप्पांच्या नैसर्गिक प्रवृत्तीस अडथळे आणून स्वतःच्या मनाप्रमाणे त्यांना फिरवल्याने अप्पाची व्यक्तिरेखा मनास पटत नाही. आणि अप्पा हा तर नाटकाचा केंद्रबिंदू. परंतु हा केंद्रबिंदूच कच्चा असल्याने नाटकही परिणामकारक होत नाही. राधा व सुलू अत्यंत स्वाभाविक व तर्कशुद्ध वाटतात. बाळू प्रखर बुद्धिमान दाखवला आहे. तो धांदरट असू शकेल, परंतु काही प्रसंगी तो मूर्ख वाटावा, अशा पद्धतीचे संवाद त्याच्या तोंडी घालण्यात व त्यास त्याच पद्धतीने उभे करण्यात लेखक–दिग्दर्शकांनी काय साधले, ते समजू शकले नाही. लग्नासाठी घर सोडण्याजोगी परिस्थिती निर्माण करून बाळूच्या व्यक्तिरेखेची जी दुसरी बाजू दाखवली आहे, ती प्रभावी असली तरी बाळूच्या एकंदर वागणुकीशी न जुळणारी आहे. इन्स्पेक्टर राण्यांचा संदर्भ वेळीच स्पष्ट न झाल्याने त्यांच्या तोंडची वाक्ये कमालीची हास्यास्पद झालेली आहेत. बाळू व मालनचे प्रेमप्रकरणही कमालीच्या गलथानपणाने हाताळले आहे. बापूच्या अंतर्मनाची व्यथा सांगणारा जो स्वयंकेंद्री उतारा आहे, तो नाटकातील या प्रसंगाची जागा, या उताऱ्यातील आशय व भावना, आणि श्रीकांत मोघे यांचा प्रभावी अभिनय यामुळे परिणामकारक झालेला आहे.

## दर्जेदार प्रयोग

नाट्यप्रयोगाचे दृष्टिकोनातून पाहता मिळालेल्या यशाचा मोठा वाटा दिग्दर्शक व नट श्री. आत्माराम भेंडे (अप्पा), श्रीकांत मोघे (बापू) व उषा लिमये (राधा) यांचेकडे जातो. डॉक्टरी सल्ल्यामुळे नवऱ्यास सोळा वर्षे शरीरसुख न देऊ शकणारी, गरिबीतही आनंदी असणारी, नवऱ्यावर व मुलांवर जिवापाड प्रेम करणारी 'राधा' उषा लिमये यांनी यशस्वीपणे साकार केली आहे. राधाबाईंच्या मनःचक्षूसमोर सुलूचा नादान प्रियकर मनोहर व बापू यांची झटापट दाखवण्यात तांत्रिक सफाई तर आहेच, परंतु राधाबाई हे सर्व बघत आहेत, ही भावना प्रेक्षकांच्या मनात निर्माण झाल्याने हे दृश्य अत्यंत परिणामकारक झाले आहे. या यशाचे मोठे श्रेय दिग्दर्शक श्री. भेंडे व प्रकाश–नियोजक श्री. धूमकेतू मेहता यांच्याकडे जाते. केवळ संवाद ऐकून मनातील व्यथा सांगणारे तंत्रही परिणामकारकरीत्या वापरले आहे.

नाटक पाहत असताना आचार्य अत्रे यांच्या 'उद्याचा संसार' या नाटकाची वारंवार आठवण होते. 'प्रपंच करावा नेटका'– हे नाव नाटकास देताना नाटककाराने नाटकातील मुख्य व्यक्तिरेखेस–अप्पांना– 'प्रपंच करावा नेटका' असा आदेश दिला आहे, असे वाटते.

नाट्यप्रयोग बरीच मेहनत घेऊन बसवला आहे. सर्व तांत्रिक बाजू समाधान-

कारक आहेत. पांडुरंग कोठारे यांचे नेपथ्य अत्यंत वास्तव व नाटकास परिपोषक असे आहे. मात्र इतके असूनही, चांगल्या दर्जाचा प्रयोग पाहिल्याचे समाधान मिळाले, तरी उत्कृष्ट नाटच पाहिल्याचे समाधान मिळू शकत नाही.

–शरद गोखले

## २ : नाटक लिहावे नेटके

नाटयसमीक्षकाने नाटक लिहिण्याचा प्रयत्न करणे म्हणजे काचेच्या घरात बसून दुसऱ्यावर दगडफेक करण्याचाच प्रकार असतो. प्रत्येक नव्या नाटकावर टीकाकार या नात्याने त्याने जे सडेतोड मत मांडलेले असते, त्याच कसोटचा त्याच्या या नव्या नाटकाला लावल्या जाण्याची शक्यता निर्माण होते. टीकाकारच नव्हे तर प्रेक्षकही फार मोठ्या अपेक्षा बाळगून नाटकाचा विचार करू लागतात. एकंदरीत नाटककार बनू पाहणारा हा टीकाकार अशा वेळी फायद्यापेक्षा धोकेच अधिक पत्करीत असतो, असे म्हणायला काहीच हरकत नाही. मुंबईमधील आजचे एक मान्यवर नाटचसमीक्षक श्री. माधव कुलकर्णी यांच्या ‘ प्रपंच करावा नेटका ’ या नाटकाचे वेळी परिस्थिती काहीशी अशीच झाली होती. प्रेक्षकांनीच नव्हे, तर टीकाकारांनीही नाटकाबद्दल फार मोठ्या अपेक्षा बाळगल्या होत्या. नव्या नाटकात थोडकाही दोष सहन न करणाऱ्या माधवरावांचे हे नाटक तरी खात्रीनेच निर्दोष असणार, या वेळी तरी आपण एक उत्तम नाटक पाहिल्याचा आनंद मिळविणार, अशीच आरंभी सर्वांची समजूत होती. पण काय सांगावे ? या नाटकातही अनेकविध दोष आढळले, न पटणाऱ्या गोष्टी सापडल्या आणि नेहमीप्रमाणेच नाराजी पदरी पडली.

कौटुंबिक नाटके ही यशस्वी होण्याची फार मोठी शक्यता असल्याने बहुतेक नवे लेखक हा असाच विषय नाटकासाठी निवडण्याची कोशीस करतात. आई आणि तिचा उनाड मुलगा, ताई अन् भाऊ, किंवा अशाच तऱ्हेची नाती निर्माण करून भावनोत्कट प्रसंगांची जागोजाग पेरणी करून त्याद्वारे प्रेक्षकांच्या डोळ्यांतून अश्रू काढण्याची खटपट करू पाहतात. कुलकर्णी यांचा प्रयत्नही हा असाच !

### अवास्तव परिवर्तन

कथानकाचा मूळ विषय मोठा चांगला आहे. पण त्याची प्रभावी मांडणी करण्यात कुलकर्णी फारच कमी पडले आहेत. कथेतील व्यक्तींमध्ये होणारे आकस्मिक बदल पाहून तर प्रेक्षक चांगलाच गोंधळून जातो. चाळीस वर्षे संसार केलेले, ज्यांना तीन मुलं आहेत, त्यांची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, असे अप्पा पत्नीकडून पुरेसे सुख मिळाले नाही म्हणून तिला सांगूनसवरून नायकिणीची माडी चढतात, मद्याच्या कैफात बुडून जाऊन स्वैराचारी बनण्याचा विचार करतात. इतके ते निगरगट्ट दाखविले गेले असल्यामुळे त्यांच्या मनात शेवटी जो बदल दाखविला आहे, तो नीटसा पटत नाही. ज्याला स्वतःच्या पत्नीबद्दल यत्किंचितही प्रेम नाही, जो बायकोचा अधिक्षेप

करीत आहे, असा माणूस तिला काठीचा एक फटका बसताच, त्या माराने डोक्याला थोडीशी जखम होताच विरघळतो ! हे कसे शक्य आहे ? प्रत्यक्ष आपली मुलगी एका मवाली मुलाच्या नादानं फसली आहे, कुमारी-माता होण्याचे फार मोठं पाप जी करून बसली आहे, त्या गोष्टीचीही भयानकता ज्याला जाणवत नाही, उलट त्यात जो आनंदच मानीत आहे, असा हृदयशून्य माणूस इतक्या साध्या घटनेने बदलेल ? नाटकातील हा सर्वात महत्त्वाचा मुद्दाच अत्यंत अवास्तव, न पटणारा असा वाटतो. प्रमुख पात्राची ही अशी परवड झाली. दुय्यम पात्रांचेही असेच. एकटा एक बापू आणि त्याची आई–राधाबाई–सोडली तर अन्य पात्रांचे स्वभावदर्शन हे असेच मनात अनेक संभ्रम निर्माण करणारे, प्रसंगी त्यांनी केलेली प्रत्येक गोष्ट अवास्तव, अतिरंजित वाटावी इतके बिघडलेले आहे. मग आपोआपच मनावरील पकड सुटत जाते. नाटक साफ घसरते. लेखनदृष्टया नाटकाचा पहिला अंक जितका आकर्षक, ठसठशीत आहे, तितकेच पुढील दोनही अंक सामान्य वाटतात. वास्तविक त्यातही काही प्रसंग बऱ्यापैकी निर्माण केले आहेत, पण ते व्यवस्थित प्रभावी पद्धतीने रंगविण्यात लेखक कमी पडतो. काही प्रसंग तर परिणामी शून्य वाटतात. तिसऱ्या अंकातील अप्पांचे स्वगत नाटकातील एक फार महत्त्वाचा भाग–याचेच उदाहरण घ्या ! प्रभावी भाषा आणि सुव्यवस्थित रचना याअभावी हे स्वगत निष्प्रभ ठरते. अप्पांच्या मनाची उलघाल, त्यांच्या स्वभावात होणारा आकस्मिक बदल यांचे न पटणारे का होईना, पण कारण देण्याचा प्रयत्न त्यात केला आहे. पण अप्पा काही महत्त्वाचे बोलले हेच जाणवत नाही. (हा दोष नटाचा तर आहेच, पण लेखकही तितकाच जबाबदार वाटतो.) नाटकाचा गाभा कच्चा असल्याने पुढील इमारतही गडगडली आहे. एकंदरीत नाटकाचा विषय चांगला असून, क्वचित प्रसंगी चमकदार संवाद लिहूनही हेच सातत्य शेवटपर्यंत न टिकल्याने आणि मुख्य म्हणजे भडक, अवास्तव गोष्टी घालून प्रेक्षकांना जिंकून घेण्याचा प्रयत्न केल्याने थोडे गुणही मातीमोल ठरले आहेत.

जाता जाता एक गोष्ट मुद्दाम सांगितली पाहिजे. नाटकाचे लेखक माधव कुलकर्णी म्हणजे रविवार केसरीतून " चौपाटीवरून " या सदरात नाट्यसमीक्षणे लिहिणारे माधव ! आजवर या सदरातून त्यांनी अनेक नाटकांचा खरपूस समाचार तर घेतला आहेच, पण चांगल्या अगर थोड्या फार बऱ्या म्हणाव्या अशा नाटकातील थोडके दोषही मुद्दाम स्पष्ट करण्याचा अभिनंदनीय उपक्रम केला आहे, त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच. फार काय, या त्यांच्या स्पष्टवक्तेपणानेच त्यांच्याबद्दल आदर वाटतो. पण माधवरावांच्या या नाटकातील दोष तरी किती सांगावे ? फार काय दोषच अधिक, गुण कमी, अशी स्थिती झाली आहे. आता यांना बोलावे कुणी ? निदान 'रविवार केसरी'तून आपल्या नाटकाबद्दल लिहिताना तरी त्यांच्यातील तो निःस्पृह टीकाकार जागा होईल, अशी आशा होती. पूर्वीप्रमाणेच

बारीक नजरेने ते आत्मकृतीचे परीक्षण करतील, असे वाटले होते. त्या परीक्षणात माधवरावांनी आपली स्वतःची अशी स्तुती केली आहे की काही विचारू नका ! त्यांना आपल्या या नाटकात दोष तर दिसत नाहीतच, उलट सर्व गोष्टी अपूर्व क्रांतिकारी विलक्षण योग्यतेच्या वाटतात. फार काय, रंगभूमीवर फारा वर्षांत इतके प्रभावी नाटक आले नव्हते असेच जणू त्यांना सुचवायचे आहे.

**श्रीकांत मोघे व उषा लिमये**

लेखनातील दोष अभिनयसामर्थ्याने लपावेत, असाही प्रकार आढळत नाही. श्रीकान्त मोघे (बापू) आणि उषा लिमये हे दोघे कलाकार सोडले तर अन्य कलाकारांचे अस्तित्व जरादेखील जाणवले नाही, ही आपत्ती आत्माराम भेंडे यांच्यासारख्या मातबर कलाकारावर यावी, हे दुर्दैव. अर्थात यासाठी कलाकार जितका जबाबदार तितकाच काही प्रमाणात लेखकही जबाबदार ठरतो. गणेश सोळंकीसारखा उत्तम कलाकार, पण अपुऱ्या व्यक्तिचित्रणामुळे पार नामशेष झाला. पहिल्या अंकात त्याच्या तोंडी असलेले गणिती संवाद छान आहेत, पण पुढे त्यात सातत्य राहिले नाही. साहजिकच आरंभी थोडे फार लक्षात राहत जाणारा बाळू पुढे दोन्ही अंकांत ध्यानातही येत नाही. मनोहरच्या बाबतीत (धनंजय भावे) हाच प्रकार. कलाकार चांगले असून कमतरता येते. पण काही प्रसंगी दुसरीही गोष्ट घडते. मोठ्या कलाकाराचे—आत्माराम भेंडे यांचे—नाव वाचून दर्जेदार अभिनयाबद्दल आरंभी खात्री असते, पण थोड्याच काळात प्रेक्षक निराश बनतो. अप्पाची भूमिका पुरेशा बारकाव्याने वठविण्यात भेंडे निष्प्रभ ठरले आहेत. वास्तविक त्यांना पुरेसा वाव होता, पण त्यात जिवंतपणा आला नाही, ही गोष्ट महत्त्वाची ! साऱ्या गोष्टी कशा कृत्रिम, बेगडी वाटल्या. संवाद अत्यंत कोरडेपणाने म्हटले, त्यात भावनाविष्करण ही गोष्टच कुठे दिसत नाही. अन्य कलाकारांत ललिता देसाई (मालन), यशवंत पालवणकर (रावसाहेब) हे कलाकार ठीक होते. त्यांच्या ताकदीप्रमाणे त्यांनी पुरेपूर प्रयत्न केले. सर्वांत उठून दिसलेले कलाकार दोनच-


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

शर्मा स्वीट मार्ट

दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.



गणेश सोळंकी
उषा लिमये

श्रीकान्त मोघे आणि उषा लिमये ! मोघे यांनी बेबंद, बेछूट, पण तितकाच कोमल अंत:करणाचा बापू मोठ्या कौशल्याने उभा केला. कामातील सहजता आणि प्रत्येक भावना अधिकाधिक बारकाव्याने व्यक्त करण्याची त्यांची धडपड फार कौतुकास्पद ! उषा लिमये यांच्या कामातही असेच दिसले. मन मारून जगणारी, पतीवर, मुलांवर अतोनात प्रेम असणारी राधाबाई त्यांनी मोठ्या सफाईने उभी केली.

## दिग्दर्शनातील शंका

नाटकाच्या दिग्दर्शनातही काही उल्लेखनीय गोष्टी आढळल्या नाहीत. उलट काही थोड्या शंकाच आहेत. बापू आपल्या बापावर–अप्पांवर काठीचा घाव घालण्यासाठी धावतो, तो घाव राधाबाई स्वत:वर झेलते, जखमी होते. मोठा नाट्यपूर्ण प्रसंग; एकदम मान्य ! पण ही काठी आईच्या डोक्यावर बसण्याऐवजी जमिनीवर आपटते आणि तरीही डोके मात्र फुटते. हा एक अजबच प्रकार म्हटला पाहिजे. दिग्दर्शकाने ही महत्त्वाची गोष्ट तरी अधिक कल्पकतेने दाखवायला नको होती का ? दुसरी शंका ही अशीच ! राधाबाई जखमी स्थितीत अंथरुणात पडून आहेत. तेव्हा मनोहर आणि बापूची झालेली झटापट त्यांना डोळ्यापुढे जशीच्या तशी दिसू लागते. हे कल्पनेतील दृश्य म्हणावे तर खरोखरच तसे घडलेले आहे आणि सत्य म्हणावे तर जे नजरेपुढे घडत नाही. असे दृश्य समोर दृग्गोच्चर व्हावे म्हणून संजयासारखी दिव्यदृष्टीही राधाबाईंना प्राप्त झालेली नाही. मग या दृश्याची सुसंगतता कशी लावावी ? वास्तविक कल्पना चांगली, पण जे काही दाखवायचे ते दिग्दर्शकाला नीट दाखविता आले नाही, हा मुद्दा महत्त्वाचा !

पांडुरंग कोठारे यांचा सेट मोठा वास्तव आणि नेटका वाटला.

– सुधीर दामले




## या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळणाऱ्या भगिनींना

स्त्री जीवनांत अत्यंत जरूरीच्या वेळीं विश्रांती घेतां येत नाहीं. परिणामीं त्यांच्या नेहमींच्या तक्रारी वाढतात, बाळंतपणानंतर तर जीव नकोसा करणारी अशक्तता, ओटीपोटदुखी,, बेचैनी आणणारी पाठ व कंबरदुखी वगैरे तक्रारी विशेष त्रास देतात. मिसेस आनंदीबाई देसाई यांच्या अबलामृत गोळ्या असल्या तक्रारींवर चांगल्या उपयोगी पडतात. मध्यम वयानंतर एकंदर आंतर स्त्री इंद्रियांची शक्तीच कमी झाल्यामुळें उद्‌भवणाऱ्या बऱ्याच तक्रारींवर अबलामृत गोळ्या चांगल्या गुणकारी ठरल्या आहेत. वर्षांतून १/२ वेळां अबलामृताच्या सहा बाटल्या घेतल्यास फार श्रमामुळें येणारा शारीरिक व मानसिक थकवा लवकर दूर होतो. **कुमारीजीवनापासून कौटुंबिक जीवनाच्या सर्व महत्त्वाच्या काळांत**




मिसेस आनंदीबाई देसाई यांच्या

# अबलामृत गोळ्या

आपणांला निरोगी, आनंदी, सुखी व सफल स्त्रीजीवनाचा लाभ करून देतात.

**पर्ले आणि कंपनी मुंबई २७.**

STUSA 8/65

# भिंतीच्या तुकड्या

सुधाकर राजे

## • अशास्त्रीय खून

आजच्या सुधारलेल्या जगात माणसाचे जीवन विज्ञानावर अवलंबून आहे, यात शंका नाही. पण त्याचे मरणही, विज्ञानावर अवलंबून आहे, याचा साक्षात्कार परवा अस्मादिकांना एका लहानशा बातमीने घडवला. एका अमेरिकन बाईने म्हणे आपल्या नवऱ्याला विजेचा धक्का देऊन मारण्याचा प्रयत्न केला. पतिराज गाढ झोपेत असताना या त्याच्या प्रिय पत्नीने त्यांच्या गळयाभोवती विजेची तार बांधून तारेचे एक टोक विजेच्या बटनात खुपसले. झाले काय ? काहीच नाही. कारण बाई ते सर्कीट ' अर्थ ' करायला विसरल्याने धक्का बसला नाही. बरोबर आहे, आजच्या शास्त्रीय युगात असा अशास्त्रीय खून कसा यशस्वी होणार ? खरे म्हणजे बायकोने नवऱ्याचा जीव घ्यायचा तो बोलून बोलून, अशी पूर्वापार रीत आहे; पण आधुनिक पायंडा पाडू पाहणाऱ्या या बाईने निदान परीक्षेच्या आधी विद्युतशास्त्राची थोडीशी उजळणी तरी करायला नको होती का ?

हिंदुस्थानातल्या बायका सुदैवाने इतक्या विज्ञानाच्या आहारी गेलेल्या नाहीत. त्यामुळे त्यांचा नवऱ्याला लंबे करण्याचा प्रयत्न असा फुकट जाण्याची भीती नाही. हिंदुस्थानातल्या पुरुषांनी शस्त्र बाळगू नये, असा नियम असला तरी हिंदुस्थानातल्या बायकांनी लाटणे बाळगू नये असा नियम करणे शक्य नाही. त्यामुळे कुठल्याही नवऱ्याला कपाळमोक्षाच्या मागे मोक्ष मिळविण्याची सोय आहे.

प्रश्न एवढाच की, आजच्या आपल्या स्त्रीराज्यात भारतीय स्त्रियांना लाटण्याचा हा दुय्यम उपयोग नामुष्कीचा तर नाही वाटणार ? नाही तर त्या पण फॅशनेबल खुनाच्या मागे धावायच्या. निदान माझे तरी अखिल–भारतीय पददलित नवरा-समाजाचा एक पामर प्रतिनिधी या नात्याने त्यांना कळकळीचे सांगणे आहे, की बायांनो, नवऱ्याला खलास करण्याच्या किरकोळ कामीदेखील भारतीय बाणा सोडू नका. लाटण्यात जी देशभक्ती आहे, ती विजेच्या तारेत येणे शक्य आहे काय? शिवाय निदान राजधानी दिल्लीचा तरी अनुभव असा, की 'पॉवर फेल्युअर' ही नित्याची गोष्ट. तेव्हा येथल्या एखाद्या आर्य स्त्रीने अगदी पुस्तकात लिहिल्या-प्रमाणे जय्यत तयारी केली तरी ऐन वेळी तारेत वीज नसल्याने नवरा आपला

शिल्लकच राहायचा. हा असा काही आधुनिक घोटाळा होऊ नये म्हणून आपले देशी तंत्रच बरे. फार तर "नवऱ्याचा निकाल लावण्याच्या भारतीय पद्धती" या विषयावर एखाद्या जाणकार श्रीमतीकडून संशोधनात्मक प्रबंध लिहून घेऊन त्यात अश्रुसमुद्रात बुडवून मारणे, नयन–बाणांनी विद्ध करून प्राण घेणे, असल्या प्राचीन पद्धती व लाटण्याने टाळके शेकणे असले मध्ययुगीन मार्ग, यांच्या जोडीला आधुनिक पण भारताला भूषणावह असे मार्ग सुचविण्यात यावेत.

## • सरकारी सौंदर्य

रशियात एक सरकारी सौंदर्य–प्रसाधन संस्था स्थापन होणार आहे. अहो आश्चर्यम्! आता लाल रशियात लाल तत्त्वज्ञानाइतकेच लाल ओठांना महत्त्व येणार आणि अमेरिकेला मुरडून मुरडून वाकडे झालेले नाक सरकारी सहाय्याने सरळ होणार. पण साम्यवादी सोव्हिएट सरकारला झालेला हा सौंदर्याचा साक्षात्कार विरोधविकासवादाशी कितपत जुळता आहे, हे एक केस पिंजारलेला मार्क्सच जाणे. दुसरे म्हणजे या सरकारी सौंदर्याची व्याख्या काय? संस्कृत वाङ्मयात स्त्रीच्या प्रत्येक अंगोपांगाचे रसिक वर्णन करताना चांदताऱ्यापासून केळींच्या खांबापर्यंत सगळ्या गोष्टींना राबविण्यात आले आहे. (–हे सगळे अवयव वर्णनाबरहुकूम एकत्र आणले तर तयार होणारी स्त्री भयानक दिसेल, ही गोष्ट वेगळी!) पण आधुनिक रशियातल्या लोककवींनी सरकारसाठी अशी सोय करून ठेवल्याचे ऐकिवात नाही.

शिवाय मूळ मुद्दा असा, की साम्यवादाला सौंदर्याची गरज आहे काय? पुरुषाला मोहित करून त्याला आपल्या प्रेमात पाडण्यासाठी स्त्री आपल्या सौंदर्याचा उपयोग करते, असा सर्वसाधारण माणसाचा सिद्धान्त आहे. पण माणूस आणि साम्यवादी यातला फरक आहे तो इथेच. एखादा भाई जेव्हा एखाद्या ताईवर भाळतो, तेव्हा ते प्रेम आपापल्या गिरणीतल्या उत्पादनाचा लक्ष्यांक कोणी कितीपट ओलांडला आहे, असल्या नाजुक गोष्टीवर आधारलेले असते. अर्थात ते प्रेम कामगारांच्या सर्वाधिकारित्वाइतके निःसीम आणि स्त्रीकलहाइतके शाश्वत असते, हे ओघानेच आले. तेव्हा त्याला चाफेकळीसारखे नाक किंवा गुलाबी ओठ असल्या मांडवलशाही गोष्टींची काय गरज?

• • •

# ज्ञा न वि ज्ञा न

## □ भारतास मित्र कमी का ?

### परोपदेशे पांडित्य नडते

पंधरा वर्षापूर्वीचा एक प्रसंग. पंडित नेहरूंच्या जकार्ताच्या भेटीनंतर त्यांच्या बरोबरचे हिंदी अधिकारी तुम्हाला कसे काय वाटले, असा प्रश्न समाजशास्त्रज्ञ लेस्ली पामियर यांनी विचारला, तेव्हा तेथील अधिकाऱ्यांनी उत्तर दिले, " फार आढ्यतेखोर, अगदी ब्रिटिशांसारखे. " त्यानंतर बारा वर्षांनी बँकॉकमध्ये असाच अनुभव पामियर यांना आला. " यापुढचा व्यवहार आमच्या स्टाफवरील एक आशियाई अधिकारी पाहील, " असे त्यांनी सांगताच थाय अधिकारी काहीशा साशंक मुद्रेने त्यांना म्हणाला, " आशियाई म्हणजे कोण, हिंदी ? " पामियर यांनी 'नाही' असे सांगताच समाधानाचा सुस्कारा टाकून तो म्हणाला, " मग हरकत नाही, माझ्याकडे कोणाही भारतीयास पाठवू नका. ते नुसते येथे येतात आणि आम्ही काय करावे याचा उपदेश करतात. आढ्यतेखोर लोकांची ती जात आहे. "

हिंदी लोकांच्या वागणुकीसंबंधी असा समज बऱ्याच राष्ट्रांत आढळतो. त्यामुळेच जगात हिंदला मित्र कमी आहेत असे पामियर यांनी 'न्यू सोसायटी' साप्ताहिकातील एका लेखात म्हटले आहे. " नेहरूंइतका आढ्यतेखोर माणूस मला दुसरा भेटलेला नाही, " असे चौ एन् लाय यांनी म्हटले होते. त्याचाही उल्लेख या लेखात आहे.

दुसऱ्याच्या चुका दाखविण्यात हिंदी लोक मागेपुढे पाहत नाहीत. त्यामागे हेतू चांगला असतो, पण त्याचबरोबर ते दुसऱ्याच्या म्हणण्याकडे लक्ष देताना दिसत नाहीत असा अनुभव जेव्हा परदेशी नागरिकांना येतो, तेव्हा भारतीयांची वृत्ती केवळ दुसऱ्याच्या चुका दाखविण्याची आहे, परोपदेशे पांडित्याची आहे, असा त्यांचा समज झाला तर त्यात काय चूक आहे ? 'बोले तेसा चाले, त्यांची वंदावी पाउले' हे संतवचन संतांपुरतेच राहिले. माणसाचे 'बोलणे आणि कृती यांत काही मेळ असावयास हवा, याची जाणीव राजकीय नेत्यांमध्ये आढळत नाही. माणसाचे बोलणे हे त्याच्या मतांचे निदर्शक आहे; त्याप्रमाणे त्याने वागलेच पाहिजे असे नाही, अशी हिंदी लोकांची समजूत असल्याचे पामियर यांना दिसून आले. दुसऱ्यांना आम्ही उपदेश करतो, चुका दाखवितो, प ण आपल्या लोकांच्याच अडचणी, गरजा जाणण्याची

त्या दूर करण्याची वृत्ती दिसत नाही. रस्त्यावर कुणी भुकेने पडला असेल तर बाकीचे निघून जातील. अपघात झाल्यावर बघे जमतील, पण मदत करायला नात-लगांशिवाय कोणी पुढे येणार नाही, असे पामियर यांनी म्हटले आहे.

हिंदी लोकांची वृत्ती अशी का बनली याची आपल्या दृष्टीने मीमांसा पामियर यांनी केली आहे. या वृत्तीचे मूळ त्यांना एकत्र कुटुंबपद्धतीत आढळते. एकत्र कुटुंब-पद्धतीत कुटुंबप्रमुख हाच मुख्य. त्याचा शब्द सर्वांनी मानला पाहिजे. लहानपणा-पासून मुले आईबापांच्या, विशेषतः वडिलांच्या धाकात वाढलेली असतात. वडिलांच्या नंतर सर्वांत मोठ्या मुलाकडे त्यांचे अधिकार येतात व तोही तसाच वागू लागतो, असे पामियर यांचे म्हणणे आहे; पण ते पटणारे नाही. कारण भारतात एकत्र कुटुंबपद्धती आता जवळजवळ मोडकळीस आलेली असून, पाश्चात्त्यांप्रमाणे विभक्त कुटुंबपद्धती बऱ्याच प्रमाणात रूढ झाली आहे.

ब्रिटनची सत्ता गेली तरी ब्रिटिशांचा प्रभाव अजून हिंदवर आहे. भारतातील बुद्धिवादी वर्ग अजूनही मुख्यतः ब्रिटिश ग्रंथांवरच विसंबून असतो. इंग्लंडमध्ये आपल्याविषयी चांगले मत असावे, अशी त्यांची धडपड असते, ही पामियर यांची टीका मात्र बरोबर आहे.

## □ भारतीय केसांना मागणी

लांबनडक केस हे आपल्याकडे प्राचीन काळापासून स्त्री-सौंदर्याचे एक भूषण मानले गेले आहे, पण तुमच्या सौंदर्याच्या कल्पना काहीही असोत, लांब केसांना जगाच्या बाजारात आज चांगली मागणी असून कमाईही मोठी होते. आठ इंच लांबीचे एक टन केस विकून तीस हजार रुपये मिळतात. यापेक्षा लांब केस असतील तर साठ हजार रुपयांपर्यंत कमाई होते. स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने आता या व्यवसायात पडायचे ठरविले असून, केसांच्या खरेदीची देशव्यापी मोहीम सुरू केली आहे. या केसांचे टोप तयार करण्याचा कारखाना मद्रास राज्यात अंबत्तूर येथे एका अमेरिकन कंपनीच्या सहकार्याने निघणार आहे. वर्षअखेर तो पुरा होईल. पाच एकरांची जागा त्यासाठी निवडली आहे. या कारखान्यास तेरा लाख रुपये खर्च येईल. त्यांपैकी एक लाख रुपये परदेशी चलन असेल. एक हजार कामगारांना त्यात काम मिळेल व यांत बहुतेक स्त्रिया असतील. कारखान्यास सुरवातीला दोनशे टन केस लागतील. निरनिराळ्या १२७ रंगछटांचे टोप तेथे तयार होतील.

केसांचा व्यापार आतापर्यंत व्यक्तिगत पातळीवर चाले. गेल्या वर्षी २८ लाख रुपयांच्या केसांची निर्यात झाली. तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी हा व्यापार मोठ्या प्रमा-णात चालतो. भारतीय केसांपासून बनविलेल्या टोपांना जपान, युरोप आणि अमे-रिकेत मोठी मागणी आहे. युरोप व अमेरिकेत अशा टोपांना एवढी मोठी टंचाई

आहे, की त्यांची विक्री करणाऱ्या दुकानापुढे मोठ्या रांगा लागतात. जगात मकुट वापरणाऱ्या वीस लाख स्त्रिया असाव्यात, असा अंदाज आहे. अशा टोपांच्या निर्यातीपासून तीन कोट रुपये मिळतील, असा स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांचा अंदाज आहे.

## □ वार्धक्य व स्मरणशक्ती

म्हातारपणात माणसाची स्मरणशक्ती कमी होते, हे सर्वसाधारणपणे खरे आहे, पण स्मरणशक्ती कमी होते, म्हणजे नेमके काय होते ? स्मृतिमंजूषेत ज्ञान साठविलेच जात नाही, की ज्ञानग्रहण होते पण ते आठवत नाही ? आल्बर्टा विद्यापीठाचे प्रा. डी. शोन फील्ड यांनी नुकताच यासंबंधी एक प्रयोग करून त्याचे निष्कर्ष जाहीर केले आहेत. त्यावरून असे दिसते; वृद्ध लोकांना स्मृतिमंजूषेत ज्ञान किंवा माहिती साठविण्यात कोणतीही विशेष अडचण येत नाही; पण ही माहिती त्यांना सहज आठवत मात्र नाही. प्रा. शोन फील्ड यांनी १३४ लोकांवर हा प्रयोग केला. वीसपासून साठपर्यंत निरनिराळ्या वयाची माणसे त्यांत होती. त्यांना प्रथम चोवीस शब्दांची व नंतर आणखी चोवीस शब्दांची मालिका पडद्यावर दाखवून लक्षात ठेवण्यास सांगितले. प्रत्येक शब्द पडद्यावर चार सेकंद दाखविण्यात आला. दोन्ही मालिकांमधील किती शब्द लक्षात राहिले, याची चाचणी दोन वेगळ्या पद्धतींनी घेण्यात आली. पहिल्या मालिकेतील जेवढे आठवतील तेवढे शब्द लिहा, असे या लोकांना सांगितले. दुसऱ्या मालिकेतील शब्दांच्या चाचणीसाठी मात्र निराळी पद्धत अवलंबली. चार चार शब्दांचे गट पडद्यावर दाखवून त्यातून मालिकेतील शब्द ओळखण्यास सांगितले. दोन्ही पद्धतीनुसार मिळालेल्या उत्तरात फरक आढळला. दुसऱ्या पद्धतीने घेतलेल्या चाचणीत लोकांनी सरासरी १९·४८ ते २०·०९ शब्द ओळखले. तरुण आणि वृद्ध यांच्या उत्तरांत वयानुसार फारशी तफावत आढळली नाही, पण पहिल्या पद्धतीच्या चाचणीत मात्र ही तफावत जाणवली. वाढत्या वयाबरोबर शब्द आठवण्याची शक्ती म्हणजेच स्मरणशक्ती कमी झाल्याचे दिसले. वीस ते एकोणतीस वयाच्या गटातील तरुणांना १३·७८ शब्द आठवले, तर साठी ओलांडलेल्या वृद्धांना २४ पैकी फक्त ७·५ शब्द आठवले. याचा अर्थ म्हातारपणी ग्रहणशक्ती कमी होतेच असे नाही, पण ग्रहण केलेले ज्ञान किंवा माहिती पुन: आठवण्याची शक्ती मात्र कमी होत जाते.

## □ बुद्धिमत्ता आणि जन्मकाळ

तुमचा जन्म उन्हाळ्यात झालेला आहे का ? मग तुम्ही सर्वसामान्य माणसापेक्षा सर्वसाधारणपणे अधिक बुद्धिमान आहात. हे काही एखाद्या ज्योतिषाने कुंडली

मांडून वर्तवलेले भविष्य नव्हे, तर एका शास्त्रज्ञाने शास्त्रीय दृष्टीने पाहणी करून काढलेला निष्कर्ष आहे. बुद्धिमत्तेच्या बाबतीत सर्वसामान्य माणसापेक्षा खालच्या पातळीची आणि अत्यंत तल्लख बुद्धीची, अशा दोन्ही टोकांच्या माणसांची पाहणी शेफील्डच्या मिडलवुड हॉस्पिटलचे श्री. जे. ई. ओर्म यांनी केली. यात कमी बुद्धीची २७९ आणि तल्लख बुद्धीची २०९ माणसे होती. पंधरापासून पासष्टपर्यंत निरनिराळ्या वयाच्या व्यक्तींचा समावेश या पाहणीत केला होता. हिवाळा आणि वसंतऋतूत जन्मलेले लोक कमी बुद्धीचे आणि उन्हाळा व शरदऋतूत जन्मलेले तल्लख बुद्धीचे असल्याचे आढळून आले. तल्लख बुद्धीच्या लोकांपैकी ३५ टक्के उन्हाळ्यात व ३३ टक्के शरदऋतूत जन्मले असल्याचे दिसून आले. जन्मापूर्वीच्या वेळचा विशिष्ट ऋतू आणि बुद्धिमत्ता यांचा याप्रमाणे संबंध दिसत असला तरी माणसाच्या बुद्धिमत्तेचे काही तेवढेच कारण नाही. अनेक कारणांपैकी ते एक आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. तसेच विशिष्ट हवामानाचा परिणाम माणसाच्या जन्मकाळी त्याच्या बुद्धिमत्तेवर विशिष्ट प्रकारेच का आणि कसा होतो, त्या प्रक्रियेचा उलगडा शास्त्रज्ञांना अजून झालेला नाही.

## □ परदेशी तज्ज्ञ

आजकालच्या वृत्तपत्रांमध्ये बारकाईने पाहिले तर एका विशिष्ट प्रमाणाच्या बातम्यांमुळे फार मनोरंजन होते. ब्रिटिश लायब्ररी-तज्ज्ञ पॉल सिंकर म्हणतात की, भारतीयांची वाचनाची आवड वाढते आहे. अमेरिकन तज्ज्ञ किंग्जले मार्टिन म्हणतात, संततिनियमनाची भारताला अत्यंत गरज आहे. जपानी तज्ज्ञ म्हणतात, भारताने सघन शेतीकडे ( इंटेन्सिव्ह ॲग्रिकल्चर ) लक्ष दिल्यावाचून तरणोपाय नाही. जर्मन उद्योगपती म्हणतात, भारताचे ' इन्व्हेस्टमेंट क्लायमेट ' सुधारले पाहिजे . . . इ. इ.

आता या गलबल्यात भारतीय तज्ज्ञ कुठे जातात; काही कळत नाही. किंग्जले मार्टिन आम्हाला सांगेपर्यंत संततिनियमन म्हणजे काय, हेही आम्हाला माहीत नव्हते, किंवा पॉल सिंकरने सांगेपर्यंत आपण खरोखरच आता जरा अधिक वाचू लागलो, याची जाणीवही नव्हती, असाही भास होऊ लागतो. आणि हे सारे परदेशी तज्ज्ञ भारतात येऊन भारताविषयीची आपली अनेक मते उदारपणे सांगून टाकण्यास फारसे काकू करतात, असाही आरोप त्यांच्यावर करता येणार नाही. पण त्यांनी सांगेपर्यंत खरोखरच या गोष्टी आपल्याला माहीत नव्हत्या, की त्या सांगायला परदेशी तज्ज्ञच पाहिजेत ? भारतीय चालत नाहीत ?

● ● ●



# इये मराठीचिये नगरी

## रंगीत–

## आणि तरीही रंगत कमीच

उंचावलेल्या अपेक्षांचे ओझे घेऊन आलेला 'इये मराठीचिये नगरी' हा बोलपट नुकताच पुण्या–मुंबईत प्रदर्शित झाला. चित्ररसिकांच्या अपेक्षा उंचाविण्याची कारणेही अनेक. एक तर व्ही. शांताराम यांच्यासारखा मुरब्बी चित्रपटनिर्माता पंधरा वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर मराठी चित्रपटसृष्टीकडे वळलेला. त्यातून हा पहिलाच रंगीत मराठी बोलपट. शिवाय या बोलपटाला वसंत कानेटकरांसारख्या सिद्धहस्त नाटककाराची प्रतिभा लाभलेली. अभिनयाची बाजू सांभाळण्यासाठी केशवराव दाते आणि बाबुराव पेंढारकर यांच्यासारखे जुने आणि जाणते अभिनेते, संध्यासारखी नृत्यनिपुण अन् मेहेनती अभिनेत्री, प्रभाकर पणशीकर आणि गणेश सोळंकी यांच्यासारखे रंगभूमीवर लोकप्रिय ठरलेले व कुमार दिघेसारखा नवोदित नट, असे विविध पातळीवरचे कलावंत एकत्र आलेले. रसिकांच्या अपेक्षा उंचाव्यात असेच हे मिश्रण होते, परंतु –

परंतु अपेक्षा या अपेक्षा राहाव्यात, त्यांची पूर्तता होऊ नये असेच या बोलपटाला स्वरूप आलेले आहे. आणि त्याचे कारण अगदी सोपे आणि साधे आहे. सुमार चित्रकथा आणि तीही नजरबंदीवर विशेष भर देणाऱ्या चित्रतंत्राने गुदमरलेली.

**कथा**

बोलपटाच्या प्रारंभी व्ही. शांताराम पडद्यावर येतात आणि प्रेक्षकांना सांगू लागतात– "मराठी मातीच्या आणि मराठी मनाच्या स्वभाववैशिष्टयांचे दर्शन घडविणारी कथा आता आपल्याला पाहावयास मिळणार आहे." तेथून आपल्याला कॅमेरा घेऊन जातो तो एका लहानशा गावातल्या जुन्यापुराण्या देवळात. तेथे



## मेहनत ...; !

औदुंबरबुवा पैठणकरांचे कीर्तन चाललेले असते. कीर्तनातली गाणी औदुबरबुवांची मुलगी जाई म्हणत असते. कृष्णासाठी आपल्या भरजरी पैठणीची चिंधी फाडणाऱ्या द्रौपदीचे बुवांनी आख्यान लावलेले असते. कीर्तन संपते आणि बुवा, जाई आणि तिचा धाकटा भाऊ रंगा घराकडे जाऊ लागतात. रंगाला ठेच लागते आणि त्याच्या बोटाला बांधण्यासाठी जाई आपल्या परकराची चिंधी फाडते (मराठी मनाचे पहिले दर्शन). बुवांचा गरिबीचा संसार करणारी जाईची आई मात्र परकर फाडल्यामुळे जाईवर भडकते (मराठी मनाचे दुसरे दर्शन). घरच्या गरिबीमुळे शाळा सोडण्याची जाईवर पाळी येते आणि ती कीर्तनकार होण्याचे ठरविते.

कीर्तनकार जाईचे शारीरिक सौंदर्य बाळासाहेब नावाच्या एका नाटक कंपनीच्या मालकाच्या नजरेत भरते आणि आपली नवी शिकार जाळ्यात पकडण्यासाठी त्याच्या कारवाया सुरू होतात. (हेही मराठी मन ?) वडिलांचा कोसळणारा संसार सावरण्यासाठी जाई बाळासाहेबांच्या नाटक कंपनीत दाखल होते. (हे तर नक्कीच मराठी मन !) बाबासाहेबांच्या अंतस्थ हेतूची जाईला कल्पना देण्याची कामगिरी त्या कंपनीतला देवदत्त नावाचा नोकर बजावतो. परंतु त्याचे बोलणे समजावून घेण्याऐवजी जाई त्यालाच दुरुत्तर करते.

परंतु बाळासाहेबांचे चंगीभंगी स्वरूप ताईच्या लवकरच लक्षात येते. त्यांच्या नाटककंपनीतून ती बाहेर पडते पण बाहेर पडून काय करायचे, हे प्रश्नचिन्ह उभे असतेच. पुन्हा एकदा देवदत्त तिच्या मदतीला येतो. त्याच्या मदतीने ती नवी नाटकसंस्था उभारते आणि 'शुभ्र कमळ ऊर्फ झाशीची राणी' हे नाटक सादर करते.

हे नाटक होऊ नये म्हणून बाळासाहेबांनी केलेले सर्व प्रयत्न वाया जातात. प्रेक्षक नाटकाशी इतके समरस होतात, की नाटकातले काही संवाद तेच म्हणू लागतात काही जण तर नाटकातच भाग घेऊ लागतात.

आणि शेवटी– ? हे यश मिळवून देणाऱ्या देवदत्ताशी जाई विवाहबद्ध होते.

## एकसुरी व्यक्ती

एकाच पातळीवरून सरपटत जाणारी ही अशी चित्रकथा. कोठेच चढउतार नाहीत. मानवी मनातील काव्य आणि मानवी जीवनातील नाटय यांचा शोधूनदेखील आढळ होत नाही. शिवाय सर्वच व्यक्तिरेखा एकसुरी. सज्जन तो सदैव सज्जन आणि दुर्जन तो नेहमीच दुर्जन असा अगदी साधासुधा हिशेब आहे. बाळासाहेबांचे प्रेक्षकांना पहिले दर्शन होते; तेव्हाच त्यांच्या पोषाखावरून व बोलण्यावरून तो खलवृत्तीचा माणूस आहे हे सहज उमगते. खरे म्हणजे खलनायक वाटायला हवा, दिसायला नको. तीच गोष्ट जाईची. तिच्यासारख्या ध्येयप्रवण व्यक्तीने एखाद्या तरी प्रसंगात, आकाशात भरारी घेऊन आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या उंचीचा प्रत्यय आणून द्यावयास हवा होता. परंतु येथे तसे काहीच घडत नाही. जाईदेखील खुजी वाटते. मग तिच्याभोवती घुटमळणाऱ्या इतर व्यक्तिरेखा सपक वाटल्या तर त्यात नवल नाही. कथेचा प्रवाह इतका संथ आणि सरळ, की ही कथा पुढे कोणत्या वाटेने जाणार, हे तिच्या उगमापासूनच कळू लागते.

बोलपटातील विनोदाचे स्वरूपही असेच बाष्कळ आहे. बाळासाहेबांचा मॅनेजर पंडितराव रेखाटताना दिग्दर्शकापुढे सुंदर किंवा मजनू हा हिंदी नट,आणि त्याच्या बेवकुफ हालचाली डोळ्यांपुढे आहेत, हे कळावयास वेळ लागत नाही. पंडितरावाच्या विदुषकी वेषात आणि हालचालीत या बोलपटाचा सारा विनोद सामावलेला आहे. हीच गोष्ट बाळासाहेबांकडे 'तुझ्या बायकोचा सख्याहरी' हा फार्स घेऊन आलेल्या लेखकाची. थिल्लर नाटके लिहिणारा लेखक वागतोही थिल्लर, असाच दिग्दर्शकाचा समज असावा. फार्स-लेखकाच्या भूमिकेत राजा पंडित या नटाला किळसवाणे नृत्य करावयास लावले आहे.

## 'मराठी 'पण कोणते ?

वस्तुत: या कथेला खास 'मराठीपण' असे काही नाही. यामधील कुठलीही व्यक्तिरेखा वा स्वभावदर्शन कोणत्याही प्रांतात वा देशात आढळू शकेल. परंतु प्रारंभीची घोषणा प्रेक्षकांच्या मनावर बिंबविण्यासाठी प्रत्येक प्रसंगाच्या शेवटी 'हे बघा मराठी मन, हा पाहा मराठी मातीचा स्वभाव,' असल्या वाक्यांची खैरात करण्यात आली आहे. मला वाटते, लेखकाचा आणि दिग्दर्शकाचा सर्वांत मोठा पराभव आहे तो येथे. आपण मुद्दाम सांगितल्याशिवाय प्रेक्षकांना जाणवणारच नाही, असेच त्यांना सतत वाटत असावे.

शिवाय पूरक प्रश्न असा आहे, की यातील कोणती व्यक्तिरेखा मराठी मनाची आणि मातीची प्रतीक मानावयाची ? जाई ? बाळासाहेब ? देवदत्त ? औदुंबरबुवा ? आपल्या वडिलांचा संसार सांभाळण्यासाठी कष्टांचे डोंगर उपसणारी तरुणी फक्त नागपूरपासून बेळगावपर्यंतच जन्माला येते काय ? का महाराष्ट्रातल्या नाटक कंपन्यांचा प्रत्येक मालक म्हणजे व्यभिचाराचा मूर्तिमंत आविष्कार असतो ? चुकीच्या मार्गाने जाणाऱ्या तरुणीला सावरणारा, हात देणारा तरुण ही महाराष्ट्राचीच मक्तेदारी आहे काय ? दारिद्र्यातही निष्ठा न सोडणारा औदुंबरबुवा एक महाराष्ट्र सोडला तर काश्मीरपासून केरळपर्यंत कोठेच आढळत नाही काय ?

आणखी एक छोटेसे उदाहरण. जाईच्या नाटकाचा प्रयोग आटोपल्यानंतर बाळासाहेब त्यासंबंधी नापसंतीचे उद्गार काढतो, तेव्हा शेजारचा एक प्रेक्षक म्हणतो, "दुसऱ्याचे कौतुक न करण्याचा हा पाहा मराठी स्वभाव." बाळासाहेबांच्या नापसंतीमागे वैयक्तिक अपमानाचे कारण असते. परंतु त्याचा एक अपवाद सोडला तर बाकीच्या सर्व प्रेक्षकांनी जाईची मुक्तकंठाने प्रशंसा केलेली असते. ते सर्व मराठी प्रेक्षक असतात. मग मराठी मनाचा खरा धर्म कोणता ? बाळासाहेबाने व्यक्त केलेला का प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या गजरांनी उलगडून दाखविलेला ? खरे म्हणजे दोन्ही आविष्कार खास 'मराठी' असे मुळीच नाहीत. सर्वत्र आणि सर्व काळात दिसणारी ती मानवी रूपे आहेत. मग हा महाराष्ट्राचा खोटा आणि विकृत अहंकार कशासाठी ?

## वसंत देसाईंचा अपवाद

कथेचा विषय बाजूस ठेवून चित्रतंत्राचा विचार करावयास लागले, की एक गोष्ट प्रतीत होते. येथे व्यक्तीस महत्त्व नाही. महत्त्व आहे ते चित्रीकरणाच्या तंत्राला, भडक रंगांना, डोळ्यांना भारून टाकणाऱ्या बाह्य संजावटीला. त्यामुळे संध्याचे नृत्य पाहताना तिच्या भावाविष्कारापेक्षा प्रेक्षकांचे लक्ष जाते ते पाठीमागे फिरत असणाऱ्या रंगीबेरंगी चक्राकडे. झाशीच्या राणीच्या जीवनावरील नाट्य सादर करताना केवळ छायेने दिसणाऱ्या तिच्या शरीराकृतीऐवजी लक्षात राहतात ते बदलते रंग आणि त्या बदलत्या रंगांचे नाट्यगृहातील प्रेक्षकांवर पडलेले प्रतिबिंब. नजरबंदीवर भर देणाऱ्या या चित्रतंत्रामुळे कलाकारांनाही चेहऱ्याने बोलण्याची गरजच भासली नसावी. साऱ्यांच्याच हालचाली आखीव आणि यांत्रिक. बोलण्याची ढबही एकच. त्यामुळे अनेक व्यक्तिरेखा पाहूनही त्यांचे वैविध्य असे ठसत नाही. हृदयाला आवाहन करण्यापेक्षा डोळ्यांना भारून टाकणाऱ्या कारागिरीचाच हव्यास.

वसंत देसाई यांचे संगीत व विशेषत: पार्श्वसंगीत हा या बोलपटाचा आवर्जून उल्लेख करावा असा गौरवास्पद भाग. प्रसंगाचा 'मूड' पार्श्व संगीतात टिपण्याचा

त्यांचा प्रयत्न कमालीचा यशस्वी झाला आहे. बोलपटात चैतन्य भरण्याचे कार्य त्यांनीच काय ते पार पाडले आहे. एरवी सारा मामला साचेबंद आहे.

भारताच्या चित्रनकाशावर महाराष्ट्राला आज जे थोडेसे स्थान आहे, ते व्ही. शांताराम यांच्या महनीय कामगिरीमुळे; ही वस्तुस्थिती कोणीच नाकारणार नाही. हिंदी चित्रपटांच्या निर्मितीत भलेभले मराठी निर्माते साफ अयशस्वी झाले, तेथे प्रारंभापासून आजपर्यंत ताठ उभे आहेत, ते एकटे व्ही. शांताराम हेच. अशी अजोड कामगिरी करणाऱ्या शांतारामबापूंचा, महाराष्ट्राचे दर्शन घडविण्याचा हा नवा प्रयत्न मात्र पुरा फसला आहे. एवढ्या मोठ्या चित्रतंत्रज्ञाचा हा विडा काही रंगू शकला नाही; रंगाची मदत घेऊनही. ●


## चित्रपटकलेच्या सत्तराव्या जयंतीनिमित्त रुमानियामध्ये सत्यजित रे यांच्या चित्रपटांचे प्रदर्शन

बुखारेस्ट : काही दिवसांपूर्वी रुमानिया समाजवादी प्रजासत्ताकच्या बुखारेस्ट या राजधानीमध्ये रुमानिया चित्रपट व्यवसायाचे कार्यकारी मंडळ व राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय यांच्या संयुक्त उपक्रमाने चित्रपटकलेच्या सत्तराव्या जयंतीनिमित्त जगातील निवडक चित्रपटांची झलक दाखविण्यासाठी एक जंगी कार्यक्रम आखण्यात आला आहे.

चित्रपटकलेच्या चार मुख्य कालखंडांची कल्पना करून देण्यासाठी निवडक चित्रपट एकामागून एक दाखविण्यात येतील. पहिले खंड मूक चित्रपटांचे आहे. दुसरे खंड दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या बोलपटांचे, तिसरे खंड १९४० ते १९४५ या काळात दुसरे महायुद्ध चालू असता निघालेल्या चित्रपटांचे आणि चौथे अखेरचे खंड चालू जमान्यातील चित्रपटांचे.

या निवडक चित्रपटांच्या यादीमध्ये फेडरिक विल्यम मुरनाऊ, जॉर्ज कुकर, ऑर्सन वेल्स, चार्ली चॅप्लिन, आईनस्टाईन, डी. डब्ल्यू ग्रिफिथ, एरिक वॉन् स्टोर्हेईम्, रॉबर्ट फ्लेहर्टी, जी. रेजी, जॉन फोर्ड, जॅक्विस इग्गार, रॉबर्ट रोजेलिनी, मायकेल एंजल, ऑण्टोनिओनी, इग्यार वर्मसन् लुईगु ओनेल्, आकिरो कुरोसावा, कॅरेल रेईहा व सत्यजित रे यांच्या चित्रपटांचा समावेश होतो. या यादीत अमेरिका, रशिया, जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स, स्वीडन, इटाली, जपान, चेकोस्लोवाकिया व भारत यामधील प्रतिभावंत चित्रपटनिर्मात्यांच्या नावांचा समावेश करण्यात आला आहे. नटनटी किंवा हे चित्रपट तयार करणाऱ्या धंदेवाईक संस्था यांना काहीच महत्त्व देण्यात आलेले नाही आणि या चिरंजीव निर्मात्यांनाच त्या त्या कालखंडाचे श्रेय देण्यात आले आहे. ●

हीरो ' कोण ? ' व्हिलन ' कोण ?



MANOOS (Fortnightly) : 1 April. 1966 : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. श्री. ग. माजगावकर